# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत संस्था)

## महाराष्ट्रातील होलार समाजाची सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक स्थिती: पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील तुलनात्मक अभ्यास

**अहवाल**



**प्रमुख मार्गदर्शक**


**श्री. कैलास कणसे,** भा.पो.से.

महासंचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे


**२०२०**

# महाराष्ट्रातील होलार समाजाची सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक स्थिती: पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील तुलनात्मक अभ्यास

## अहवाल


### संशोधक

**श्री. भिमराव पारखे,** प्रकल्प संचालक
**श्रीमती प्रमोदिनी नाईक,** वरिष्ठ संशोधन अधिकारी

### विशेष योगदान

**डॉ. मुकेश दुपारे,** प्रकल्प संचालक

### संशोधन सहाय्य

**श्री. अमर सोनवणे,** संशोधन सहाय्यक
**श्री. मोहम्मद कलाल**, संशोधन सहाय्यक
**श्री धीरज खाडे**, संशोधन सहाय्यक

**संशोधन विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**

# प्रास्ताविक

भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत आपण अर्पण केले आहे. त्यामध्ये सर्व भारतीयांस न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता यांचे आश्वासन देण्यात आले आहे. खास करून राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांतील ४६ व्या कलमानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन करून त्यांचे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या पिळवणूकीपासून 'राज्य' संरक्षण करीन अशी हमी देण्यात आली आहे. कायद्याने 'अस्पृश्यता' नष्ट केली आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे कल्याण होण्याच्या दृष्टीने शासन अनेक विधायक योजना, उपक्रम राबवित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची स्वायत्त संस्था असून विशेषतः अनुसूचित जातींच्या विकासासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यासाठी कटिबद्ध आहे. यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतेचे विचार आम जनतेमध्ये रुजविणे हे महत्वाचे उद्दिष्ट आहे. यादृष्टीने बार्टीमार्फत समाजातील विविध क्षेत्रातील सामाजिक समतेशी संबंधित विषयांवर व महाराष्ट्रातील मागासलेल्या जातींचे संशोधन करून दस्तावेज तयार करण्यात येतात.

सदर संशोधनाचा उपयोग शासकीय धोरणे व योजना यांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी होतो. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या यादीमध्ये एकूण ५९ जातीं व त्याअंतर्गत तत्सम उपजाती, पोटजातींचा समावेश आहे. त्यांपैकी अनुक्रमांक २६ वर असणाऱ्या होलार, व्हलार या जातीच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. होलार समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध होत नाहीत, त्यांच्या जातीच्या चुकीच्या नोंदी होत आहेत व या समाजाचे सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण देखील आहे. त्याशिवाय, या समाजाविषयी फारसे संशोधनही झाले नसल्याने त्यांची आवश्यक तेवढी माहिती उपलब्ध असायला हवी, असा होलार समाजातील संघटनांचा आग्रह आहे. त्यामुळे 'महाराष्ट्रातील होलार समाजाची सामाजिक-आर्थिक शैक्षणिक स्थिती: पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांमधील तुलनात्मक अभ्यास' बार्टीच्या संशोधन विभागाकडून करण्यात आला आहे. या अभ्यासावर होलार समाजातील जाणकार, कार्यकर्ते, अभ्यासक व प्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा करण्यात आली आहे. तसेच सामाजिक शास्त्र व मानववंश शास्त्रातील संशोधक तज्ज्ञांसोबत सखोल विचार विनिमय करुन त्यानुसार सदर अहवाल अंतीम करण्यात आलेला आहे. या अहवालाचा होलार समाजाची सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी उपयोग होईल, असे मला वाटते.

**कैलास कणसे**, भा.पो.से.
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, पुणे-१.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्ते व नकाशे तपशील | I -V |
| | | अभ्यासाचा गोषवारा | १-१० |
| प्रकरण १ | : | प्रस्तावना | ११-२० |
| प्रकरण २ | : | संशोधन पद्धती | २१-३० |
| प्रकरण ३ | : | महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व होलार समाजाची सद्यस्थिती | ३१-४२ |
| प्रकरण ४ | : | होलार समाजाची सामाजिक स्थिती | ४३-८० |
| प्रकरण ५ | : | होलार समाजाची आर्थिक स्थिती | ८१-८८ |
| प्रकरण ६ | : | सारांश व शिफारशी | ८९-९३ |
| | | संदर्भ सूची | ९४-९५ |
| परिशिष्ट - १ | : | होलार समाजाच्या अभ्यासाची ‘कुटुंब मुलाखत अनुसूची’ | |
| परिशिष्ट - २ | : | पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयातील ‘कुटुंब यादी’ नमुना | |
| परिशिष्ट - ३ | : | होलार समाज वास्तव्यास असलेल्या पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयातील गावांची यादी | |
| परिशिष्ट - ४ | : | महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींची यादी | |

# तक्ते व नकाशे तपशील


तक्ता क्र. १ : जिल्हानिहाय होलार समाजाची लोकसंख्या

तक्ता क्र. २ : जिल्हानिहाय होलार समाजाची लोकसंख्या

तक्ता क्र. ३ : वयोगटानुसार वर्गवारी

तक्ता क्र. ४ : वयोगटानुसार वर्गवारी

तक्ता क्र. ५ : विभाग व लिंगनिहाय लोकसंख्येचे प्रमाण

तक्ता क्र. ६ : वैवाहिक स्थिती

तक्ता क्र. ७ : दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण

तक्ता क्र. ८ : वयोगटानुसार लोकसंख्येचे प्रमाण

तक्ता क्र. ९ : शिक्षणाचे प्रमाण

तक्ता क्र. १० : अनुसूचित जातींची लोकसंख्या

तक्ता क्र. ११ : जिल्ह्यानिहाय होलार समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण

तक्ता क्र. १२ : धर्मनिहाय होलार समाजाचे अनुसूचित जातीतील प्रमाण

तक्ता क्र. १३ : सामाजिक गटनिहाय पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोताचे प्रमाण

तक्ता क्र. १४ : सामाजिक गटनिहाय पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे ठिकाण

तक्ता क्र. १५ : सामाजिक गटनिहाय न्हाणीघर उपलब्धतेचे प्रमाण

तक्ता क्र. १६ : होलार समाजातील सोयीसुविधा उपलब्ध असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्र. १७ : सामाजिक गटनिहाय दिव्यांगतेचे प्रमाण

तक्ता क्र. १८ : सामाजिक गटनिहाय घरांची अवस्था

तक्ता क्र. १९ : सामाजिक गटनिहाय घरांची मालकी

तक्ता क्र. २० : होलार समाजातील घराची मालकी

तक्ता क्र. २१ : होलार समाजातील घराचा प्रकार

तक्ता क्र. २२ : जातीनिहाय कामगारांचे प्रमाण

तक्ता क्र. २३ : होलार समाजातील कुटुंबांचे पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण

तक्ता क्र. २४ : होलार समाजातील कुटुंबाचा मुख्य व्यवसाय

तक्ता क्र. २५ : होलार समाजातील कुटुंबाचे मासिक उत्पन्न

तक्ता क्र. २६ : होलार समाजातील कुटुंबाकडे जनावरांची मालकी

तक्ता क्र. २७ : जातीनिहाय साक्षरतेचे प्रमाण

तक्ता क्र. २८ : जातीनिहाय निरक्षरतेचे प्रमाण

तक्ता क्र. २९ : होलार समाजात शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता

तक्ता क्र. ३० : होलार समाजातील अनुजातीसाठी असलेल्या शासकीय योजनांबाबत माहिती.

तक्ता क्र. ३१ : विभागनिहाय वाहतूक व्यवस्थेचे प्रमाण

तक्ता क्र. ३२ : विभागनिहाय सांडपाणी व्यवस्थेचे प्रमाण

तक्ता क्र. ३३ : विभागनिहाय शौचालय असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३४ : विभागनिहाय आधारकार्ड असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३५ : विभागनिहाय मतदान कार्ड असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३६ : विभागनिहाय पक्के रस्ते असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३७ : विभागनिहाय पाणीपुरवठ्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३८ : विभागनिहाय वीजेची सोय असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३९ : विभागनिहाय दवाखाना असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४० : विभागनिहाय घराच्या मालकीचे प्रमाण

तक्ता क्र. ४१ : विभागनिहाय घराच्या प्रकाराचे प्रमाण

तक्ता क्र. ४२ : विभागनिहाय जोगवा प्रथा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४३ : विभागनिहाय कुटुंबात बाबायांना मान बुवाण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४४ : विभागनिहाय मासिक पाळीत महिलांनी बाजूला बसण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४५ : विभागनिहाय पोतराज प्रथेचे प्रमाण

तक्ता क्र. ४६ : विभागनिहाय बोलीभाषेचे प्रमाण

तक्ता क्र. ४७ : विभागनिहाय निवासस्थानी राहण्याचा कालावधी

तक्ता क्र. ४८ : विभागनिहाय आंतरजातीय विवाहाचे प्रमाण

तक्ता क्र. ४९ : विभागनिहाय घटस्फोटानंतर पोटगीचे प्रमाण

तक्ता क्र. ५० : विभागनिहाय महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण

तक्ता क्र. ५१ : विभागनिहाय मांसाहाराचे प्रमाण

तक्ता क्र. ५२ : विभागनिहाय जातपंचायत असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५३ : विभागनिहाय हुंडा देण्याच्या प्रथेचे प्रमाण

तक्ता क्र. ५४ : विभागनिहाय सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५५ : विभागनिहाय १९५० चा पुरावा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५६ : विभागनिहाय कुटुंबात दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५७ : विभागनिहाय कुटुंबाचा प्रकार

तक्ता क्र. ५८ : विभागनिहाय देवदासी प्रथेचे प्रमाण

तक्ता क्र. ५९ : विभागनिहाय इतर समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचे प्रमाण

तक्ता क्र. ६० : विभागनिहाय इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६१ : विभागनिहाय बेटी व्यवहार होणाऱ्या जातींचे प्रमाण

तक्ता क्र. ६२ : विभागनिहाय अनुसुचित जातीसाठी असणा-या शासकीय योजना माहित असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६३ : विभागनिहाय समाजाच्या संघटना असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६४ : विभागनिहाय धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी देण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६५ : विभागनिहाय पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६६ : विभागनिहाय जादूटोणा मानण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६७ : विभागनिहाय अंगात येण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६८ : विभागनिहाय जादूटोणा केल्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६९ : विभागनिहाय जटा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७० : विभागनिहाय जातीचे प्रमाण

तक्ता क्र. ७१ : विभागनिहाय जात प्रमाणपत्रावरील जातीचे प्रमाण

तक्ता क्र. ७२ : विभागनिहाय जात पडताळणी प्रमाणपत्रावरील जातीचे प्रमाण

तक्ता क्र. ७३ : विभागनिहाय मुळ जातीचे प्रमाण

तक्ता क्र. ७४ : विभागनिहाय प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ७५ : विभागनिहाय शिक्षणाचे प्रमाण
तक्ता क्र. ७६ : विभागनिहाय गळतीच्या कारणांचे प्रमाण
तक्ता क्र. ७७ : विभागनिहाय शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ७८ : विभागनिहाय पूर्वजांच्या व्यवसाय करण्याचे कुटुंबांचे प्रमाण
तक्ता क्र. ७९ : विभागनिहाय सावकाराने जमीन गिळंकृत केल्याचे प्रमाण
तक्ता क्र. ८० : विभागनिहाय जनावरांचा प्रकार
तक्ता क्र. ८१ : विभागनिहाय बाळ जन्मानंतर पाचवी, बारावी करण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ८२ : विभागनिहाय बाळ जन्मानंतर सटवाईची पूजा करण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ८३ : विभागनिहाय बाळ जन्माआधी करावयाच्या विधींचे प्रमाण
तक्ता क्र. ८४ : विभागनिहाय वापरत असलेल्या वाद्यांचे प्रमाण
तक्ता क्र. ८५ : विभागनिहाय अंत्य संस्काराचा प्रकार
तक्ता क्र. ८६ : विभागनिहाय दशक्रिया विधीचे प्रमाण
तक्ता क्र. ८७ : विभागनिहाय कुटुंबातील व्यसनाधीनतेचे प्रमाण
तक्ता क्र. ८८ : विभागनिहाय स्थलांतर करण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ८९ : विभागनिहाय स्थलांतराच्या कारणाचे प्रमाण
तक्ता क्र. ९० : विभागनिहाय मुलींच्या लग्नाच्या वयाचे प्रमाण
तक्ता क्र. ९१ : विभागनिहाय महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ९२ : विभागनिहाय प्रकल्प ग्रस्त कुटुंबांचे प्रमाण
तक्ता क्र. ९३ : विभागनिहाय इतर समाजाची दहशत असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ९४ : विभागनिहाय अत्याचार प्रतिबंध कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ९५ : विभागनिहाय समाजाची यात्रा भरण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ९६ : विभागनिहाय कुटुंबाच्या मुख्य व्यवसायाचे प्रमाण
तक्ता क्र. ९७ : विभागनिहाय कुटुंबाचे मासिक उत्पन्न
तक्ता क्र. ९८ : विभागनिहाय जमिनीच्या मालकीचे प्रमाण

तक्ता क्र. ९९ : विभागनिहाय जमिनीच्या प्रकाराचे प्रमाण

तक्ता क्र. १०० : विभागनिहाय जमिनीच्या क्षेत्रफळाचे प्रमाण

तक्ता क्र. १०१ : विभागनिहाय कुटुंबातील कमावत्या व्यक्तींची संख्या

तक्ता क्र. १०२ : विभागनिहाय जमिनीच्या मालकीचा प्रकार

तक्ता क्र. १०३ : विभागनिहाय जनावरांच्या मालकीचे प्रमाण

तक्ता क्र. १०४ : विभागनिहाय जनावरांच्या संख्येचे प्रमाण

तक्ता क्र. १०५ : विभागनिहाय पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण

आकृती क्र.१ : महाराष्ट्र राज्याचा नकाशा

आकृती क्र.२ : मराठवाडा विभागातील परभणी व बीड जिल्हा

आकृती क्र.३ : पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व सोलापूर जिल्हा

# गोषवारा

भारतीय समाजाच्या पारंपारीक जाती व्यवस्थेमध्ये श्रेष्ठता- कनिष्ठता, उच्च-नीचता असा भेदभाव प्रामुख्याने पाळला जातो. एक जात दुसऱ्या जातीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे नेहमीच दाखविण्याची चढाओढ असलेली दिसते. भारतीय राज्यघटना समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मुलभूत भूमिका बजावते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून सामाजिक भेदभाव मिटविण्यासाठी राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समानता, बंधुता या तत्वांचा अंगीकार केला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अशा गटातील लोकांची विशेष काळजी घेतली जावी, या उद्देशाने राज्यघटनेत विविध तरतुदी केलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीतील अनु. क्र. २६ वरील होलार ही अतिशय मागासलेली जात आहे. होलार समाजामध्ये पूर्वी ग्रामव्यवस्थेमध्ये वाजंत्रीचे काम केले जाई. तदनंतर नवीन चप्पल बनविणे त्या दुरुस्त करणे, दोरखंड तयार करणे ही कामे हा समाज करीत असे. महाराष्ट्रातील सांगली, पुणे, सोलापूर, सातारा, आणि नागपूर या जिल्हयांमधून या समाजाची लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळून येते. शिक्षणाचा अभाव, उत्पन्नाच्या साधनांचा अभाव, रूढी परंपरांचा पगडा, इ. घटक या समाजाच्या मागासलेल्या स्थितीस कारणीभूत आहेत. पारंपारिक व्यवसायात असल्याने हा समाज आपली प्रगती करू शकला नाही. शिवाय, होलार समाजासंबंधी फारसे संशोधन झालेले नाही.

त्यामुळे, सदर अभ्यासात प्रामुख्याने दोन उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत. १) महाराष्ट्रातील होलार समाजाच्या सामाजिक—आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करणे. २) होलार जातीच्या चुकीच्या जात नोंदी अभ्यासणे. तसेच सर्वेक्षण संशोधन पद्धतीने महाराष्ट्रातील होलार समाजाकडून कुटुंब यादीची माहिती संकलीत करण्यात आली. यात २०११ च्या जनगणनेनुसार पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा अशा दोन्ही विभागातून सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येकी दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. यामध्ये सोलापूर ,सांगली, परभणी व बीड या जिल्ह्यांची निवड करण्यात आली. शास्त्रीय आधारावर एकूण होलार कुटुंब संख्येच्या २०% कुटुंबे ही यादृच्छिक नमुना निवड (Random sampling) पद्धतीने निवडण्यात आली. यासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला. अशाप्रकारे एकूण

१३८० कुटुंबांकडून या मुलाखत अनुसूचीद्वारे गुणात्मक व सांख्यिकीय माहितीचे संकलन करण्यात आले. तसेच होलार समाजाचे वास्तव्य असलेल्या काही वाड्या वस्त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या सद्य स्थितीचे निरीक्षण करण्यात आले.

होलार समाजाच्या कुटुंब सर्वेक्षणातून असे आढळून आले की, पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा क्षेत्रामध्ये होलार समाजाच्या कुटुंबाना वाहतूक व्यवस्था उपलब्धता सांडपाणी व्यवस्थेची उपलब्धता, शौचालय उपलब्धता, पाणी पुरवठा सुविधा, वीज सुविधा, आरोग्याच्या सुविधा इत्यादी सोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. याउलट मराठवाड्यात पक्क्या रस्त्याची उपलब्धता जास्त आहे. तसेच, आधार कार्ड व मतदान कार्ड यांची कुटुंबामध्ये असणारी उपलब्धता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यामध्ये सारख्या प्रमाणात आहे. कुटुंबात दीर्घकालीन आजार असल्याचे प्रमाण मराठवाड्यात जास्त आहे. एकत्र कुटुंबात राहत असल्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यापेक्षा जास्त आहे. कुटुंबातील व्यसनाधीनतेचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात अधिक दिसते. कुटुंबाचे स्थलांतर होण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुलनेने मराठवाड्यापेक्षा किंचित अधिक दिसते. सनई वाद्याचा वापर करणे हे पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याच्या तुलनेत अधिक दिसते. होलार समाजातील प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येत असून ते केवळ पश्चिम महाराष्ट्रात असल्याचे दिसते. प्राथमिक शाळा सुविधेचे प्रमाण दोन्ही विभागात असले तरीही तुलनेने मराठवाड्यात हे प्रमाण अधिक आहे. होलार समाजाच्या अभ्यासाकरिता निवडलेल्या क्षेत्रामध्ये एकूण होलार समाजाच्या लोकसंख्येत अशिक्षितांचे प्रमाण मराठवाड्यामध्ये जास्त आहे. तसेच, प्राथमिक शिक्षणाचे प्रमाणही मराठवाड्यातच पश्चिम महाराष्ट्रच्या तुलनेत जास्त आहे. शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण मराठवाड्यात जास्त आहे. याउलट, बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणातून गळती झालेल्या होलार समाजातील लोकांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रमध्ये अधिक आहे. मराठवाड्यामध्ये शिक्षणाची स्थिती पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत असमाधानकारक असल्याचे चित्र आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यापेक्षा जास्त कुटुंबामध्ये जोगवा मागण्याची प्रथा व सूर्य व चंद्रग्रहण मागण्याचे प्रमाण जास्त आहे. मराठवाड्यात बुवा-बाबा, भगत यांना मानण्याचे प्रमाण, पोतराज प्रथेचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. मराठी ही बोलीभाषा मराठवाडा विभागामध्ये जास्त प्रमाणात आहे. पश्चिम

महाराष्ट्र विशेषतः सांगली, सोलापूर या भागात कन्नड भाषिकांचे प्रमाण काही प्रमाणात दिसून येते. आंतरजातीय विवाहाचे प्रमाण अत्यल्प असले तरीही ते मराठवाड्यातच दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात मराठवाड्याच्या तुलनेत यात्रांमध्ये होलार समाजाचे लोक जास्त एकत्र येतात.

होलार समाजाच्या महिलांच्या स्थितीबाबत काही विशेष बाबी आढळून येतात. घटस्फोटांनंतर पोटगी मिळण्याचे प्रमाण, महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण व देवदासींच्या प्रथेचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याच्या तुलनेत जास्त दिसून येते. तर हुंडा देण्याच्या प्रथेचे प्रमाण व मासिक पाळीत अस्पृश्यता मानण्याचे प्रमाण मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त आढळून येते. मांसाहाराचे प्रमाण मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यामध्ये जवळ जवळ सारखेच आहे. जातपंचायत असल्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रमध्ये अत्यल्प असले तरीही मराठवाड्यापेक्षा जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यामध्ये मुलींच्या लग्नाचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असण्याचे प्रमाण कमी दिसून येते. तसेच, बाळंतपणानंतर विटाळ मानण्याचे प्रमाण मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त आहे.

इतर समाजाकडून भेदभावाची वागणूक मिळण्याचे प्रमाण मराठवाड्यात जास्त असून पश्चिम महाराष्ट्रमध्ये इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण मराठवाड्याच्या तुलनेत जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात जास्त प्रमाणात इतर समाजाची दहशत होलार समाजावर असल्याचे दिसते. त्याचबरोबर अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत मराठवाड्यामध्ये गुन्हा नोंद होण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रापेक्षा जास्त दिसते. अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या योजना माहित असल्याचे प्रमाण मराठवाड्यापेक्षा पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त दिसले. तसेच मराठवाड्यापेक्षा पश्चिम महाराष्ट्रामध्ये होलार समाजाच्या संघटना आहेत असे सांगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे.

होलार समाजांतर्गत बेटी व्यवहार होण्याचे कुटुंबाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहे. तर होलेर समाजात बेटी व्यवहार होण्याचे कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यात जास्त आहे. मांग जातीत कुटुंबाचे बेटी व्यवहार करण्याचे प्रमाण फक्त पश्चिम महाराष्ट्रमध्ये आहे, ते मराठवाड्यात अजिबात दिसून येत नाही .तसेच होलार समाजातील लोकांचे सर्वेक्षण केल्यानंतर असेही दिसून आले की, "फक्त होलारच जात आहे" असे मानणाऱ्याचे पश्चिम महाराष्ट्रमध्ये प्रमाण जास्त आहे. तर "फक्त होलेरच जात आहे" असे मानणाऱ्यांचे मराठवाड्यामध्ये प्रमाण जास्त आहे. तसेच, स्वतःला मातंग-मांग मानणाऱ्यांचे प्रमाण फक्त पश्चिम

महाराष्ट्रातील होलार समाजातील लोकांतच दिसून येते. परंतु सदर मांग-मातंग जातींच्या व्यक्तींचे नातेवाईक होलार समाजातील आहेत व त्यांचे रोटी बेटी व्यवहार होतात. यावरुन होलार समाजातील जी कुटुंबे मांग-मातंग वस्तीस वास्तव्यास असतात त्यांची जात मांग किंवा मातंग लागली असावी. मराठवाड्यात स्वतःला मांग मानणाऱ्याचे प्रमाण अजिबात नाही. तसेच होलार म्हणून जातप्रमाणपत्र पडताळणी झाल्याचे लोकांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त असून मराठवाड्यात होलेर म्हणून जात प्रमाणपत्र पडताळणी झालेल्या लोकांचे प्रमाण जास्त दिसून येते. तर मांग म्हणून फार अल्प प्रमाणात जातप्रमाणपत्र पडताळणी झालेल्या लोकांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये दिसून येते. त्याचबरोबर लोकांना ते "कोणत्या जातीचे आहेत असे समजतात" असे सर्वेक्षणादरम्यान विचारण्यात आले. त्यावर पश्चिम महाराष्ट्रातील लोकांनी मोठ्या प्रमाणात ते होलार जातीचे आहेत असे सांगितले तर मराठवाड्यातील लोकांमध्ये ते होलेर व व्हलार आहे असे सांगण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त दिसते. आपण "मूळ मांग आहोत" असे सांगणाऱ्या लोकांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये दिसून येते. त्याचप्रमाणे जातीचा दाखला मिळण्यासाठी किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी अनुसूचित जातींना १०/०८/१९५० या मानीव दिनांक पूर्वीचा पुरावा असणे आवश्यक असते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये असा पुरावा असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आढळून येते.

धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरा इत्यादी बळी देण्याचे प्रमाण ,जादूटोणा मानणाऱ्याचे प्रमाण, अंगात येण्याचे प्रमाण मराठवाड्यातील होलार समजाच्या कुटुंबामध्ये जास्त आहे. "कोणीतरी आपल्यावर जादूटोणा केला आहे" असे मानणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यात थोडे जास्त दिसते. बाळ जन्मल्यानंतर पारंपारीक विधी करण्याचे प्रमाण व सटवाईची पूजा करण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यामध्ये फारशी तफावत दिसून येत नाही. परंतु, बाळाच्या जन्माआधी ओटी भरण्याचे विधी करण्याचे प्रमाण फक्त पश्चिम महाराष्ट्रामध्येच दिसून येते. तसेच, बाळाच्या जन्माआधी जेवण देण्याच्या विधीचे प्रमाण मराठवाड्याच्या तुलनेने पश्चिम महाराष्ट्रामध्ये अधिक आहे.

पूर्वजांचा जुन्या चपला शिवणे हा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यापेक्षा जास्त आहे. मेलेल्या जनावरांची कातडी काढणे हा पूर्वजांचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने मराठवाड्यात कमी आहे. पूर्वजांचा सुतार काम हा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण पश्चीम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यामध्ये अधिक आहे. सावकाराने होलार समाजातील

कुटुंबांची जमीन गिळंकृत करण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये व मराठवाड्यामध्ये अत्यल्प असले तरीही समान आहे. कुटुंबांकडे भाकड जनावरांची मालकी असण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यामध्ये सारखेच दिसते. शेळ्या-मेंढ्या असण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याच्या तुलनेने जास्त आहे. दुभती जनावरे असण्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यामध्ये जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात स्वतःच्या मालकीचे घर असण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच घरांच्या प्रकारा मध्ये कच्ची घरे असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यात तुलनेने जास्त आहे. इतर मजुरीचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रातील होलार समाजाच्या लोकांमध्ये जास्त आहे. तर शेतमजुरीचे प्रमाण मराठवाड्यातील होलार समाजातील लोकांमध्ये जास्त आहे. सरकारी नोकरी असणाऱ्या लोकांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याच्या (एकंदरीत कमी असले तरीही) तुलनेने अधिक आहे. वाजंत्री म्हणून व्यवसायात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण मराठवाड्यात अधिक आहे .तसेच, कुटुंबाचे मासिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यात अधिक आहे. जमिनीच्या मालकीचे प्रमाण मराठवाड्यापेक्षा पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त आहे .तसेच, जमीन जिरायत असण्याचे प्रमाणही पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहे .जमीन असणाऱ्या कुटुंबामध्ये वडिलोपार्जित जमिनीवर मालकी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त आहे. परंतु, भूमिहीन असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यामध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त आढळून येते. कुटुंबातील किमान एक व्यक्ती कमावती असल्याचे होलार समाजातील कुटुंबाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्याच्या तुलनेत अधिक आहे. जनावरांची मालकी असल्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुलनेने अधिक असून किमान एक जनावर असल्याचे कुटुंबाचे प्रमाणही मराठवाड्यापेक्षा पश्चिम महाराष्ट्रामध्ये अधिक आहे. तसेच, होलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायात असल्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुलनेने अधिक आहे.

| **क्र.** | **चल** | **विभाग** | **प्रमाण (%)** |
|---|---|---|---|
| **सोयी-सुविधा उपलब्धता यांची संक्षिप्त माहिती** | | | |
| १ | पाणीपुरवठा सुविधा नसणे | मराठवाडा | ५४.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १६.९% |
| २ | वीज सुविधा नसणे | मराठवाडा | ५९.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ७.५% |
| ३ | सांडपाणी व्यवस्था उपलब्धता | मराठवाडा | ३५.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ५९.६% |
| ४ | शौचालय उपलब्ध नाही | मराठवाडा | ७७.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २६.२% |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | दवाखाना सुविधा नसणे | मराठवाडा | ५२.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १७.१% |
| ६ | पक्के रस्ते उपलब्धता | मराठवाडा | ४४.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २५.०% |
| ७ | वाहतूक व्यवस्था उपलब्धता | मराठवाडा | ५६.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २९.४% |
| ८ | आधार कार्ड उपलब्धता | मराठवाडा | ९९.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९९.१% |
| ९ | मतदान कार्ड उपलब्धता | मराठवाडा | ९८.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९५.५% |
| **शैक्षणिक स्थिती** | | | |
| १० | प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९४.७% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९२.५% |
| ११ | अभ्यास क्षेत्रातील एकूण लोकसंख्येत अशिक्षितांचे प्रमाण | मराठवाडा | ३४.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २३.९% |
| १२ | अभ्यास क्षेत्रातील एकूण लोकसंख्येत प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण | मराठवाडा | २९.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २७.१% |
| १३ | बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणातून गळती झाल्याचे प्रमाण | मराठवाडा | १९.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३२.९% |
| १४ | शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९७.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ७९.५% |
| **सामाजिक स्थिती** | | | |
| १५ | निवासस्थानी राहण्याचा कालावधी (जन्मापासून) | मराठवाडा | ९०.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८०.६% |
| १६ | प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.८% |
| १७ | स्थलांतर करण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ११.८% |
| १८ | कुटुंबाचा प्रकार (एकत्रित) | मराठवाडा | २६.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६१.६% |
| १९ | कुटुंबात दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण | मराठवाडा | १४.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६.४% |
| २० | बोलीभाषा (मराठी) | मराठवाडा | ९८.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९५.२% |
| २१ | जोगवा प्रथा | मराठवाडा | २६.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३०.२% |
| २२ | बाबा-बुवा यांना मानण्याचे प्रमाण | मराठवाडा | १७.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १२.५% |
| २३ | पोतराज प्रथेचे प्रमाण | मराठवाडा | २.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.८% |
| २४ | सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण | मराठवाडा | १.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २५.८% |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी देण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९३.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८४.२% |
| २६ | पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण | मराठवाडा | ८४.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९०.३% |
| २७ | जादूटोणा मानण्याचे प्रमाण | मराठवाडा | ३०.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९.६% |
| २८ | अंगात येणे | मराठवाडा | १३.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६.०% |
| २९ | तुमच्यावर कुणी जादूटोणा केला आहे का? | मराठवाडा | ४.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ४.३% |
| ३० | जटा असण्याचे प्रमाण | मराठवाडा | २.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २.१% |
| ३१ | बाळ जन्मानंतर विधी करण्याचे प्रमाण | मराठवाडा | १००.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९६.६% |
| ३२ | बाळ जन्मानंतर सटवाईची पूजा करण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९९.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९८.३% |
| ३३ | बाळ जन्माआधी ओटी भरण विधींचे प्रमाण | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १७.९% |
| ३४ | बाळ जन्माआधी डोहाळे जेवण विधींचे प्रमाण | मराठवाडा | ८.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २८.४% |
| ३५ | सनई वाद्याचा वापर करणे | मराठवाडा | ९.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १३.८% |
| ३६ | समाजाची यात्रा भरण्याचे प्रमाण | मराठवाडा | ६.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ७२.६% |
| ३७ | डफ वाद्याचा वापर करणे | मराठवाडा | ८.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८.६% |
| ३८ | दहन करणे अंत्यविधी | मराठवाडा | ९९.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९८.४% |
| ३९ | तिसऱ्या दिवशी दशक्रिया विधी करण्याचे प्रमाण | मराठवाडा | २.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९८.०% |
| ४० | दहाव्या दिवशी दशक्रिया विधी करण्याचे प्रमाण | मराठवाडा | ५४.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.३% |
| ४१ | कुटुंबातील व्यसनाधीनतेचे प्रमाण | मराठवाडा | १९.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९.१% |
| ४२ | मासिक पाळीत अस्पृश्यतेचे प्रमाण | मराठवाडा | ९८.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८५.८% |
| ४३ | मुलींच्या लग्नाच्या वय १८ वर्षापेक्षा जास्त असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ८७.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९४.५% |
| ४४ | महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९८.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९३.७% |
| ४५ | घटस्पोटानंतर पोटगी मिळण्याचे प्रमाण | मराठवाडा | २४.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३४.३% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण | मराठवाडा | २७.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८५.४% |
| ४७ | हुंडा देण्याच्या प्रथेचे प्रमाण | मराठवाडा | ९६.७% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १६.७% |
| ४८ | देवदासी प्रथेचे प्रमाण | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १६.८% |
| ४९ | मांसाहाराचे प्रमाण | मराठवाडा | ९१.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९४.०% |
| ५० | जातपंचायत असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ०.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.१% |
| ५१ | आंतरजातीय विवाहाचे प्रमाण | मराठवाडा | ३.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.७% |
| ५२ | इतर समाजाकडून भेदभावाची वागणूक मिळणाचे प्रमाण | मराठवाडा | ३२.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ४.८% |
| ५३ | इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण | मराठवाडा | ९५.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९७.७% |
| ५४ | इतर समाजाची दहशत असण्याचे प्रमाण | मराठवाडा | २२.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३.४% |
| ५५ | अत्याचार प्रतिबंध कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण | मराठवाडा | २७.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २२.४% |
| ५६ | समाजाच्या संघटना असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ६१.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ७८.४% |
| ५७ | १९५० चा पुरावा असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ६.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६५.१% |
| ५८ | कोणत्या जातीत बेटी व्यवहार होतो (होलार) | मराठवाडा | ५९.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८९.२% |
| ५९ | कोणत्या जातीत बेटी व्यवहार होतो (होलेर) | मराठवाडा | ३९.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.०% |
| ६० | कोणत्या जातीत बेटी व्यवहार होतो (होलार/मांग) | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १०.२% |
| ६१ | अनुसुचित जातीसाठी असणा-या शासकीय योजना माहित असण्याचे प्रमाण | मराठवाडा | १५.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २१.०% |
| ६२ | कुटुंबाची जात (होलार) | मराठवाडा | ६५.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८५.४% |
| ६३ | कुटुंबाची जात (होलेर) | मराठवाडा | ३०.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.१% |
| ६४ | कुटुंबाची जात (मांग-मातंग) | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १३.८% |
| ६५ | जात प्रमाण पत्रावरील जातीचे प्रमाण (होलार) | मराठवाडा | ८.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६५.६% |
| ६६ | जात प्रमाण पत्रावरील जातीचे प्रमाण (होलेर) | मराठवाडा | १५.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.०% |

| | | | |
|---|---|---|---|
| ६७ | जात प्रमाण पत्रावरील जातीचे प्रमाण (मांग) | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९.९% |
| ६८ | जात पडताळणी प्रमाणपत्र (होलार) | मराठवाडा | ०.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १७.८% |
| ६९ | जात पडताळणी प्रमाणपत्र (होलेर) | मराठवाडा | ०.७% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.०% |
| ७० | जात पडताळणी प्रमाणपत्र (मांग) | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.४% |
| ७१ | मूळ जातीचे प्रमाण (होलार) | मराठवाडा | ६०.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९७.०% |
| ७२ | मूळ जातीचे प्रमाण (होलेर) | मराठवाडा | ३५.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.१% |
| ७३ | मूळ जातीचे प्रमाण (व्हलेर) | मराठवाडा | ३.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.४% |
| ७४ | मूळ जातीचे प्रमाण (मांग) | मराठवाडा | ०.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २.४% |
| **आर्थिक स्थिती** | | | |
| ७५ | घराची  मालकी (स्वत:चे) | मराठवाडा | ९७.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८१.२% |
| ७६ | घराच प्रकार (कच्चे) | मराठवाडा | ५६.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ५०.४% |
| ७७ | पूर्वजांचा वाद्य वाजविणे व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | ४४.७% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६४.७% |
| ७८ | पूर्वजांचा जुन्या चपला शिवणे व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | ३.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ५७.२% |
| ७९ | पूर्वजांचा दोरखंड तयार करणे व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | १.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २३.७% |
| ८० | मेलेल्या जनावरांची कातडी काढणे हा पूर्वजांचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | ११.०% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २१.३% |
| ८१ | पूर्वजांचा सुतार काम हा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | मराठवाडा | १२.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ०.२% |
| ८२ | सावकाराने जमीन गिळंकृत केल्याचे प्रमाण | मराठवाडा | १.२% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.१% |
| ८३ | भाकड जनावरांची मालकीचे प्रमाण | मराठवाडा | ६.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ७.८% |
| ८४ | शेळया-मेंढ्या असण्याचे प्रमाण | मराठवाडा | १०.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १९.०% |
| ८५ | दुभती जनावरे असण्याचे प्रमाण | मराठवाडा | १३.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ९.३% |
| ८६ | लोकांचा व्यवसाय (इतर मजुरी) | मराठवाडा | १०.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १३.९% |

| | | | |
|---|---|---|---|
| ८७ | लोकांचा व्यवसाय (शेत मजुरी) | मराठवाडा | १९.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ११.३% |
| ८८ | लोकांचा व्यवसाय (सरकारी नोकरी) | मराठवाडा | ०.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.१% |
| ८९ | लोकांचा व्यवसाय (वाजंत्री) | मराठवाडा | १.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १.०% |
| ९० | कुटुंबाचे मासिक उत्पन्न (१० हजारपेक्षा कमी) | मराठवाडा | ८९.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ८८.४% |
| ९१ | जमिनीच्या मालकीचे प्रमाण | मराठवाडा | २४.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३३.२% |
| ९२ | जमीनीचा प्रकार (जिरायती) | मराठवाडा | ०.४% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ४.५% |
| ९३ | कुटुंबातील एक कमावती व्यक्तीं असण्याचे प्रमाण | मराठवाडा | ५६.५% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६६.६% |
| ९४ | जमिनीच्या मालकीचा प्रकार (वडिलोपार्जित) | मराठवाडा | ६.१% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २६.४% |
| ९५ | भूमिहीन | मराठवाडा | ७५.६% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ६६.८% |
| ९६ | जनावरांच्या मालकीचे प्रमाण | मराठवाडा | ३०.९% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | ३६.३% |
| ९७ | एक जनावर असण्याचे संख्येचे प्रमाण | मराठवाडा | ११.८% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | १३.७% |
| ९८ | पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण | मराठवाडा | २०.३% |
| | | पश्चिम महाराष्ट्र | २३.४% |

## प्रकरण १

# प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये माणसाच्या जन्माबरोबरच त्याला त्याच्या जातींची वैशिष्ट्ये चिकटतात. जातींच्या निर्मितीमध्ये व्यवसाय, जातीतच रोटी-बेटी व्यवहार, जातीच्या स्वतंत्र वस्त्या आणि जातपंचायतींनी आखून दिलेल्या नीतीनियमांचे पालन ही महत्वाची वैशिष्टे आढळून येतात. जातीव्यवस्थेत श्रेष्ठता-कनिष्ठता, उच्च-नीचता असा भेदभाव प्रामुख्याने पाळला जातो. कनिष्ठ जातींत क्षमता असो किंवा नसो त्यांची सामाजिक गतिमानता खुंटवून त्यांना कनिष्ठ स्थानावरच कसे ठेवता येईल हे पाहिले जाते. दुसऱ्या बाजूला वरिष्ठ स्थानावर विसावलेल्या जातींत क्षमता असो किंवा नसो त्यांचे सामाजिक स्थान हे अबाधितच राहते. हे सामाजिक स्थितीचे वास्तव आजही कायम दिसून येते. तसेच, एक जात दुसऱ्या जातीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे नेहमीच दाखविण्याची चढाओढ असलेली दिसते. तसेच, काही समाज शास्त्रज्ञ व मानववंश शास्त्रज्ञ असे मत मांडतात की, भारतीय समाजात पूर्वापार जात अस्तित्वात असली तरीही त्याची जाणीव समाजात नव्हती. उलट, ब्रिटीश काळानंतर 'जात जाणीवा' अधिकाधिक विकसित होत गेल्या. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र 'जातीभेद' नष्ट करण्यात आले, त्यासाठी भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्व यांच्याआधारे नागरिकांच्या मानवी अधिकाराला संरक्षण देण्यात आले. असे असले तरीही, जात ही फक्त ब्रिटीशांच्या कल्पनारचितेचा भाग नसून ही प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत रुजलेली आहे असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटना समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यात मुलभूत भूमिका बजावते. त्यात अनुसूचित जातींसाठी पुढील तरतुदी केल्या आहेत.

कलम १५ (१) : राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

कलम १६ (२) : कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही, अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

कलम १६ (४) : कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या

कोणत्याही मागासवर्गाला, राज्याच्या मते, पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा मागास वर्गाकरीता नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

| | | |
|---|---|---|
| कलम १७ | : | अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. "अस्पृश्यतेतून" उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल. |
| कलम ४६ | : | राज्य, जनतेतील दुर्बल घटक, आणि विषेशत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील. |
| कलम ३३० | : | लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्या करिता जागा राखून ठेवणे. |
| कलम ३३८ | : | अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोग स्थापन करणे. |
| कलम ३४१ | : | राष्ट्रपतींच्या आदेशानुसार भारतीय समाजातील काही जातींना 'अनुसूचित जाती' असे गणले जाते. |
| कलम ३६६ (२४) | : | अनुसूचित जाती याचा अर्थ, या संविधानाच्या प्रयोजनार्थ ३४१ अन्वये अनुसूचित जाती असल्याचे मानले गेले आहे. अशा जाती, वंश किंवा जमाती अथवा जातीचे, वंशाचे किंवा जमातीचे भाग अथवा त्यातील गट असा आहे. |

Govt.of India Act 1935 च्या कायद्यानुसार इंग्रजी राजवटीत प्रथम अनुसूचित जाती हा शब्दप्रयोग वापरण्यात आला होता. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून सामाजिक भेदभाव मिटविण्यासाठी राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य समानता, बंधुता या तत्वांचा अंगीकार केला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक दुष्ट्या मागासलेल्या अशा गटातील लोकांची विशेष काळजी घेतली जावी, या उद्देशाने राज्यघटनेत विविध तरतुदी केलेल्या आहेत.

होलार ही अनुसूचित जातीमधील अतिशय मागासलेली जात आहे. होलार शब्दाचा अर्थ भूमिपुत्र असा होतो. होलार जातीमध्ये आयवळे, बिरलींगे, गारोडे, गेजगे, गुळीक, जावीर, कारडे, हलमाने, नामदासे, पारसे, वागर इ. आडनावे आढळून येतात. होलार ही मांग जातीची उपजात मानली जाते. होलार जातीचे खान-

पान व पेहराव यांच्याबाबतीत मांग जातीशी साम्य दिसून येते. ते चर्मकार व मांग यांच्याप्रमाणेच बूट, चपला, पाण्याच्या पिशव्या, घोड्यावरील बस्कर, टांग्यांच्या वेसन, घोड्यांच्या खुराकांच्या पिशव्या इ. तयार करीत असत (सोलापूर गॅझेट, १८८४: पृ. क्र. ११७). परंतु, होलार समाज ही स्वतंत्र जात आहे. काही वेळा होलार हे चांभार जातीसारखेच आहेत, असे गैरसमज आहेत. चांभार जातीचे लोक हे नवीन चपला तयार करतात, तर होलार जातीचे लोक चपला किंवा चामड्याच्या वस्तूंची दुरुस्ती करतात. तसेच ग्रामसंस्कृतीमध्ये वाजंत्रीचे काम करीत असे. तदनंतर काही लोक दोरखंड बनविण्याचे काम करीत व त्यामुळे त्यांच्या या व्यवसायावरून त्यांच्या जातीच्या नोंदी चांभार, मांग अशा झाल्याचे दिसून येते. मात्र होलार हा समाज स्वजातीय विवाह करणारा (endogamous) समाज आहे. हा समाज चांभार व मांग या समाजाच्या मुला मुलींशी विवाह करीत नाही. होलार, चांभार आणि मांग या समाजाची परंपरा काही प्रमाणात सारखीच आढळत असली तरी होलार समाजाअंतर्गत विवाह ही परंपरा स्वतंत्रपणे जपली आहे (सिंग, १९९३). त्यांच्या काही सांस्कृतिक बाबीं चांभार आणि मांग जातीशी साम्य दाखवणाऱ्या असल्या तरी होलार स्वतंत्र अस्तित्व असणारी व जातीअंतर्गत बेटी व्यवहार जतन करणारा समूह आहे (सिंग, १९७६: ८१३).

महाराष्ट्रातील सांगली, सांगोला, पुणे, सोलापूर, सातारा, आणि नागपूर या जिल्हयांमधून या समाजाची लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये या जातीच्या लोकांची लोकसंख्या सुमारे १ लाख ८ हजार ९०० एवढी आहे (पहा तक्ता क्र. १). शिक्षणाचा अभाव, उत्पन्नाच्या साधनांचा अभाव, रूढी परंपरांचा पगडा, इ. घटक या समाजाच्या मागासलेल्या स्थितीस कारणीभूत आहेत. पारंपारिक व्यवसायात असल्याने हा समाज आपली प्रगती करू शकला नाही. या समाजाच्या उन्नतीसाठी, त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना उपलब्ध आहेत. परंतु या योजनांचा लाभ घेण्यासाठी या लोकांना काही कागदपत्रांचा पाठपुरावा करावा लागतो. जसे की जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला इ. मागासलेल्या व भटक्या स्वरूपामुळे या जातीच्या लोकांकडे अशा कागदपत्रांचा अभाव दिसून येतो. त्यासाठी “५० वर्षापूर्वीचे वास्तव्याचे पुरावे” मिळविण्यात या लोकांना अडचणी येतात. शिवाय, होलार समजासंबंधी फारसे संधोधन सुद्धा झालेले नाहीत. परिणामी या लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच्या शासनाच्या योजना असूनही त्यांपासून होलार समाज वंचित राहिलेला दिसत आहे, असे प्राथमिकदृष्ट्या म्हणण्यास वाव आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या होलार समाजातील लोक धनगर समाजासाठी डफ वाजविण्याचे काम करीत असत. त्यामुळे आजही होलार समाजातील लोक वाजंत्री पथकाशी संबंधित आहेत असे दिसते. होलार जातीची उपजात नाही पण व्हलार, होलीया हे नामसदृश आहेत.

## संशोधनाची सैद्धांतिक चौकट

भारतात जात-जाणीवा ह्या प्राचीन काळापासून असल्या तरीही त्यांच्या अस्तित्वाची जाणीव वसाहतीक काळातच झाली. १९ व्या शतकात ब्रिटिशांनी  जात आधारित जनगणना केली. त्याचकाळात ब्रिटीश सनदी अधिकाऱ्यांनी व अनेक अभ्यासकांनी 'जातीं'चा अभ्यास केला आहे. एम. एन. श्रीनिवास (१९७९) यांनी गुणात्मक संशोधन पद्धतीवर विशेष भर देऊन पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींचा अभ्यास करण्यास प्राधान्य दिलेले आहे. त्यासाठी ते म्हणतात कि, अस्पृश्यांच्या वस्तीत राहून त्यांचा वांशिक अभ्यास (ethnography) केल्यासच आपणास त्यांचे जीवन समजून घेता येईल. तसेच, लुईस डूमो (१९९९) या प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने प्रतिपादन केले आहे कि, अस्पृश्यांचा अभ्यास करताना त्यांचे समाजव्यवस्थेतील स्थान उदा. श्रेष्ठता-कनिष्ठता, शुद्धा-अशुद्धतेच्या कल्पना यांवरून ठरलेला असतो. शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पना ह्या दुहेरी (binary) आहेत. ज्यामुळे ब्राह्मण व वरिष्ठ जातींचे वर्चस्व सिद्ध होते. जातीव्यवस्थेच्या अभ्यासात डूमोचे हे विश्लेषण मुलभूत समजले जाते. आंद्रे बिते (१९६६) व जोधाका (२००६) हे मान्य करतात कि, तत्कालीन भौतिक बदलांमुळे भारतीय समाजव्यवस्था बदलली. त्यातून जातीय स्वरुपात देखील बदल होत आहेत.

पूर्वीच्या जन्मी ज्यांनी पाप केले, त्यांचा जन्म कनिष्ठ जातीत होतो. म्हणून जन्म हा अपघात नसून पूर्वजन्माच्या पाप-पूण्यावर आधारित आहे. याउलट, ज्यांनी पूर्वजन्मी पुण्य केले आहे, ते ब्राम्हण द्विज (twice born) म्हणून जन्माला येतात असा समज आहे. स्पृश-अस्पृश्यतेच्या संकल्पना पुर्वाश्रमींच्या अस्पृश्य जातीतही रुजलेली दिसते. चांभार, महार, मांग, भंगी यांच्यामध्येही अस्पृश्यता पाळली जाते. चांभार स्वतःला महार-मांग यांच्यापेक्षा श्रेष्ठ मानतात. तर, महार-मांग हे भंगी यांच्यापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात.

पूजा-पाठ, व्रतवैफल्ये इ. माध्यमांतून जातीव्यवस्था घट्ट होत असते. देव-देवतांची पूजा व विधी करून त्यांच्यामार्फत आपल्याला अपेक्षित फळ प्राप्त करून घेण्याचा मानव समाज प्रयत्न करीत असतो. त्याअर्थाने होलार समाजाचे देवासमोर मंगलसमयी वाद्य वाजविणे हे आर्थिक नसून धार्मिक वैशिष्ट्ये दिसते, असे मानावयास हरकत नाही.  सामाजिक उतरंडीमध्ये वरच्या स्थानावर असलेल्या जातींचे उतरंडीमध्ये खाली

असलेल्या जातींवर वर्चस्व असते. उतरंडीमध्ये जस जसे खालच्या स्थानावर एखादी जात जात असते तस तसा त्या जातीचा सामाजिक दर्जा खालावत जातो. याउलट उतरंडीमध्ये एखादी जात जस जशी वरच्या स्थानावर जाते तसे तिचे प्रभुत्व अधिकाधिक वाढत जाते. त्यामुळे एकंदरीत उतरंडीमध्ये एखादी जात त्या खालील सर्व जातीचे दमन करते. त्या अर्थाने अनुसूचित जातीमधील सर्व जाती या पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जाती म्हणून गणल्या जातात. आणि त्यांचे अधिकाधिक दमन होताना दिसते. उच्च-नीचतेच्या आधारावर उच्च जातींचा कनिष्ठ जातींबरोबर व्यवहार ठरतो. तो मुख्यतः अस्पृश्यता व भेदभावावर आधारित असतो. प्राचीन काळापासून सध्याच्या अनुसूचित जातीच्या यादीतील सर्व जाती अस्पृश्य समजल्या जात होत्या. त्यामुळे अस्पृश्यता, भेदभाव यांना या सर्व जातींना सामोरे जावे लागत असे. त्यादृष्टीकोनातून होलार समाजाचे वेगळेपण आपल्याला तपासता येईल. तसेच होलार समाजाचे समाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे आकलन करता येईल.

**तक्ता क्र. १: जिल्हानिहाय होलार समाजाची लोकसंख्या**

| अनु. क्र. | जिल्हा | १९६१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोलापूर | १०८२७ | १३५७ | २१,५७१ | २२३१९ | ३००११ |
| २. | सांगली | ५६७९ | ९४९६ | ११,५२७ | १५०९३ | १७९६२ |
| ३. | पुणे | २८२१ | ५३५९ | १२,४९२ | ९०३७ | १३१९१ |
| ४. | सातारा | ४७६९ | ७९३७ | ८,६१० | ११०६२ | १३१३६ |
| ५. | नांदेड | ० | ७८४ | ७८१ | २६९६ | ४५७० |
| ६. | कोल्हापूर | ८६१ | ० | २,५५० | २९३८ | ४०९८ |
| ७. | यवतमाळ | ० | ४१७ | १,१२६ | १४४९ | २८०४ |
| ८. | ठाणे | १२४ | ५१३ | ९३४ | १५२१ | २६४६ |
| ९. | परभणी | ९ | ११५४ | ५३ | ८७९ | २५५५ |
| १०. | बीड | ० | ६९३ | ० | १३०९ | २३०८ |
| ११. | मुंबई उपनगर | ११७ | २२१८ | ० | १८०८ | २२२३ |
| १२. | नाशिक | ४ | १०५८ | १,०४३ | १३९० | २०१८ |
| १३. | अहमदनगर | ६५३ | ८८५ | १९६ | १४०७ | १८९० |
| १४. | लातूर | ० | ० | २३५ | १२९९ | १६६२ |
| १५. | हिंगोली | ० | ० | ० | ६१९ | १३९४ |
| १६. | उस्मानाबाद | ० | ११५८ | ५५९ | ५५२ | ११५६ |
| १७. | जळगांव | २९९ | ३७१ | २८४ | ६०३ | ९५६ |
| १८. | मुंबई (विभाग-१९६१) | १,९९२ | ० | २,३५५ | ८०८ | ९३४ |
| १९. | चंद्रपूर | ० | ३१० | १११ | ६९२ | ६९१ |
| २०. | धुळे | ५६० | ५४२ | ८ | ५२४ | ५६२ |
| २१. | नंदुरबार | ० | ० | ० | ३१० | ५४० |
| २२. | बुलढाणा | ० | १३७८ | ४३३ | ५०३ | ३८० |
| २३. | रायगड | ० | ३८ | ३३ | १७९ | ३३१ |
| २४. | वाशीम | ० | ० | ० | १४४ | २७६ |
| २५. | औरंगाबाद | ० | ६ | १२ | २७ | २६२ |
| २६. | अकोला | ० | ३७० | ११६ | ३७ | १०९ |
| २७. | नागपूर | ० | १४८ | ९८ | ६५ | ८३ |
| २८. | रत्नागिरी | ९३ | ३७ | ३ | १२० | ६६ |
| २९. | वर्धा | ० | ३४ | ५ | ३१ | २७ |
| ३०. | सिंधुदुर्ग | ० | ० | ५ | १५ | २२ |
| ३१. | गोंदिया | ० | ० | ० | ० | १८ |
| ३२. | जालना | ० | ० | २ | १८ | १५ |
| ३३. | गडचिरोली | ० | ० | २४२ | ० | ५ |
| ३४. | अमरावती | ० | ५७ | ६५ | ५ | ४ |
| ३५. | भंडारा | ० | २३४ | ४७ | २ | ३ |
| | एकूण | **२८८०८** | **३६५५४** | **६५४९६** | **७९४६१** | **१०८९०८** |

*स्त्रोत: २०११ जनगणना.*

होलार समाज महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीच्या प्रवर्गात येतो. ते मुख्यतः ग्रामीण भागात राहतात. होलार समाज हा मुखतः सोलापूर, सांगली, पुणे, सातारा, नांदेड, कोल्हापूर, यवतमाळ, मुंबई, अहमदनगर नाशिक व जळगाव जिल्हा येथे वास्तव्यास आहेत. त्यांची लोकसंख्या प्रामुख्याने महाराष्ट्र-कर्नाटक या सीमालगत भागात अधिक दिसून येते. सन १९६१ च्या जनगणनेनुसार होलार समाजाची लोकसंख्या २८,८०८ इतकी होती, तर सन २०११ च्या जणगणनेनुसार लोकसंख्या १,०८,९०८ इतकी आहे. सर्वात जास्त होलार समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रामध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये आहे. तसेच होलार समाज पठारी, मैदानी प्रदेशात वास्तव्य करतो.

होलार समाजाचा पूर्व इतिहास असा आहे की, ते धनगर समाजासाठी वाद्य वाजविण्याची कामे करत असत. संगीतामध्ये मुख्यतः डफ आणि तंबोरा यांचा वापर करतात. होलार समाज लग्नामध्ये व इतर मंगलकार्यामध्ये संगीत (वाद्य) वाजविण्याचे काम करीत असे. आजच्या काळामध्ये सुद्धा हा समाज बँड पथकामध्ये आपल्या संगीताने चांगली साथ देत आहे. या जातीची कोणतीही उपजात किंवा उपविभाग आढळून येत नाही; परंतु इतर राज्यात त्यांचे दुसरे नाव होलाया आहे (पहा, सिंग १९९३). एथोवन (१९२२) यांच्या मताप्रमाणे, होलाया हा शब्द प्रयोग कन्नड टोला या भागातून आलेला आहे. होलाया या शब्दाचा अर्थ मजूर असा होतो. कानडी होलाया या समाजाचा मुख्य व्यवसाय हा मृत प्राणी गावाबाहेर काढणे, त्यांची कातडी व शिंगे काढून विकणे, कातडी पासून चपला बनविणे, जून्या चपला शिवून देणे. इत्यादी. गावात एखादा प्राणी मृत झाला तर तातडीने धावपळ करुन तो प्राणी गावाबाहेर काढून त्याची विल्हेवाट लावतात. हे काम केल्याबद्दल गावातून त्यांना अन्नधान्य दिले जात होते. समाजातील काही लोक दुसऱ्याच्या शेतामध्ये शेतमजूर म्हणून काम करतात व काही लोक किरकोळ विक्रीचा व्यवसाय करतात. होलार समाजातील लोकांना उन्हाळा व हिवाळा या ऋतुमध्ये हाताला काम असते. मात्र पावसाळ्यात त्यांना रोजगार उपलब्ध होत नसतो. आर्थिक आणि शैक्षिणिक दृष्ट्या हे लोक गरीब आहेत. व त्यांच्यामधील मुले हे माध्यमिक पर्यंत शिक्षण पूर्ण करतात व मुली ह्या साधारणतः प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेले आढळतात. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे व पालकांमध्ये शिक्षणाबद्दलची जागृती कमी असल्यामुळे बहुतेक मुले हे माध्यमिक शाळेतून शिक्षण सोडून देतात. मुलगा किंवा मुलगी असो त्यांच्या अंगावर कमी वयातच घराची जबाबदारी पडलेली असते. त्यामुळे ते शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. कुटुंबातील व्यक्ती अजारी पडल्यास आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ते सरकारी दवाखान्यामध्ये उपचार घेतात.

बहुतेक होलार समाजातील व्यक्ती घरामध्ये व बाहेरील लोकांशी बोलताना मराठी बोली भाषेचा वापर करतात. काही मोजक्याच लोकांना हिंदी मधून बोलता येते. कर्नाटक राज्याच्या सीमेलगतच्या होलार समाजाच्या लोकांना कन्नड भाषा समजते. महाराष्ट्रामध्ये ते मराठी देवनागरी भाषेत लिखाण करतात. होलार समाजाची विशिष्ट अशी ओळख नाही. मात्र गडद व मध्यम बांध्याचे सर्वसाधारण लोक त्यांच्यामध्ये आढळतात. पुरुष धोती, कुर्ता, बनियान आणि पायजमा अशा प्रकारचा पेहराव करतात आणि स्त्रिया लुगडी, चोळी आणि तरुण मुली खेड्यामध्ये खडबडीत कापडाची साडी परिधान करतात. विशेषतः कार्यक्रमाच्या निमित्ताने स्त्रिया नाकामध्ये व कानामध्ये रिंगा घालतात.

होलार समाज मांसाहारी असुन ते मटण, मासे, चिकन व अंडी इत्यादी पदार्थ खातात. त्यांचा मुख्य आहार हा ज्वारीची भाकरी, आमटी, भाजी (पालेभाज्या), चटणी (हिरव्या मिर्चीची) पालेभाज्यामध्ये करडई, मेथी आणि शेतामध्ये उपलब्ध असलेल्या इतर भाज्या ते खातात. डाळी, कडधान्ये, फळे व दुध इत्यादी पदार्थ अगदी कमी प्रमाणात त्यांच्या आहारामध्ये आढळतात. इतर अन्नधान्य मध्ये गहू, तांदूळ, बाजरी आणि मका इत्यादींचा वापर करतात. तूर, मुग, उडीद या डाळीचाही कधी कधी त्यांच्या आहारामध्ये समावेश असतो. ते शेंगदाणा, करडई, जवस यांचे तेल स्वयंपाकामध्ये वापरतात.

होलारांना शुद्र समजले जाते. जंगम समाजाचे लोक होलार समाजाचा विवाह विधी (मंगलअष्टके) पार पाडतात. काही खेड्यामध्ये ते इतर मांग व चांभार समाजापासून वेगळे राहतात. वाद्य वाजविणारे शहनाई, हलगी व डफ इत्यादी वाद्य वाजवितात. होलार समाजामध्ये एकपत्नीत्व हा सामाजिक नियम असला तरीही अपवादात्मक परिश्तितीत बहुपत्नीत्व पद्धती या समाजामध्ये मान्य केली जाते. समाजातील आडनावांच्या बाहेर आणि जातीतच विवाह या नियम बंधनकारक मनाला जातो. ते सारख्याच कुळामध्ये विवाह करत नाहीत. होलार समाजामध्ये जावीर, पारसे, केंगार, आयवळे, गेंझे, हेगडे, सोनोने, जाधव, शेकार आणि आवाटे हे कुळ आहेत. समाजामधील कुळामधील कार्यक्रम हा विवाह सोहळे एकत्रित सहभागाने साजरे करतात. हुंड्याची पद्धत आहे. मुलीच्या वडिलांनी मुलाच्या वडिलांना हुंडा द्यावा लागतो त्याची सुरुवात ५० रु. पासून किंवा त्याच्या पुढील रकमेपासून होते. हुंड्याची रक्कम ही पालकांच्या ठरलेल्या वाटाघाटीप्रमाणे व मुलीकडील घरच्या परिस्थितीवर अवलंबून असते. हुंडा हा रोख स्वरुपात किंवा अन्य कोणत्याही स्वरुपात दिला जातो. समाजामध्ये परंपरेनुसार लग्न केल्यानंतर नवऱ्याच्या घरी राहतात. तसेच, भावाच्या विधवा

पत्नीशी किंवा विधुराचा मृत पत्नीच्या बहिणीशी विवाह मान्य केला जातो. नवरा किंवा बायको मधील घटस्पोट घेण्याचे प्रमाण होलार समाजामध्ये नगण्य आहे.

कुटुंबामध्ये महिलांची मुख्य भूमिका असते. स्वयंपाक बनविणे, मुलांचा सांभाळ करणे, शेतमजुरी करणे जळाऊ लाकडे गोळा करणे, पाळीव जनावरांचा सांभाळ करणे आणि कुटुंबाच्या संबधीची इतर सर्व कामे करणे. मात्र घरामध्ये तिला दुय्यम स्थान दिले जाते. ते सर्व सामाजिक आणि धार्मिक कामात सहभागी होतात. घराचे व्यवस्थापन पुरुष मंडळी बघत असतात.

बळाचा जन्म झाल्यानंतर पाचव्या आणि सहाव्या दिवशी पूजा केली जाते. त्याला पाचवी व छटी असे म्हणतात. बहुतेक करून त्याच दिवशी बाळाचे नामकरण केले जाते. आईला व बाळाला गरम पाण्याने अंघोळ घातली जाते. लहान मुलांना गोड आणि डाळ भात तयार करून दिला जातो.

मृत्यू नंतर होलार समाजामध्ये अंत्यसंस्कार अग्निदहन पद्धतीने केले जातात. मृत्यूचे दहा दिवस नंतर दशक्रिया विधी केला जातो त्यामध्ये जवळचे नातेवाईकांना बोलावून जेवणाची मेजवानी दिली जाते. १२ व्या, १३ व्या दिवशी पिंडदान केले जाते. या विधीसाठी जंगम समाजातील व्यक्तीची सेवा घेतली जाते. तीन वर्षाखालील लहान मुलांना मृतूनंतर जमिनीत पुरले जाते.

होलार हिंदु धर्म मानतात. ते मरीआई, ताई कर्नाटका या देवतेची उपासना करतात. काही लोक त्या देवीला मकुबाई असे म्हणतात. जेजुरी व कोल्हापूरचा ज्योतिबा यांची ते भक्ती करतात. तसेच शिंगणापूरचा महादेव व तुळजापूरची तुळजाभवानी यांचीही ते पूजन करतात. होलार समाजातील काही स्त्रिया अंबाबाईची हातावरती परडी घेऊन मंगळवारी व शुक्रवारी पाच घरे मागतात. ते लोक पौष महिन्यातील खंडोबाच्या यात्रेला जातात. चैत्राच्या महिन्यामध्ये महादेवाची यात्रा केली जाते. मुख्यतः ते दिवाळी, दसरा, महाशिवरात्री, गुढीपाडवा, पित्रमोक्ष अमावस्या, रामनवमी, एकादशी, आषाढी एकादशी, नागपंचमी, गणेश चतुर्थी होळी आणि मकर संक्रात इत्यादी सण साजरे करतात.

होलार समाज संशोधन: माहिती संकलन





## प्रकरण २

# संशोधन पद्धती

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

१. महाराष्ट्रातील होलार समाजाच्या सामाजिक—आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करणे.

२. होलार जातीच्या चुकीच्या जात नोंदीं अभ्यासणे.

महाराष्ट्रातील होलार समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मगासलेल्या स्थितीच्या अभ्यास करण्याच्या उद्देशाने होलार समाजातील लोकप्रतिनिधींशी वेळोवेळी प्रत्यक्ष संवाद साधला गेला. या समाजाच्या नेमक्या कोणकोणतत्या अडी अडचणी व समस्या आहेत हे समजून घेण्यासाठी दिनांक ५ जानेवारी २०१६ रोजी राज्यस्तरीय कार्यशाळेचे पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे आयोजन करण्यात आले. यावेळी या समाजातील सर्व स्तरावरील प्रतिनिधींनी होलार समाजाच्या मागण्या व समस्यांविषयी चर्चा केली. या चर्चासत्रात महाराष्ट्रातील चंद्रपूर, हिंगोली, सांगली, लातूर, परभणी, पुणे, बीड, उस्मानाबाद, ठाणे, मुंबई, सातारा, व कोल्हापूर या जिल्ह्यांमधून लोक उपस्थित राहिले. त्याचबरोबर, मुंबई येथे (स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, मुबई.) येथे होलार समाजाच्या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.  सदर आयोजित केलेल्या कार्यशाळेत मुंबई व त्यालगत असलेल्या भागातून आलेले समाज प्रतिनिधी उपस्थित होते. दिनांक २७ सप्टेंबर २०१६ रोजी या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध भागांमधून एकूण २५० होलार प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी होलार समाजाच्या मागासलेपणा बाबत आपले मत मांडले. अशाप्रकारे प्रत्यक्ष संवाद साधून या समाजाच्या चालीरीती, व्यवसाय, वास्तव्य, शिक्षण अशा विविध बाबींविषयी माहिती संकलित केली.




होलार समाजाचे राज्यस्तरीय चर्चासत्र





पुणे व मुंबई येथील होलार समाजाच्या राज्यस्तरीय चर्चासत्रात उपस्थित प्रतिनिधी

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धतीने महाराष्ट्रातील होलार समाजाकडून कुटुंबाबाबतची माहिती संकलीत करण्यात आली. यात मुलाखत अनुसूची आणि गटचर्चा सूची या साधनांद्वारे सांख्यिकीय व गुणात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या माहितीचे संकलन करण्यात आले. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमध्ये या समाजाच्या लोकांचे वास्तव्य असल्याने २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील या समाजाची लोकसंख्या साधारणपणे सर्व जिल्ह्यांमध्ये वास्तव्यास असल्याने त्यापैकी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा अशा दोन्ही विभागातून सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येकी दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. यामध्ये सोलापूर, सांगली, परभणी व बीड या जिल्ह्यांची निवड करण्यात आली (पहा तक्ता क्र. १ व तक्ता क्र. २).




मसुदा अहवालावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना बार्टीचे महासंचालक



माहिती संकलनासाठी समतादूतांची मार्गदर्शनपर बैठक

# अभ्यासाचे क्षेत्र व उत्तरदात्यांच्या माहितीचा गोषवारा

आकृती क्र. २: महाराष्ट्र राज्याचा नकाशा









आकृती क्र. २: मराठवाडा विभागातील परभणी व बीड जिल्हा




आकृती क्र. ३: पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व सोलापूर जिल्हा

या जिल्ह्यांमधून होलार कुटुंबांची निवड संभाव्यता नमुना निवड पद्धतीने (Probability Sampling Method) करण्यासाठी होलार समाजाच्या कार्यकर्त्यांकडून संपूर्ण जिल्ह्यातील कुटुंबांची गावनिहाय यादी मागविण्यात आली. यासाठी दिनांक १५ जानेवारी २०१६ रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील होलार समाजाच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. यावेळी सर्वेक्षणादरम्यान वापरण्यात येणाऱ्या नमुना निवड पद्धतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली व उपरोक्त चार जिल्ह्यांमधून गावनिहाय होलार कुटुंबांची यादी तयार करण्याची जबाबदारी या प्रतिनिधींनी घेतली. तसेच याच बैठकीत सदर समाजाच्या आर्थिक सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखत अनुसुचीवर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये उपस्थित असलेल्या प्रतिनिधींची मते जाणून घेऊन त्यांनी केलेल्या सूचनांचा समावेश अंतिम मुलाखत अनुसूचीमध्ये करण्यात आला. अशा रीतीने, ही अनुसूची जास्तीत जास्त शास्त्रीय व पूर्वग्रहरहीत करण्यावर भर दिला गेला.

होलार प्रतिनिधींनी सादर केलेल्या कुटुंब यादीनुसार बीड (६०८ कुटुंबे), परभणी (६३० कुटुंबे), सांगली (३१५१ कुटुंबे) आणि सोलापूर (२२९७ कुटुंबे) अशाप्रकारे एकूण मराठवाडा व पश्चिम महारष्ट्रातील एकूण ६६८६ कुटुंबाची यादी तयार केली गेली. या यादीचा नमुना निवड प्रकियेत उपयोग केला गेला. या यादीतून शास्त्रीय आधारावर एकूण कुटुंब संख्येच्या २०% कुटुंबे ही यादृच्छिक नमुना निवड (Random

sampling) पद्धतीने निवडण्यात आली. या नुसार निवड झालेल्या कुटुंबाची संख्या पुढील तक्त्यात दर्शविली आहे (पहा तक्ता क्र. २).

होलार समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे व या समाजाच्या जातीविषयक चुकीच्या नोंदींचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. तसेच एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करून, या अनुसूचीद्वारे माहितीचे संकलन कसे करायचे याचे मार्गदर्शन व प्रशिक्षण माहिती संकलित करणाऱ्या बार्टीच्या समतादूतांना करण्यात आले. अशाप्रकारे एकूण १३८० कुटुंबांकडून या मुलाखत अनुसूचीद्वारे गुणात्मक व सांख्यिकीय माहितीचे संकलन करण्यात आले. तसेच होलार समाजाचे वास्तव्य असलेल्या काही वाड्या वस्त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या सद्य स्थितीचे निरीक्षण करण्यात आले. उपरोक्त चारही जिल्ह्यांमध्ये दिनांक २८/७/२०१६ ते १४/१०/२०१६ या दरम्यान प्राथमिक माहितीचे संकलन केले गेले. संकलित केलेल्या माहितीचे Statistical Package for the Social Sciences (SPSS), या सॉफ्टवेअर मध्ये विश्लेषण केले आहे. त्याआधारे विश्लेषण करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. २: जिल्हानिहाय होलार समाजाची लोकसंख्या**

| अ.क्र. | जिल्हा | सर्वेक्षण केलेली कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सांगली | ६६३ | ४८.० |
| २ | सोलापूर | ४७० | ३४.१ |
| ३ | परभणी | १२५ | ०९.१ |
| ४ | बीड | १२२ | ०८.८ |
| ५ | एकूण | १३८० | १००.० |

**तक्ता क्र.३ : वयोगटानुसार वर्गवारी**

| अ.क्र. | वयोगट | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १४ वर्षे ते १८ वर्षे | ८ | ०.६ |
| २ | १९ वर्षे ते ४० वर्षे | ४५० | ३२.६ |
| ३ | ४१ वर्षे ते ६० वर्षे | ६०० | ४३.५ |
| ४ | ६० वर्षाच्या पुढे | ३१० | २२.५ |
| ५ | नमूद न केलेले | १२ | ०.९ |
| ६ | एकूण | १३८० | १००.० |

**तक्ता क्र.४ : लिंगनुसार वर्गवारी**

| अ.क्र. | लिंग | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्त्री | १३५ | ०९.८ |
| २ | पुरुष | १२४५ | ९०.२ |
| ३ | एकूण | १३८० | १००.० |

**तक्ता क्र.५: विभाग व लिंगनिहाय लोकसंख्येचे प्रमाण**

| विभाग | लिंगानुसार लोकसंख्येचे प्रमाण | | | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | महिला | पुरुष | तृतीय पंथी | |
| मराठवाडा | ६५६ | ६५५ | ० | १३११ |
| | ५०.०% | ५०.०% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २८१६ | २८०७ | १ | ५६२४ |
| | ५०.१% | ४९.९% | ०.०% | १००.०% |
| एकूण | ३४७२ | ३४६२ | १ | ६९३५ |
| | ५०.१% | ४९.९% | ०.०% | १००.०% |

तक्ता क्र.५ नुसार मराठवाड्यातील होलार समाजात महिला व स्त्रियांचे सम प्रमाण दिसून येते. तर पश्चिम महाराष्ट्रात पुरुषांच्या तुलनेत (५०.१%) स्त्रियांचे प्रमाण (४९.९%) किंचित जास्त आहे.

**तक्ता क्र.६: वैवाहिक स्थिती**

| अ.क्र. | वैवाहिक स्थिती | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घटस्फोटीत /विधवा | ६६ | ४.८० |
| २ | विवाहित | १२८१ | ९२.८० |
| ३ | अविवाहित | २५ | १.८० |
| ४ | विधूर | ८ | ०.६ |
| | एकूण | १३८० | १००.० |

तक्ता क्र. ६ नुसार होलार समाजातील एकूण ९२.८० टक्के उत्तरदाते विवाहीत तर केवळ १.८० टक्के उत्तरदाते अविवाहीत आहेत. घटस्फोटीत/ विधवा असणाऱ्या महिलांचे प्रमाण ४.८० टक्के दिसून येते. तर विधुर असणारे पुरुष केवळ ०.६ टक्के आहेत.

**तक्ता क्र.७: दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण**

| अ.क्र. | दिव्यांग व्यक्ती | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३९ | २.८ |
| २ | नाही | १३४१ | ९७.२ |
| | एकूण | १३८० | १००.० |

तक्ता क्र. ७ नुसार होलार समाजात २.८ टक्के दिव्यांग लोकांचे प्रमाण दिसून येते.

**तक्ता क्र.८: वयोगटानुसार लोकसंख्येचे प्रमाण**

| विभाग | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ० ते ६ | ६ ते १४ | १४ ते १८ | १८ ते ४० | ४० ते ६० | ६० + | प्रतिक्रिया नाही | एकूण |
| मराठवाडा | १२५ | २४४ | १२० | ५१० | १९८ | ११० | ४ | १३११ |
| | ९.५% | १८.६% | ९.२% | ३८.९% | १५.१% | ८.४% | ०.३% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ४९५ | ९०१ | ४४६ | २३९७ | ९१८ | ४३० | ३७ | ५६२४ |
| | ८.८% | १६.०% | ७.९% | ४२.६% | १६.३% | ७.६% | ०.७% | १००.०% |
| एकूण | ६२० | ११४५ | ५६६ | २९०७ | १११६ | ५४० | ४१ | ६९३५ |
| | ८.९% | १६.५% | ८.२% | ४१.९% | १६.१% | ७.८% | ०.६% | १००.०% |

तक्ता क्र. ८ नुसार होलार समाजातील १८ ते ४० वयोगटातील सर्वाधिक लोकसंख्येचे प्रमाण ४१.९ टक्के आहे. यापैकी ३८.९ टक्के लोकसंख्या मराठवाड्यातील तर ४२.६ टक्के लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रातील आहे. तसेच ६ ते १४ वयोगटातील १८.६ टक्के लोक मराठवाड्यात तर १६ टक्के लोक पश्चिम महाराष्ट्रात आहेत. तसेच सर्वात कमी लोकसंख्या ६० पेक्षा जास्त वायोगटातील दिसून येते.





माहिती संकलन व गटचर्चे साठी जमलेले होलार कुटूंबे

**तक्ता क्र.९: शिक्षणाचे प्रमाण**

| विभाग | उत्तरदात्यांचे शिक्षणाचे प्रमाण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | उच्च शिक्षित | प्रतिक्रिया नाही | एकूण |
| मराठवाडा | १३७ | ५६ | ३१ | १२ | ८ | २ | ० | ० | २४६ |
| | ५५.७% | २२.८०% | १२.६% | ४.९% | ३.३% | ०.८% | ०.०% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३६१ | २९० | २९३ | ८८ | ५७ | ३१ | ९ | ५ | ११३४ |
| | ३१.८% | २५.५० | २५.८% | ७.८% | ५.०% | २.७% | ०.८% | ०.४% | १००.०% |
| एकूण | ४९८ | ३४६ | ३२४ | १०० | ६५ | ३३ | ९ | ५ | १३८० |
| | ३६.१% | २५.१०% | २३.५% | ७.२% | ४.७% | २.४% | ०.७% | ०.४% | १००.०% |

तक्ता क्र. ९ नुसार सर्वेक्षणासाठी होलार समाजातील कुटुंबांतील प्रमुख किंवा माहितीगार व्यक्तींकडून कुटुंबांची माहिती घेण्यात आली. त्यामध्ये उत्तरदाते म्हणून अशिक्षित लोकांचे सर्वात अधिक प्रमाण मराठवाड्यात दिसत असून ते ५५.७ टक्के एवढे आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात अजूनही ३१.८ टक्के लोक अशिक्षित आहेत. तसेच, प्राथमिक ते उच्च शिक्षण अशा सर्व पातळ्यांवर पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील होलार कुटुंबातील उत्तरदात्यांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी दिसत आहे. होलार समाजातील उच्च शिक्षित उत्तरदाते म्हणून फक्त पश्चिम महाराष्ट्रातच ०.७ टक्के प्रमाण दिसून येते. यावरुन होलार समाजातील उच्च शिक्षणाचा प्रभाव अत्यल्प आहे.

## अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधना अंतर्गत पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या भागातील होलार समाजाचे सर्वेक्षण करण्यात आले असून या मध्ये प्राप्त झालेले निष्कर्ष हे या भागातील होलार समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी व नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकेल असे वाटते. त्या आधारे शासनास होलार समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने विविध योजना, धोरणे व कार्यक्रम इत्यादी आखून राबविण्यास वाव

मिळू शकतो. सदर संशोधनातील निष्कर्ष हे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील होलार समाजासाठीच संबंधित असले तरी यावरुन इतर ठिकाणची ही परिस्थीती लक्षात घेण्यास मदत होईल.



मंगळवेढा तालुक्यातील होलार समाजाच्या प्रतिनिधींशी गटचर्चा



सोलापूर जिल्ह्यातील होलार कुटुंबाचे माहिती संकलन



पुणे येथे होलार समाजाच्या राज्यस्तरीय एकदिवसीय चर्चासत्रात उपस्थित प्रतिनिधी





## प्रकरण ३

# महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व होलार समाजाची सद्यस्थिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, या प्रवर्गातील काही प्रमुख जातींची सद्यस्थिती व या अनुषंगाने होलार समाजाचे स्थान याविषयी चर्चा केली आहे. देशात दर दहा वर्षांनी होणाऱ्या जनगणनेची आकडेवारी सामाजिक गटांच्या शिक्षण, आरोग्य, उपलब्ध सोयी सुविधा, कामगारांची संख्या अशा विविध घटकांची स्थिती दर्शविते. मानव विकासाच्या मानकांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, दरडोई उत्पन्न इत्यादी घटक महत्वाचे ठरतात. संविधानाने देखील वंश, जात, लिंग, भौगोलिक क्षेत्र, वय असा कुठलाच भेदभाव न करता गुणवत्ता पूर्ण जीवन जगण्याचा अधिकार भारतातील प्रत्येक नागरिकास दिला आहे. परंतु तरीही मुलभूत गरजांपासून समाजातील काही घटक वंचित राहिलेला दिसून येतो. यामध्ये अनुसूचित जातीमधील लोकांचा समावेश होतो. अजूनही अनुसूचित जातींतील अनेक सामाजिक गटाचे मागासलेपण दिसून येते. खुल्या सामाजिक घटकांशी अनुसूचित जातीची तुलना करता हे मागासलेपण स्पष्टपणे तर दिसून येतेच, परंतु अनुसूचित जातीमधीलदेखील काही विशिष्ट जातींच्या तुलनेत अजूनही इतर अनुसूचित जाती मागासलेल्या अवस्थेत दिसून येतात. त्याअर्थाने होलार ही मागासलेल्या प्रवर्गात येणारी जात आहे.

या समाजाच्या सर्वेक्षणातून होलार कुटुंबांना आवश्यक असणाऱ्या विविध सोयी सुविधा तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या दिसून येतात. याबातचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १०: अनुसूचित जातींची लोकसंख्या**

| अ. क्र. | भौगोलिक क्षेत्र | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | अनुसूचित जाती | प्रमाण % |
| १ | भारत | १२१,०८,५४,९७७ | २०,१३,७८,३७२ | १७.०० |
| २ | महाराष्ट्र | ११,२३,७४,३३३ | १,३२,७५,८९८ | १२.०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र.१० नुसार २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातीचे प्रमाण १७ टक्के एवढे दिसून येते तर महाराष्ट्रात हेच प्रमाण १२ टक्के एवढे आढळून येते.

**तक्ता क्र.११: जिल्ह्यानिहाय होलार समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण**

| अ.क्र. | जिल्हा | होलार समाजाची लोकसंख्या | प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | | १०८९०८ | |
| १ | सोलापूर | ३००११ | २७.५६ |
| २ | सांगली | १७९६२ | १६.४९ |
| ३ | परभणी | २५५५ | २.३५ |
| ४ | बीड | २३०८ | २.१२ |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. ११ मध्ये सोलापूर, सांगली, परभणी, बीड या जिल्ह्यांमधील होलार समाजाच्या लोकसंख्येचे महाराष्ट्रातील एकूण होलार समाजाच्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण दिसून येते. या चार जिल्ह्यांपैकी सर्वाधिक प्रमाण हे सोलापूर जिल्ह्यात २७.५६ टक्के एवढे दिसून येते. तर बीड जिल्ह्यात २.१२ टक्के होलार समाजाचे लोक आहेत.

**तक्ता क्र. १२: धर्मनिहाय होलार समाजाचे अनुसूचित जातीतील प्रमाण**

| अ.क्र. | सामाजिक गट | एकूण लोकसंख्या | प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १ | हिंदू होलार | १०७९६८ | ०.८१ |
| २ | हिंदू बिगर होलार अनु.जाती | ७९५२१६२ | ५९.९० |
| ३ | शिख होलार | ११ | ०.०० |
| ४ | शिख बिगर होलार अनु.जाती | ११४७३ | ०.०९ |
| ५ | बौद्ध होलार | ९२९ | ०.०० |
| ६ | बौद्ध बिगर होलार अनु.जाती | ५२०३३५५ | ३९.२० |
| ७ | सर्व धर्मीय अनु.जाती | १३२७५८९८ | १००.०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र.१२ नुसार महाराष्ट्रातील एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी हिंदू धर्मीय होलार लोकांचे प्रमाण ०.८१ टक्के दिसून येते. हे प्रमाण हिंदू बिगर होलार अनुसूचित जातीच्या तुलनेत खूप कमी दिसते. बौद्ध बिगर होलार अनुसूचित जातीचे प्रमाण ३९.२० टक्के एवढे दिसून येत आहे. तर शिख आणि बौद्ध धर्मीय होलार असणाऱ्यांचे प्रमाण हे नगण्य दिसून येते.

**तक्ता क्र.१३: सामाजिक गटनिहाय पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोताचे प्रमाण**

| सामाजिक गट | पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोताचे प्रमाण (%) | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नळाचे शुद्ध पाणी | नळाचे अशुद्ध पाणी | बंदिस्त विहीर | उघडी विहीर | हातपंप | बोअर वेल | पावसावर अवलंबून | नदी / कालवा/ तळे | इतर | |
| अनुसूचित जाती | ५६.२ | ११.९ | १.९ | १० | १२.८ | ५.२ | ०.१ | ०.८ | १.३ | १०० |
| बिगर अनु.जाती | ५६.४ | ११.५ | २.३ | १२.६ | ९.४ | ५.७ | ०.४ | ०.८ | १.० | १०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. १३ नुसार पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोताचे प्रमाण हे बिगर अनुसूचित जातीमध्ये अनुसूचित जातीच्या तुलनेत किंचित फरकाने जास्त दिसून येते. नळापासून शुद्ध पाणी मिळणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ५६.४० टक्के व ५६.२० टक्के एवढे दिसते. तर नळाचे अशुद्ध पाणी वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुसूचित जातीमध्ये तुलेनेने जास्त ११.९० टक्के एवढे आहे. बंदिस्त विहिरीपासून पाणी मिळविणाऱ्या अनुसूचित जातीमधील कुटुंबांचे प्रमाण हे तुलनेने १.९० टक्के कमी दिसून येते.

**तक्ता क्र.१४: सामाजिक गटनिहाय पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे ठिकाण**

| सामाजिक गट | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे ठिकाण | | | |
|---|---|---|---|---|
| | राहत्या परिसरातच | परिसरा जवळ | राहत्या ठिकाणा पासून दूर | एकूण |
| अनुसूचित जाती | ५२.८० | ३१.९० | १५.३० | १०० |
| बिगर अनु.जाती | ६०.५० | २६.९० | १२.७० | १०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. १४ नुसार पिण्याच्या पाण्याचे स्त्रोताचे ठिकाण अनुसूचित जातीमध्ये राहत्या परिसरातच असण्याचे प्रमाण ५२.८ टक्के आहे. तर बिगर अनु. जाती मध्ये हे प्रमाण तुलनेने जास्त म्हणजेच ६०.५ टक्के एवढे आहे. तसेच राहत्या ठिकाणाहून दूर पाण्याचा स्त्रोत असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनु. जातीमध्ये जास्त दिसते. हे प्रमाण १५.३ टक्के एवढे आहे. तर बिगर अनु सूचित जातीमध्ये ते १२.७ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र.१५: सामाजिक गटनिहाय न्हाणीघर उपलब्धतेचे प्रमाण**

| अनु. क्र. | सामाजिक गट | घरात न्हाणीघर उपलब्धतेचे प्रमाण (%) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | घरातच मोरी असलेली घरे | घराच्या बाहेर न्हाणीघर असलेली घरे | न्हाणीघर नसलेली घरे | एकूण |
| | अनुसूचित जाती | ३८.७५ | १७.१० | ४४.१५ | १०० |
| | अनुसूचित जमाती | २८.१५ | ११.४० | ६०.४५ | १०० |
| | खुला गट | ५२.९५ | १५.३५ | ३१.७० | १०० |

स्त्रोत :राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण यांची ६९ वी फेरी

तक्ता क्र.१५ नुसार अनुसूचित जातीमध्ये घरातच मोरी असण्याचे प्रमाण हे खुल्या गटाच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून येते. हे प्रमाण अनुक्रमे ३८.७५ टक्के व २८.१५ टक्के असल्याचे दिसते. तसेच अनुसूचित जातीमध्ये १७.१ टक्के घरांकडे न्हानीघर आहे तर ४४.१५ टक्के घरांकडे न्हानीघरच नसल्याचे दिसून येते. अनुसूचित जातींच्या तुलनेत खुल्या गटामध्ये हेच प्रमाण जास्त १५.३५ टक्के व ३१.७० टक्के असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.१६: होलार समाजातील सोयी-सुविधा उपलब्धत असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र. | सोयी सुविधा | उपलब्ध असलेली कुटुंबे (%) | उपलब्ध नसलेली कुटुंबे (%) | एकूण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | पाण्याची उपलब्धता | ७६.३० | २३.७० | १०० |
| २ | वीज | ८३.३० | १६.७० | १०० |
| ३ | वाहतूक व्यवस्था | ६५.८० | ३४.२० | १०० |
| ४ | पक्के रस्ते | ७१.६० | २८.४० | १०० |
| ५ | दवाखाना | ७६.६० | २३.४० | १०० |
| ६ | सांडपाणी व्यवस्था | ५५.२० | ४४.८० | १०० |
| ७ | शौचालय | ६४.७० | ३५.३० | १०० |
| ८ | प्राथमिक शाळा | ९२.९० | ७.१० | १०० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. १६ नुसार असे दिसून येते कि, अजूनही २३.७ टक्के कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाहीत तर २३.४ टक्के कुटुंबे त्यांच्या घरालगत दवाखाना उपलब्ध नसल्याचे सांगतात. तसेच, अजूनही ४४.८ टक्के कुटुंबांना सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे दिसते. तर ३४.२ टक्के कुटुंबे वाहतूक

व्यवस्था उपलब्ध नसल्याचे सांगतात. यावरून होलार समाजाला जीवनावश्यक सेवा-सुविधा मिळणे आवश्यक आहे असे वाटते.

**तक्ता क्र.१७: सामाजिक गटनिहाय दिव्यांगतेचे प्रमाण**

| सामाजिक गट | एकूण दिव्यांग लोकसंख्या | दृष्टीदोष | कर्णदोष | मूक | हालचाल | मतीमंद | मानसिक आजार | बहु विकलांग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | ४०६२७७ | २०.९१ | १४.३५ | ९.८८ | १९.५१ | ५.४४ | १.९२ | ५.५५ | २२.४४ |
| बिगर अनु.जाती | २५५७११५ | १९.१३ | १६.२३ | १६.९५ | १८.३५ | ५.४० | १.९९ | ५.५४ | १६.४१ |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र.१७ नुसार महाराष्ट्रातील एकूण दिव्यांग अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी २०.९१ टक्के लोकांना दृष्टीदोष तर १४.३५ टक्के लोकांना कर्णदोष असल्याचे प्रमाण दिसून येते. बिगर अनुसूचित जातीमध्ये हे प्रमाण तुलनेने कमी असून ते अनुक्रमे १९.१३ टक्के व १६.२३ टक्के एवढे दिसून येते. तसेच हालचाल करण्याची अक्षमता, मतिमंदत्व व बहुविकलांग या प्रकारांमध्ये अनुसूचित जातीमधील लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. हे प्रमाण अनुक्रमे १९.५१ टक्के, ५.४४ टक्के तसेच ५.५५ टक्के एवढे दिसत आहे. होलार समाजाच्या सर्वेक्षणातून असे दिसून येते की होलार समाजात २.८ टक्के कुटुंबांमध्ये अपंग व्यक्तींचे प्रमाण आहे. (पहा तक्ता क्र.७ )

**तक्ता क्र.१८: सामाजिक गटनिहाय घरांची अवस्था**

| सामाजिक गट | कुटुंबांच्या घरांची अवस्था | | | |
|---|---|---|---|---|
| | चांगली | जगण्याजोगी | मोडकळीस आलेल्या अवस्थेत | एकूण |
| अनुसूचित जाती | ५६.४० | ३७.३० | ६.३० | १०० |
| बिगर अनु .जाती | ६५.३० | ३०.७० | ४.०० | १०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. १८ नुसार अनुसूचित जातीमधील ५६.४ टक्के कुटुंबांच्या घरांची अवस्था चांगल्या स्वरूपाची असून हेच प्रमाण बिगर अनुसूचित जातीमध्ये ६५.३० टक्के एवढे दिसून येते. अनुसूचित जातीतील ३७.३ टक्के कुटुंबाची अवस्था बरी तर अनुसूचित जातींमध्ये हेच प्रमाण ३०.७० टक्के एवढे दिसत आहे. अनुसूचित

जातीतील ६.३० टक्के कुटुंबांच्या घरांची अवस्था मोडकळीस आलेल्या स्वरूपात दिसून येते. हेच प्रमाण बिगर अनुसूचित जातींसाठी ४ टक्के एवढे दिसून येते. यावरून बिगर अनुसूचित जातीच्या तुलनेत अनुसूचित जातीच्या कुटुंबांच्या घरांची अवस्था दयनीय दिसून येते.

**तक्ता क्र.१९: सामाजिक गटनिहाय घरांची मालकी**

| **सामाजिक गट** | **घराची मालकी (%)** | | | **एकूण (%)** |
|---|---|---|---|---|
| | स्वत:चे | भाड्याचे | इतर | |
| अनुसूचित जाती | ८०.३० | १५.४० | ४.३० | १०० |
| बिगर अनु .जाती | ८१.३० | १५.८० | २.९० | १०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. १९ नुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील ८०.३० टक्के घरांची स्वत:ची मालकी दिसून येते तर बिगर अनुसूचित जातीमधील स्वतःच्या मालकीचे घर असण्याचे प्रमाण तुलनेने जास्त म्हणजेच ८१.३० टक्के एवढे दिसते. भाड्याच्या घराचे प्रमाण अनु.जातीमध्ये १५.४० तर बिगर अनु.जातीमध्ये १५.८० टक्के दिसून येते. याव्यतिरीक्त इतर प्रकारातील घरांचे प्रमाण अनुसूचित जातीत जास्त असून ते ४.३० टक्के एवढे दिसत आहे. या प्रकारामध्ये अतिक्रमित जागा व झोपडपट्टीचे प्रमाण असते.

**तक्ता क्र.२०: होलार समाजातील घराची मालकी**

| **अ.क्र.** | **घराची मालकी** | **वारंवारता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | अतिक्रमित | १२० | ८.७० |
| २ | स्वत:चे | ११६१ | ८४.१० |
| ३ | भाड्याचे | ९९ | ७.२० |
| | एकूण | १३८० | १००.० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. २० नुसार एकूण ८४.१० टक्के होलार कुटुंबांकडे स्वत:चे घर आहे. तर ८.७० टक्के कुटुंबे अतिक्रमित व ७.२० टक्के कुटुंबे भाड्याच्या घरात राहतात. हे प्रमाण स्वत:च्या घराच्या प्रमाणाच्या तुलनेत कमी असले तरी विचार करण्याजोगे आहे.

**तक्ता क्र.२१: होलार समाजातील घराचा प्रकार**

| अ.क्र. | घराचा प्रकार | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कच्चे | ७११ | ५१.५० |
| २ | पक्के | ६६९ | ४८.५० |
| | एकूण | १३८० | १००.० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. २१ होलार समाजातील घरांचे स्वरूप दर्शवित आहे. यानुसार एकूण ५१.५० टक्के होलार कुटुंबे कच्च्या स्वरूपाच्या घरात राहत असल्याचे दिसून येते. तर ४८.५० टक्के कुटुंबे पक्क्या घरात राहतात. या वरून कच्च्या स्वरूपाच्या घरात राहणाऱ्या होलार कुटुंबांचे प्रमाण अधिक दिसत आहे.

**तक्ता क्र.२२: जातीनिहाय कामगारांचे प्रमाण**

| अनुसूचित जातीचे नाव | कामगार लोकसंख्या | | | एकूण लोक संख्येतील प्रमाण (%) | कामगार नसलेली लोकसंख्या | | | एकूण लोक संख्येतील प्रमाण (%) | एकूण प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण कामगार लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | | एकूण कामगार नसलेली लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | | |
| अनु.जाती | ५,८३१,१०८ | ३,६७०,८०६ | २,१६०,३०२ | ४४ | ७,४४४,७९० | ३,०९६,९५३ | ४,३४७,८३७ | ५६ | १०० |
| महार | ३,५३४,८७४ | २,२०२,६१३ | १,३३२,२६१ | ४४ | ४,४७१,१८६ | १,८६७,६१७ | २,६०३,५६९ | ५६ | १०० |
| मातंग | १,१३३,९४७ | ६८६,०८१ | ४४७,८६६ | ४६ | १,३५४,५८४ | ५८०,४८५ | ७७४,०९९ | ५४ | १०० |
| चांभार | ५९६,२९९ | ४०१,६२९ | १९४,६७० | ४२ | ८१४,७७३ | ३२७,५११ | ४८७,२६२ | ५८ | १०० |
| मेहतर-भंगी | ७८,४५८ | ५४,४६५ | २३,९९३ | ३६ | १३८,७०८ | ५४,५५९ | ८४,१४९ | ६४ | १०० |
| ढोर | ४३,३४८ | ३०,१७५ | १३,१७३ | ३७ | ७२,९३९ | २८,८५७ | ४४,०८२ | ६३ | १०० |
| होलार | ५१,०४१ | ३०,५४५ | २०,४९६ | ४७ | ५७,८६७ | २४,९४६ | ३२,९२१ | ५३ | १०० |
| खाटिक | ४०,५२१ | ३०,२७४ | १०,२४७ | ३७ | ६७,९७० | २५,३३७ | ४२,६३३ | ६३ | १०० |

स्त्रोत: २०११ जनगणना

उदरनिर्वाह आणि आर्थिक उन्नतीसाठी रोजगार असणे गरजेचे असते. तक्ता क्र. २२ नुसार अनुसूचित जातीमध्ये एकूण कामगारांचे प्रमाण ४४ टक्के तर कामगार नसलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ५६ टक्के एवढे आहे. होलार समाजातील कामगारांचे प्रमाण ४७ टक्के आहे. त्याचबरोबर मातंग व महार समाजातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे ४६ टक्के व ४४ टक्के असे दिसून येते. म्हणजेच अनुसूचित जातीमधील प्रमुख

जातीच्या तुलनेत होलार समाजाच्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक आहे असे दिसते. याउलट होलार समाजाच्या कामगार नसलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ५३ टक्के एवढे लक्षणीय आहे.

**तक्ता क्र.२३: होलार समाजातील कुटुंबांचे पारंपारीक व्यवसायाचे प्रमाण**

| अ.क्र | पारंपारीक व्यवसाय | होय % | नाही % | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | वाद्य वाजविणे | ६१.२० | ३८.८० | १०० |
| २ | चपला शिवणे | ४७.६० | ५२.४० | १०० |
| ३ | दोरखंड तयार करणे | १९.८० | ८०.२० | १०० |
| ४ | मेलेल्या जनावरांची कातडी काढणे | १९.४० | ८०.६० | १०० |
| ५ | घोंगडी विणणे | १४.३० | ८५.७० | १०० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. २३ नुसार होलार समाजात वाद्य वाजविणे हा पारंपारीक व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक दिसून येते. यामध्ये सूर, डफ, सनई या वाद्यांचा समावेश होतो. हे प्रमाण ६१.२० टक्के एवढे आहे. पूर्वकाळात लोकांच्या मंगल कार्यात, तसेच सैन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वाद्य वाजविले जात असे. परंतू कालांतराने हा व्यवसाय लयास गेला. त्यामुळे हा समाज जुन्या चपला शिवण्याचे काम तसेच दोरखंड तयार करण्याचे काम करू लागला असे मत होलार समाजातील कार्यकर्त्यांनी मांडले आहे. उपरोक्त तक्त्यानुसार चपला शिवणे हा पारंपारीक व्यवसाय असण्याचे प्रमाण ४७.६० टक्के एवढे दिसून येते. तसेच दोरखंड तयार करणे, मेलेल्या जनावरांची कातडी काढणे आणि घोंगडी विणणे या पारंपारीक व्यवसायांचे प्रमाण तुलनेने कमी म्हणजेच अनुक्रमे १९.८० टक्के, १९.४० व १४.३० टक्के एवढे दिसून येते.





सांगली जिल्ह्यातील होलार वस्ती

**तक्ता क्र.२४: होलार समाजातील कुटुंबाचा मुख्य व्यवसाय**

| अ.क्र. | व्यवसाय | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेतमजूर | ४४१ | ३२.० |
| २ | शेती | १६० | ११.६० |
| ३ | व्यवसायिक | ६१ | ४.४० |
| ४ | सरकारी नोकरी | ५१ | ३.७० |
| ५ | वाजंत्री | ४५ | ३.३० |
| ६ | इतर मजुरी | ५५३ | ४०.१० |
| ७ | खाजगी नोकरी | ६९ | ५.०० |
| | एकूण | १३८० | १००.०० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र.२४ नुसार सद्यस्थीतीत होलार समाजात कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय म्हणून शेतमजुरी व इतर मजुरी करण्याचे प्रमाण अधिक दिसून येते. हे प्रमाण अनुक्रमे ३२ टक्के व ४०.१० टक्के दिसते. पारंपारिक व्यवसाय वाजंत्री असला तरी सद्यस्थितीत हे प्रमाण केवळ ३.३० टक्के एवढे आहे. तसेच सरकारी नोकरी व खाजगी नोकरी करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अनुक्रमे केवळ ३.७० टक्के व ५ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र.२५: होलार समाजातील कुटुंबाचे मासिक उत्पन्न**

| अ.क्र. | कुटुंबाचे मासिक उत्पन्न | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रु. २०,००० पेक्षा जास्त | ५२ | ३.८० |
| २ | रु.१०,००० ते रु. २०,००० | ८० | ५.८० |
| ३ | रु. १०,००० पेक्षा कमी | १२२३ | ८८.६० |
| ४ | उत्तर दिलेले नाही | २५ | १.८० |
| | एकूण | १३८० | १००.० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र.२५ नुसार असे दिसून येते कि, रुपये १० हजार पेक्षा कमी मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना “कमी उत्पन्न गट”, रुपये १० हजार ते २० हजार मासिक उत्पन्नासाठी “मध्यम उत्पन्न गट” तर २० हजार रुपये मासिक उत्पन्नापेक्षा जास्त असलेल्या कुटुंबांना “उच्च उत्पन्न गट” असे संबोधले आहे. तक्ता क्र. १०

नुसार कमी उत्पन्न असलेल्या गटात सर्वात जास्त होलार कुटुंबे दिसून येतात. तर उच्च उत्पन्न गटात केवळ ३.८ टक्के कुटुंबे आहेत. यावरून होलार समाजाच्या आर्थिक स्थितीचा अंदाज येतो.

**तक्ता क्र. २६: होलार समाजातील कुटुंबाकडे जनावरांची मालकी**

| अ. क्र. | जनावरांची मालकी | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही | ८९२ | ६४.६० |
| २ | होय | ४८८ | ३५.४० |
| | एकूण | १३८० | १००.० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. २६ नुसार केवळ ३५.४० टक्के होलार कुटुंबांकडे जनावरांची मालकी आहे. तर ६४.६० टक्के कुटुंबांकडे कोणत्याही प्रकारची जनावरे नाहीत.

**तक्ता क्र. २७: जातीनिहाय साक्षरतेचे प्रमाण**

| अनुसूचित जातीचे नाव | साक्षर लोकसंख्या | | | एकूण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (%) | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | साक्षर लोकसंख्या | | |
| एकूण अनु. जाती | ५,१६६,८७६ | ४,११८,७९२ | ९,२८५,६६८ | ७० | १३,२७५,८९८ |
| महार | ३,१७७,९२६ | २,५७२,७६९ | ५,७५०,६९५ | ७२ | ८,००६,०६० |
| मातंग | ८७९,००३ | ६६१,६८१ | १,५४०,६८४ | ६२ | २,४८८,५३१ |
| चांभार | ५७२,०६१ | ४५०,५९८ | १,०२२,६५९ | ७२ | १,४११,०७२ |
| मेहतर-भंगी | ८५,६०५ | ७३,२९१ | १५८,८९६ | ७३ | २१७,१६६ |
| ढोर | ४७,३५१ | ४०,०७८ | ८७,४२९ | ७५ | ११६,२८७ |
| होलार | ३८,२०२ | २७,७६२ | ६५,९६४ | ६१ | १०८,९०८ |
| खाटिक | ४५,५५६ | ३९,२४९ | ८४,८०५ | ७८ | १०८,४९१ |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. २७ नुसार महाराष्ट्रातील एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीचे साक्षरतेचे प्रमाण ७० टक्के एवढे दिसून येते. तर या प्रवर्गातील प्रमुख  सहा जातींमधील खाटिक समाजामध्ये सर्वाधिक साक्षरतेचे प्रमाण (७८ टक्के) असून या खालोखाल ढोर (७५ टक्के) मेहतर-भंगी (७३ टक्के) दिसून येते.

सर्वाधिक कमी साक्षरतेचे प्रमाण होलार समजात दिसून येते. हे प्रमाण ६१ टक्के एवढे आहे. यावरून अनुसूचित जाती प्रवर्गात साक्षरतेच्या बाबतीत होलार समाज इतर अनुसूचित जातींपेक्षा मागे असल्याचे दिसते. असे असले तरी पूर्वापार शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी असलेल्या होलार समाजात शिक्षणाबाबतची जागृतता सध्या वाढत आहे, असे मत होलार समाजातील कार्यकर्त्यांनी चर्चेच्या वेळी मांडले.

**तक्ता क्र. २८: जातीनिहाय निरक्षरतेचे प्रमाण**

| **अनुसूचित जातीचे नाव** | **निरक्षर लोकसंख्या** | | | **एकूण लोकसंख्येतील निरक्षरतेचे प्रमाण (%)** | **एकूण लोकसंख्या** |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण निरक्षर लोकसंख्या | | |
| एकूण अनु. जाती | १,६००,८८३ | २,३८९,३४७ | ३,९९०,२३० | ३० | १३,२७५,८९८ |
| महार | ८९२,३०४ | १,३६३,०६१ | २,२५५,३६५ | २८ | ८,००६,०६० |
| मातंग | ३८७,५६३ | ५६०,२८४ | ९४७,८४७ | ३८ | २,४८८,५३१ |
| चांभार | १५७,०७९ | २३१,३३४ | ३८८,४१३ | २८ | १,४११,०७२ |
| मेहतर-भंगी | २३,४१९ | ३४,८५१ | ५८,२७० | २७ | २१७,१६६ |
| ढोर | ११,६८१ | १७,१७७ | २८,८५८ | २५ | ११६,२८७ |
| होलार | १७,२८९ | २५,६५५ | ४२,९४४ | ३९ | १०८,९०८ |
| खाटिक | १०,०५५ | १३,६३१ | २३,६८६ | २२ | १०८,४९१ |

स्त्रोत: २०११ जनगणना

तक्ता क्र. २८ नुसार महाराष्ट्रातील एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या निरक्षरतेचे प्रमाण ३० टक्के असल्याचे दिसून येते. तर प्रमुख अनुसूचित जातींशी तुलना करता सर्वाधिक निरक्षरतेचे प्रमाण होलार समाजामध्ये दिसून येते. हे प्रमाण ३९ टक्के एवढे आहे. सर्वात कमी निरक्षरता खाटिक समाजामध्ये २२ टक्के एवढी दिसून येते.

**तक्ता क्र.२९: होलार समाजात शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता**

| **अ. क्र.** | **शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता** | **वारंवारता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | नाही | २३९ | १७.३० |
| २ | होय | ११४१ | ८२.७० |
| | एकूण | १३८० | १००.०० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. २९ नुसार एकूण ८२.७० टक्के होलार कुटुंबांकडे शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता असल्याचे दिसून येते. यामध्ये रहिवासी दाखला, जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला अशा प्रकारच्या शिक्षण घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा समावेश होतो. तर १७.३० टक्के होलार कुटुंबांनी ही कागदपत्रे नसल्याचे दिसून येते. अशा प्रकारची कागदपत्रे नसल्याने शिक्षण घेण्यात अडचणी येतात असे मत होलार समाजातील लोकांनी चर्चेदरम्यान मांडले.

**तक्ता क्र.३०: होलार समाजातील अनु.जातीसाठी असलेल्या शासकीय योजनांबाबत माहिती**

| अ.क्र. | अनु. जातीसाठी असलेल्या शासकीय योजनांबाबत माहिती | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २७६ | २०.०० |
| २ | नाही | ११०४ | ८०.०० |
| | एकूण | १३८० | १००.०० |

स्त्रोत: प्राथमिक स्त्रोत

तक्ता क्र. ३० नुसार अनुसूचित जातीसाठी असलेल्या शासकीय योजनांबाबत माहिती नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक दिसून येते. हे प्रमाण ८० टक्के एवढे आहे. तर केवळ २० टक्के कुटुंबे आपणास विविध शासकीय योजना माहित असल्याचे सांगतात.

## प्रकरण ४
# होलार समाजाची सामाजिक स्थिती

होलार समाज हा हिंदू धर्म, संस्कृती मानणारा समाज आहे. या समाजात प्रामुख्याने हिंदू देवी-देवतांना पूजले जाते. यामध्ये भैरवनाथ, बिरोबा, दुर्गामाता, ज्योतीबा, खंडोबा, मरीमाता, सिद्धनाथ, यल्लमा देवी अशा अनेक देवी-देवतांची पूजा केली जाते. तसेच या देवतांचे सण-उत्सव व यात्रा साजऱ्या केल्या जात असल्याचे सदर सर्वेक्षणातून समोर आले. होलार समाज हा मांसाहार करणारा समाज आहे. या समाजाची बोलीभाषा प्रामुख्याने मराठी आहे. होलार समाजात आंतरजातीय विवाह करण्याचे प्रमाण कमी आहे. तसेच पत्रिका जुळवून मगच विवाह केला जातो. बीड परभणी जिल्ह्यांमधील होलार समाजात मोठ्या प्रमाणात हुंडा घेण्याची पद्धत आहे. तर घटस्फोटानंतर महिलांना पोटगी मिळण्याचे प्रमाण कमी दिसून येते. या समाजात जातपंचायत असल्याचे निदर्शात आले नाही.

अन्न, वस्त्र निवारा या बरोबरच जगण्याचा किमान दर्जा अबाधित ठेवण्यासाठी वस्तीपातळीवर सोई सुविधा उपलब्ध असणे गरजेचे असते. यामध्ये स्वच्छ शौचालयाची सुविधा, सांडपाण्याची सुविधा, विजेचा पुरवठा, पिण्याचे पाणी, पक्के रस्ते, वाहतुकीची साधने अशा सुविधांचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार भारतीतील एकूण ५३.१ टक्के लोक चांगल्या स्थितीमधील घरात राहतात तर ४१.५ टक्के कुटुंबांच्या घरांची अवस्था किमान जगण्याजोगी दिसून येते. महाराष्ट्रात हेच प्रमाण ६४.१ टक्के व ३१.६ टक्के एवढे आहे. तर होलार समाजातील ५१.५ टक्के कुटुंबे अजूनही कच्च्या स्वरूपाच्या घरात राहत असल्याचे निदर्शनास आले.





होलार समाजातील देवीदेवता

होलार समाजाला गाव व वस्ती पातळीवर उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधा, महिलांचे स्थान, होलार समाजात प्रचलित असणाऱ्या रूढी परंपरा याचे सविस्तर विश्लेषण पुढे करण्यात आले आहे.

**तक्ता क्र.३१: विभागनिहाय वाहतूक व्यवस्थेचे प्रमाण**

| विभाग | वाहतूक व्यवस्था | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १३९ | १०७ | २४६ |
| | ५६.५% | ४३.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३३३ | ८०१ | ११३४ |
| | २९.४% | ७०.६% | १००.०% |
| एकूण | ४७२ | ९०८ | १३८० |
| | ३४.२% | ६५.८% | १००.०% |

तक्ता क्र. ३१ नुसार असे दिसते की, मराठवाड्यातील केवळ ४३.५ टक्के होलार समाजाच्या कुटुंबांकडे वाहतूक व्यवस्थेची उपलब्धता आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ७०.६ टक्के एवढे आहे. यानुसार पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात हे प्रमाण कमी दिसून येते.

**तक्ता क्र.३२: विभागनिहाय सांडपाणी व्यवस्थेचे प्रमाण**

| विभाग | सांडपाणी व्यवस्था | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १६० | ८६ | २४६ |
| | ६५.०% | ३५.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ४५८ | ६७६ | ११३४ |
| | ४०.४% | ५९.६% | १००.०% |
| एकूण | ६१८ | ७६२ | १३८० |
| | ४४.८% | ५५.२% | १००.०% |



होलार वस्तीची सांडपाण्याची व्यवस्था: पळशी गांव, जत तालुका

तक्ता क्र. ३२ नुसार मराठवाड्यातील केवळ ३५ टक्के होलार समाजाच्या कुटुंबांकडे सांडपाणी व्यवस्था आहे. पश्चिम महाराष्ट्रात ही व्यवस्था अधिक प्रमाणात म्हणजेच ५९.६० टक्के एवढी आहे. यावरून असे दिसते की, सांगली जिल्ह्यातील तासगावातील वंजारवाडी येथे राहणाऱ्या होलार वस्तीत उघडी गटारे असल्याचे क्षेत्र भेटी दिसून आले.

**तक्ता क्र.३३: विभागनिहाय शौचालय असण्याचे प्रमाण**

| विभाग | शौचालय | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १९० | ५६ | २४६ |
| | ७७.२% | २२.८% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २९७ | ८३७ | ११३४ |
| | २६.२% | ७३.८% | १००.०% |
| एकूण | ४८७ | ८९३ | १३८० |
| | ३५.३% | ६४.७% | १००.०% |

तक्ता क्र. ३३ नुसार अजूनही मराठवाड्यातील ७७.२० टक्के होलार कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्धतेचा अभाव आहे. त्या तुलनेने पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण २६.२ टक्के एवढे आहे. होलार कुटुंबांकडे वैयक्तित शौचालय नसल्याचे गट चर्चे दरम्यान दिसून आले. तरीही स्वच्छ भारत अभियान अंतर्गत त्यांना शौचालयाचा लाभ देणे सोईचे होईल.

**तक्ता क्र.३४: विभागनिहाय आधारकार्ड असण्याचे प्रमाण**

| विभाग | आधार कार्ड | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २ | २४४ | २४६ |
| | ०.८% | ९९.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १० | ११२४ | ११३४ |
| | ०.९% | ९९.१% | १००.०% |
| एकूण | १२ | १३६८ | १३८० |
| | ०.९% | ९९.१% | १००.०% |

तक्ता क्र. ३४ नुसार मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यादोन्ही विभागात आधार कार्ड प्रमाण उल्लेखनीय असल्याचे दिसून येते. हे प्रमाण अनुक्रमे ९९.२ टक्के व ९९.१ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र.३५: विभागनिहाय मतदान कार्ड असण्याचे प्रमाण**

| विभाग | मतदान कार्ड | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ४ | २४२ | २४६ |
| | १.६% | ९८.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५१ | १०८३ | ११३४ |
| | ४.५% | ९५.५% | १००.०% |
| एकूण | ५५ | १३२५ | १३८० |
| | ४.०% | ९६.०% | १००.०% |

तक्ता क्र. ३५ नुसार मराठवाड्यातील ९८.४ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील ९५.५ टक्के कुटुंबांकडे मतदान कार्ड असल्याचे दिसते. अर्थात हे प्रमाण सुद्धा उलेखनीय आहे असे म्हणता येईल.

**तक्ता क्र.३६ : विभागनिहाय पक्के रस्ते असण्याचे प्रमाण**

| विभाग | पक्के रस्ते | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १०९ | १३७ | २४६ |
| | ४४.३% | ५५.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २८३ | ८५१ | ११३४ |
| | २५.०% | ७५.०% | १००.०% |
| एकूण | ३९२ | ९८८ | १३८० |
| | २८.४% | ७१.६% | १००.०% |



आटपाडी तालुक्यातील होलार वस्तीतील अंतर्गत रस्ता

तक्ता क्र. ३६ नुसार अजूनही मराठवाड्यातील ४४.३ टक्के होलार समाजाच्या कुटुंबांना तर पश्चिम महाराष्ट्रातील २५ टक्के कुटुंबांना पक्क्या रस्त्यांची सुविधा उपलब्ध नाही. यावरून मराठवाड्यातील हे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे व पक्के रस्ते त्यांच्या वस्तीपर्यत पोहचणे आवश्यक आहेत.

**तक्ता क्र.३७: विभागनिहाय पाणीपुरवठ्याचे प्रमाण**

| विभाग | पाणीपुरवठा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १३५ | १११ | २४६ |
| | ५४.९% | ४५.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १९२ | ९४२ | ११३४ |
| | १६.९% | ८३.१% | १००.०% |
| एकूण | ३२७ | १०५३ | १३८० |
| | २३.७% | ७६.३% | १००.०% |

तक्ता क्र. ३७ नुसार  सर्वेक्षण केलेल्या विभागात अजूनही एकूण २३.७ टक्के होलार कुटुंबाना पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नाही. मराठवाड्यात हे प्रमाण अधिक म्हणजेच, ५४.९ टक्के कुटुंबाना तर पश्चिम महाराष्ट्रातील १६.९ टक्के कुटुंबांना पाणीपुरवठा पाणी पुरवठा उपलब्ध नाही. उन्हाळ्यात बीडमधील नेकनूर गावातील होलार समाजातील कुटुंबे १२० रुपये देऊन ५०० लिटर पाणी विकत घेतात. यावरुन असे निदर्शनास येते की या ठिकाणी पाणी पुरवठयाची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. ३८: विभागनिहाय वीजेची सोय असण्याचे प्रमाण**

| विभाग | वीज | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १४६ | १०० | २४६ |
| | ५९.३% | ४०.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८५ | १०४९ | ११३४ |
| | ७.५% | ९२.५% | १००.०% |
| एकूण | २३१ | ११४९ | १३८० |
| | १६.७% | ८३.३% | १००.०% |

तक्ता क्र. ३८ तक्त्यानुसार मराठवाड्यातील ५९.६ टक्के कुटुंबांना विजेची सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. तुलनेने पश्चिम महाराष्ट्रात वीज उपलब्धतेची स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते. शासनाच्या धोरणाप्रमाणे त्यांना १०० टक्के वीज पुरवठा करुन देणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.३९: विभागनिहाय दवाखाना असण्याचे प्रमाण**

| विभाग | दवाखाना | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १२९ | ११७ | २४६ |
| | ५२.४% | ४७.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १९४ | ९४० | ११३४ |
| | १७.१% | ८२.९% | १००.०% |
| एकूण | ३२३ | १०५७ | १३८० |
| | २३.४% | ७६.६% | १००.०% |

वरील तक्त्यानुसार मराठवाड्यातील ५२.४ टक्के कुटुंबांच्या मते त्यांना दवाखान्याची सुविधा उपलब्ध नाही. तर पश्चिम महाराष्ट्रे हे प्रमाण १७.१ टक्के इतके आहे.

**तक्ता क्र.४०: विभागनिहाय घराच्या मालकीचे प्रमाण**

| विभाग | घराची मालकी | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अतिक्रमित | स्वत:चे | भाड्याचे | |
| मराठवाडा | ४ | २४० | २ | २४६ |
| | १.६% | ९७.६% | ०.८% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११६ | ९२१ | ९७ | ११३४ |
| | १०.२% | ८१.२% | ८.६% | १००.०% |
| एकूण | १२० | ११६१ | ९९ | १३८० |
| | ८.७% | ८४.१% | ७.२% | १००.०% |

तक्ता क्र. ४० नुसार तक्त्यानुसार स्वत:चे घर असणाऱ्या होलार कुटुंबांचे मराठवाड्यातील प्रमाण ९७.६ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ८१.२ टक्के आहे. तसेच, पश्चिम महाराष्ट्रातील १०.२ टक्के कुटुंबे अतिक्रमित जाग्यावरील घरांमध्ये राहतात तर हेच प्रमाण मराठवाड्यात कमी (१.६०%) दिसून येते. यावरून असे निदर्शनास येते कि, मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात घराची मालकी असण्याऱ्या होलार कुटुंबांचे प्रमाण कमी आहे. त्यांना घरांची सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे वाटते.

**तक्ता क्र. ४१: विभागनिहाय घराच्या प्रकाराचे प्रमाण**

| विभाग | घराचा प्रकार | | एकूण |
|---|---|---|---|
| | कच्चे | पक्के | |
| मराठवाडा | १४० | १०६ | २४६ |
| | ५६.९% | ४३.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५७१ | ५६३ | ११३४ |
| | ५०.४% | ४९.६% | १००.०% |
| एकूण | ७११ | ६६९ | १३८० |
| | ५१.५% | ४८.५% | १००.०% |



आटपाडी तालुक्यातील होलार कुटुंबांची घरे

तक्ता क्र. ४१ नुसार होलार समाजातील कच्चे घर असणाऱ्या कुटुंबाचे सर्वाधिक प्रमाण दिसून येत आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील होलार समाजातील ५०.४ टक्के कुटुंबे तर मराठवाड्यातील ५६.९ टक्के कुटुंबे कच्च्या घरात राहत आहेत. शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ होलार समाजातील कुटुंबांना प्रथम प्राधान्याने देणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.४२: विभागनिहाय जोगवा प्रथा असण्याचे प्रमाण**

| विभाग | जोगवा प्रथा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १८२ | ६४ | २४६ |
| | ७४.०% | २६.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७९१ | ३४३ | ११३४ |
| | ६९.८% | ३०.२% | १००.०% |
| एकूण | ९७३ | ४०७ | १३८० |
| | ७०.५% | २९.५% | १००.०% |

तक्ता क्र. ४२ नुसार होलार समाजातील एकूण २९.५ टक्के कुटुंबामध्ये जोगवा प्रथा असल्याचे दिसून येते. यापैकी हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व सोलापूर जिल्ह्यांमध्ये अधिक ३०. २ टक्के असल्याचे दिसून येते. कुलदेवतांची नावे व त्यांच्यावरील अपार श्रद्धा यामुळे जोगवा प्रथा अजूनही टिकून असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.४३: विभागनिहाय कुटुंबात बाबा-बुवा यांना मानण्याचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबात बाबा-बुवा यांना मानण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २०३ | ४३ | २४६ |
| | ८२.५% | १७.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ९९२ | १४२ | ११३४ |
| | ८७.५% | १२.५% | १००.०% |
| एकूण | ११९५ | १८५ | १३८० |
| | ८६.६% | १३.४% | १००.०% |

तक्ता क्र. ४३ नुसार होलार समाजातील बाबा बुवा यांना मानणारे १३.४ टक्के कुटुंबे आहेत. यापैकी मराठवाड्यात १७.५ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात १२.५ टक्के कुटुंबे बाबा बुवा यांना मानतात. यावरून या समाजात काही प्रमाणात असणारी अंधश्रद्धा दिसून येते. बुवाबाजीमधुन हा समाज मुक्त करण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.४४: विभागनिहाय मासिक पाळीत महिलांनी बाजूला बसण्याचे प्रमाण**

| विभाग | मासिक पाळीत महिलांनी बाजूला बसण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ३ | २४३ | २४६ |
| | १.२% | ९८.८% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १६१ | ९७३ | ११३४ |
| | १४.२% | ८५.८% | १००.०% |
| एकूण | १६४ | १२१६ | १३८० |
| | ११.९% | ८८.१% | १००.०% |

तक्ता क्र. ४४ नुसार जातिव्यवस्थेच्या स्पृश्य-अस्पृश्य या कल्पना समाजाच्या व्यवहारात खोलवर रुजलेल्या आहेत. स्त्रियांना सुद्धा मासिक पाळीदरम्यान अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागतात. वरील तक्त्यावरून मासिक पाळीमध्ये महिलांचा विटाळ मानणाऱ्या होलार कुटुंबाचे प्रमाण ८८.१ टक्के एवढे दिसून येत आहे. मराठवाड्यात हे प्रमाण ९८.८ टक्के एवढे आहे. महिलांना या काळात धार्मिक कार्ये, सन समारंभ व उत्सव इ. मध्ये सहभाग घेण्यास प्रतिबंध घातला जातो. याबाबत वैज्ञानिक दृष्टीकोणातून त्यांच्यामध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.४५: विभागनिहाय पोतराज प्रथेचे प्रमाण**

| पोतराज प्रथेचे प्रमाण | | | एकूण |
|---|---|---|---|
| विभाग | नाही | होय | |
| मराठवाडा | २४० | ६ | २४६ |
| | ९७.६% | २.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १११४ | २० | ११३४ |
| | ९८.२% | १.८% | १००.०% |
| एकूण | १३५४ | २६ | १३८० |
| | ९८.१% | १.९% | १००.०% |

तक्ता क्र. ४५ नुसार आयुष्यभर देवाची पूजाअर्चा करणे, देवाच्या नावाने भिक्षा मागणे हे काम पोतराजाचे असते. त्याने त्याचे आयुष्य देवालाच अर्पण केलेले असते. अशी प्रथा आहे. वरील तक्त्यावरून केवळ १.९ टक्के कुटुंबांमध्ये पोतराज प्रथा असल्याचे दिसून येते. हे अत्यल्प प्रमाण आहे.

**तक्ता क्र. ४६: विभागनिहाय बोलीभाषेचे प्रमाण**

| विभाग | बोलीभाषा | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | अहिराणी | होलारी | कन्नड | मराठी | मराठी आणि कन्नड | |
| मराठवाडा | १ | १ | १ | २४३ | ० | २४६ |
| | ०.४% | ०.४% | ०.४% | ९८.८% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ० | १ | १३ | १०८० | ४० | ११३४ |
| | ०.०% | ०.१% | १.१% | ९५.२% | ३.५% | १००.०% |
| एकूण | १ | २ | १४ | १३२३ | ४० | १३८० |
| | ०.१% | ०.१% | १.०% | ९५.९% | २.९% | १००.०% |

तक्ता क्र.४६ नुसार एकूण ९५.९ टक्के होलार कुटुंबांची बोलीभाषा ही मराठी आहे. हे प्रमाण मराठवाड्यात ९८.८ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९५.२ टक्के एवढे आहे. याव्यतिरीक्त मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात मराठी व कन्नड या दोन्ही बोली भाषा बोलण्याचे प्रमाण ३.५ टक्के एवढे दिसते. कर्नाटक सीमेलगत असल्या कारणाने सोलापूर जिल्ह्यातील होलार समाजात कन्नड भाषा काही प्रमाणात बोलली जाते. मराठवाड्यात अहिराणी, होलारी व कन्नड या भाषा काही अंशी बोलल्या जातात. त्यांचे प्रमाण नगण्य आहे. पश्चिम महाराष्ट्रात मात्र अहिराणी भाषा बोलली जात नाही.

**तक्ता क्र.४७: विभागनिहाय निवासस्थानी राहण्याचा कालावधी**

| विभाग | निवासस्थानी राहण्याचा कालावधी | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जन्मापासून | ५ वर्षापेक्षा कमी | ५ ते १० वर्ष | १० ते १५ वर्ष | १५ पेक्षा जास्त वर्षे | प्रतिक्रिया नाही | |
| मराठवाडा | २२२ | ५ | २ | २ | १४ | १ | २४६ |
| | ९०.२% | २.०% | ०.८% | ०.८% | ५.७% | ०.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ९१४ | १७ | ३१ | २९ | १४० | ३ | ११३४ |
| | ८०.६% | १.५% | २.७% | २.६% | १२.३% | ०.३% | १००.०% |
| एकूण | ११३६ | २२ | ३३ | ३१ | १५४ | ४ | १३८० |
| | ८२.३% | १.६% | २.४% | २.२% | ११.२% | ०.३% | १००.०% |

तक्ता क्र. ४७ नुसार निवासस्थानी जन्मापासून वास्तव्य करणाऱ्या होलार कुटुंबांचे प्रमाण अधिक दिसून येते. यामध्ये मराठवाड्यात ९०.२ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ८०.६ टक्के एवढे प्रमाण आहे. तसेच १५ वर्षांपेक्षा जास्त कालवधीसाठी वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात (१२.३०%) मराठवाड्याच्या तुलनेत अधिक दिसते. हे प्रमाण मराठवाड्यात ५.७ टक्के आहे.

**तक्ता क्र.४८: विभागनिहाय आंतरजातीय विवाहाचे प्रमाण**

| विभाग | आंतरजातीय विवाहाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २३८ | ८ | २४६ |
| | ९६.७% | ३.३% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११२६ | ८ | ११३४ |
| | ९९.३% | ०.७% | १००.०% |
| एकूण | १३६४ | १६ | १३८० |
| | ९८.८% | १.२% | १००.०% |

तक्ता क्र.४८ नुसार दिसुन येते कि, होलार समाजामध्ये आंतरजातीय विवाहाचे प्रमाण खूपच कमी म्हणजे केवळ १.२ टक्के एवढे आहे. एकूण ९८.८ टक्के कुटुंबांमध्ये 'जाती'तच विवाह केला जातो असे दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्यात ९६.७ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९९.३ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. ४९: विभागनिहाय घटस्पोटानंतर पोटगीचे प्रमाण**

| विभाग | घटस्पोटानंतर पोटगीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १८६ | ६० | २४६ |
| | ७५.६% | २४.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७४५ | ३८९ | ११३४ |
| | ६५.७% | ३४.३% | १००.०% |
| एकूण | ९३१ | ४४९ | १३८० |
| | ६७.५% | ३२.५% | १००.०% |

तक्ता क्र. ४९ नुसार वरील तक्त्यावरून असे दिसते की, केवळ ३२.५ टक्के कुटुंबांच्या मते महिलांना घटस्फोटानंतर पोटगी दिली जाते. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात हे प्रमाण कमी म्हणजेच २४.४ टक्के एवढे आहे. यावरून महिलांच्या दुय्यम स्थितीबाबत स्पष्टता येते.

**तक्ता क्र. ५०: विभागनिहाय महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण**

| विभाग | महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १७८ | ६८ | २४६ |
| | ७२.४% | २७.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १६६ | ९६८ | ११३४ |
| | १४.६% | ८५.४% | १००.०% |
| एकूण | ३४४ | १०३६ | १३८० |
| | २४.९% | ७५.१% | १००.०% |

तक्ता क्र. ५० नुसार वरील तक्त्यावरून मराठवाड्यातील होलार समाजातील महिलांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण कुटुंबांच्या मते अत्यंत कमी म्हणजेच २७.६ टक्के एवढे दिसून येते. तर पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण ८५.४ टक्के एवढे दिसून येते. यावरून मराठवाड्यातील होलार समाजातील मोठ्या प्रमाणातील महिलांना पुनर्विवाह करण्यास परवानगी नसल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.५१: विभागनिहाय मांसाहाराचे प्रमाण**

| विभाग | मांसाहाराचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २२ | २२४ | २४६ |
| | ८.९% | ९१.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ६८ | १०६६ | ११३४ |
| | ६.०% | ९४.०% | १००.०% |
| एकूण | ९० | १२९० | १३८० |
| | ६.५% | ९३.५% | १००.०% |

तक्ता क्र. ५१ नुसार होलार समाजात मांसाहार मोठ्या प्रमाणात केला जातो. वरील तक्त्यावरून असे दिसते की, ९३.५ टक्के कुटुंबांमध्ये मांसाहार केला जातो. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही भागांमध्ये हे प्रमाण जवळपास सारखेच म्हणजेच अनुक्रमे ९१.१ टक्के व ९४ टक्के एवढे आहे.





सोलापूर जिल्ह्यातील होलार प्रतिनिधींसोबत बार्टीचे अधिकारी

वंदन गावातील होलार समाजाशी लक्ष गटचर्चा

**तक्ता क्र.५२: विभागनिहाय जातपंचायत असण्याचे प्रमाण**

| विभाग | जातपंचायत असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २४५ | १ | २४६ |
| | ९९.६% | ०.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११२२ | १२ | ११३४ |
| | ९८.९% | १.१% | १००.०% |
| एकूण | १३६७ | १३ | १३८० |
| | ९९.१% | ०.९% | १००.०% |

या समाजात जातपंचायत नाही असे क्षेत्र भेटी दरम्यान होलार समाजातील लोकांनी मांडले. तक्ता क्र.५२ नुसार यास दुजोरा मिळतो त्यात एकूण ९९.१ टक्के कुटुंबांनी जात पंचायत नसल्याचे सांगितले. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही भागांमध्ये हे प्रमाण जवळपास सारखेच म्हणजेच अनुक्रमे ९९.६ टक्के व ९८.९ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र.५३: विभागनिहाय हुंडा देण्याच्या प्रथेचे प्रमाण**

| विभाग | हुंडा देण्याच्या प्रथेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ८ | २३८ | २४६ |
| | ३.३% | ९६.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ९४५ | १८९ | ११३४ |
| | ८३.३% | १६.७% | १००.०% |
| एकूण | ९५३ | ४२७ | १३८० |
| | ६९.१% | ३०.९% | १००.०% |



आटपाडी तालुक्यातील होलार समाजाच्या महिला

तक्ता क्र. ५३ नुसार होलार समाजात हुंडा देण्याची प्रथा असल्याचे एकूण ३०.९ टक्के कुटुंबांचे म्हणणे आहे. यापैकी सर्वात जास्त प्रमाण हे मराठवाडा विभागात दिसून येते. मराठवाड्यातील बीड व परभणी जिल्ह्यातील गावांमध्ये ९६.७ टक्के होलार कुटुंबांमध्ये हुंडा देण्याची प्रथा असल्याचे दिसून येते. या प्रथेमुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जात असून मुली म्हणजे आई वडिलांवरचे ओझे मानले जाते. म्हणून हुंडाप्रतीबंध कायद्याचे ज्ञान देवून जन जागृती करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.५४: विभागनिहाय सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण**

| विभाग | सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २४३ | ३ | २४६ |
| | ९८.८% | १.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८४१ | २९३ | ११३४ |
| | ७४.२% | २५.८% | १००.०% |
| एकूण | १०८४ | २९६ | १३८० |
| | ७८.६% | २१.४% | १००.०% |

तक्ता क्र. ५४ नुसार असे दिसते की, अजूनही एकूण २१.४ टक्के होलार कुटुंबे सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागतात. हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात मराठवाड्याच्या तुलनेत जास्त म्हणजेच २५.८ टक्के एवढे आहे. जातीय व्यवस्थेमध्ये पारंपारिक पद्धतीने ग्रहणाच्या वेळी भिक्षा मागणे पूर्वाश्रमीच्या काही अस्पृश्य जातींना सक्तीचे मानले जात असे. ही प्रथा काही प्रमाणात आजही कायम असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ५५: विभागनिहाय १९५० चा पुरावा असण्याचे प्रमाण**

| विभाग | १९५० चा पुरावा असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २२९ | १७ | २४६ |
| | ९३.१% | ६.९% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३९६ | ७३८ | ११३४ |
| | ३४.९% | ६५.१% | १००.०% |
| एकूण | ६२५ | ७५५ | १३८० |
| | ४५.३% | ५४.७% | १००.०% |

तक्ता क्र. ५५ नुसार अनुसूचित जातीसाठीच्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला आवश्यक असतो. हा दाखला मिळवण्यासाठी १९५० पूर्वीचा जातीचा उल्लेख असलेला कोणताही शासकीय अभिलेख हा पुरावा म्हणून जातीच्या प्रमाणपत्रासाठी आवश्यक आहे. परंतु, होलार समाजातील एकूण ४५.३ टक्के कुटुंबांकडे अशा प्रकारचा पुरावा उपलब्ध नाही असे वरील तत्क्यावरून दिसून येते. यामध्ये सर्वात

जास्त प्रमाण मराठवाड्यातील होलार कुटुंबांमध्ये दिसून येत आहे. या विभागातील ९३.१ टक्के कुटुंबांकडे १९५० चा पुरावा उपलब्ध नाही. तर पश्चिम महाराष्ट्र हेच प्रमाण ३४.९ टक्के एवढे आहे. त्यामुळे ही कुटुंबे मागासवर्गीय सामाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी असणाऱ्या शासकीय योजनांपासून वंचित राहतात. होलार समाजातील कोणत्याही नातेवाईकाच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना जात प्रमाणपत्र दिल्यास हा प्रश्न सुटू शकतो.

**तक्ता क्र.५६: विभागनिहाय कुटुंबात दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबात दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २१० | ३६ | २४६ |
| | ८५.४% | १४.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०६१ | ७३ | ११३४ |
| | ९३.६% | ६.४% | १००.०% |
| एकूण | १२७१ | १०९ | १३८० |
| | ९२.१% | ७.९% | १००.०% |

तक्ता क्र. ५६ नुसार असे दिसते होलार समाजातील कुटुंबांमध्ये दीर्घ कालीन आजार उदा. क्षयरोग, कर्करोग, हत्तीरोग, कुष्टरोग, गलगंड, दमा, मधुमेह, हृदयरोग इ.असण्याचे प्रमाण अत्यल्प म्हणजेच ७.९ टक्के आहे. यामध्ये पश्चिम महराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात हे प्रमाण जास्त म्हणजेच १४.६ टक्के एवढे आहे. त्यांचे मेळावे, आरोग्य शिबिरे घेणे व दिर्घकालीन आजाराची कारणे शोधून उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. ५७: विभागनिहाय कुटुंबाचा प्रकार**

| विभाग | कुटुंबाचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | विस्तारित कुटुंब | एकत्र कुटुंब | विभक्त कुटुंब | |
| मराठवाडा | ० | ६४ | १८२ | २४६ |
| | ०.०% | २६.०% | ७४.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २३ | ६९९ | ४१२ | ११३४ |
| | २.०% | ६१.६% | ३६.३% | १००.०% |
| एकूण | २३ | ७६३ | ५९४ | १३८० |
| | १.७% | ५५.३% | ४३.०% | १००.०% |

तक्ता क्र.५७ नुसार होलार समाजातील कुटुंबांमध्ये एकत्र कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक दिसत आहे. हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात जास्त असून ते ६१.६ टक्के तर मराठवाड्यात केवळ २६ टक्के एवढे आहे. तसेच विभक्त

कुटुंबांचे सर्वाधिक प्रमाण म्हणजे ७४ टक्के हे मराठवाड्यात दिसून येत आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात विभक्त कुटुंबांचे प्रमाण ३६.३ टक्के एवढे आहे. होलार समाजात विस्तारीत कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजेच १.७ टक्के एवढे दिसत आहे. ही विस्तारीत कुटुंबे फक्त पश्चिम महाराष्ट्रात दिसून येतात.

**तक्ता क्र. ५८: विभागनिहाय देवदासी प्रथेचे प्रमाण**

| विभाग | देवदासी प्रथेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २४६ | ० | २४६ |
| | १००.०% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ९४३ | १९१ | ११३४ |
| | ८३.२% | १६.८% | १००.०% |
| एकूण | ११८९ | १९१ | १३८० |
| | ८६.२% | १३.८% | १००.०% |

तक्ता क्र. ५८ नुसार १३.८ टक्के कुटुंबाच्या मते होलार समाजात अजूनही महिलांमध्ये देवदासी प्रथेचे प्रमाण आहे. मराठवाड्यात ही  प्रथा नसल्याचे दिसत आहे. परंतु कुटुंबाच्या मते पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण १६.८ टक्के एवढे आहे. मुल होत नाही म्हणून पहिले होणारे मुल हे देवाला अर्पण केले जाईल असा नवस केला जातो. पहीले अपत्य जर मुलगी झाली तर तिचा देवाशी विवाह केला जातो. देवाशी विवाह झालेल्या महिलांना देवदासी म्हटले जाते. देवदासी प्रथेला कायद्यांनी बंदी असली तरी देवदासींचे होणारे शोषण व त्यांचे पुनर्वसन ही चिंतेची बाब आहे.

**तक्ता क्र. ५९: विभागनिहाय इतर समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचे प्रमाण**

| विभाग | इतर समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | भेदभावाची | समानतेची | |
| मराठवाडा | ७९ | १६७ | २४६ |
| | ३२.१% | ६७.९% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५४ | १०८० | ११३४ |
| | ४.८% | ९५.२% | १००.०% |
| एकूण | १३३ | १२४७ | १३८० |
| | ९.६% | ९०.४% | १००.०% |

तक्ता क्र. ५९ नुसार एकूण ९.६ टक्के कुटुंबांना इतर समाजाकडून भेदभावाची वागणूक मिळते. मराठवाड्यातील होलार कुटुंबाना सर्वाधिक प्रमाणात भेदभावाला सामोरे जावे लागते. या ठिकाणी ३२.१ टक्के कुटुंबांनी भेदभावाची वागणूक मिळत असल्याचे मत मांडले. अनुसूचित जातींना पूर्वापार अस्पृश्य समजून त्यांच्याकडे पाहण्याचा प्रतिकूल दृष्टीकोन यामागे असल्याचे दिसून येतो. हा दृष्टीकोन बदलण्यासाठी अस्पृष्यता निवारण सप्ताह या सारखे कार्यक्रम साजरे करुन समाज प्रबोधन घडविण्याची आवश्यकता वाटते.

**तक्ता क्र. ६०: विभागनिहाय इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण**

| विभाग | इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ११ | २३५ | २४६ |
| | ४.५% | ९५.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २६ | ११०८ | ११३४ |
| | २.३% | ९७.७% | १००.०% |
| एकूण | ३७ | १३४३ | १३८० |
| | २.७% | ९७.३% | १००.०% |

तक्ता क्र. ६० नुसार एकूण २.७ टक्के कुटुंबे इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होत नाहीत. मराठवाड्यात हे प्रमाण ४.५ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण २.३ टक्के आहे. यासाठी सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र.६१: विभागनिहाय बेटी व्यवहार होणाऱ्या जातींचे प्रमाण**

| विभाग | कोणत्या जातीत बेटी व्यवहार होतो | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होलार | होलार/ चांभार | होलार/मांग | होलेर | मांग | मांग /होलार /चांभार | वल्हार | |
| मराठवाडा | १४६ | ० | ० | ९७ | ० | ० | ३ | २४६ |
| | ५९.३% | ०.०% | ०.०% | ३९.४% | ०.०% | ०.०% | १.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०१२ | ३ | ११६ | ० | २ | १ | ० | ११३४ |
| | ८९.२% | ०.३% | १०.२% | ०.०% | ०.२% | ०.१% | ०.०% | १००.०% |
| एकूण | ११५८ | ३ | ११६ | ९७ | २ | १ | ३ | १३८० |
| | ८३.९% | ०.२% | ८.४% | ७.०% | ०.१% | ०.१% | ०.२% | १००.०% |

होलार समाजात आंतरजातीय विवाहांचे प्रमाण खूप कमी आहे. तक्ता क्र. ६१ नुसार या समाजात होलार जातीतच बेटी व्यवहार करण्याचे एकूण कुटुंबांचे प्रमाण ८३.९ टक्के एवढे आहे. मराठवाडामध्ये हे प्रमाण ५९.३ टक्के असून पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण ८९.२ टक्के आहे. मराठवाड्यात होलेर जातीबरोबर बेटी व्यवहाराचे ३९.४ टक्के प्रमाण दिसून येते. तर पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण अजिबात दिसून येत नाही. असे असले तरीही, होलार, होलेर आणि वल्हार हे समानार्थी वापरले जातात. इतर जाती जसे की, होलार आणि चांभार, होलार आणि मांग, मांग, मांग-होलार आणि चांभार या जातींबरोबर बेटी व्यवहार करण्याचे प्रमाण अत्यल्प (८.८० टक्के) दिसून येत आहे.

**तक्ता क्र. ६२: विभागनिहाय अनुसुचित जातीसाठी असणा-या शासकीय योजना माहित असण्याचे प्रमाण**

| विभाग | अनुसुचित जातीसाठी असणाऱ्या शासकीय योजना माहित असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २०८ | ३८ | २४६ |
| | ८४.६% | १५.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८९६ | २३८ | ११३४ |
| | ७९.०% | २१.०% | १००.०% |
| एकूण | ११०४ | २७६ | १३८० |
| | ८०.०% | २०.०% | १००.०% |

तक्ता क्र. ६२ नुसार दिसून येते की, एकूण ८० टक्के होलार कुटुंबांना अनुसुचित जातीसाठी असणा-या शासकीय  योजना माहित नाहीत. मराठवाड्यातील होलार कुटुंबांमध्ये योजना माहित नसण्याचे प्रमाण (८४.६ टक्के) तुलनेने जास्त आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ७९ टक्के आहे. योजना माहीतच नसल्याने त्यांचा लाभ घेण्यात मर्यादा येतात.

**तक्ता क्र.६३: विभागनिहाय समाजाच्या संघटना असण्याचे प्रमाण**

| विभाग | समाजाच्या संघटना असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ९६ | १५० | २४६ |
| | ३९.०% | ६१.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २४५ | ८८९ | ११३४ |
| | २१.६% | ७८.४% | १००.०% |
| एकूण | ३४१ | १०३९ | १३८० |
| | २४.७% | ७५.३% | १००.०% |

तक्ता क्र. ६३  नुसार होलार समाजातील ७५.३ टक्के कुटुंबांनी या समाजाच्या संघटना असल्याचे सांगितले. संघटना असण्याचे प्रमाण मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहे. मराठवाड्यात ६१ टक्के कुटुंबे तर पश्चिम महाराष्ट्रात ७८.४ टक्के कुटुंबे अशा संघटना असल्याचे सांगतात.

**तक्ता क्र. ६४: विभागनिहाय धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी देण्याचे प्रमाण**

| विभाग | धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी देण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १५ | २३१ | २४६ |
| | ६.१% | ९३.९% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १७९ | ९५५ | ११३४ |
| | १५.८% | ८४.२% | १००.०% |
| एकूण | १९४ | ११८६ | १३८० |
| | १४.१% | ८५.९% | १००.०% |

तक्ता क्र. ६४ नुसार होलार समाजाच्या कुटुंबांमध्ये  धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी देण्याचे एकूण प्रमाण ८५.९ टक्के एवढे दिसून येते. मराठवाड्यात हे प्रमाण ९३.९ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ८४.२ टक्के आहे. नवस पूर्ण करणे, पूजा, सणसमारंभ, विवाहात्तोर विधी या प्रसंगी प्राण्याचे बळी दिले जातात. मांसाहार करणारा हा समाज असल्याने धार्मिक प्रसंगी प्राण्याचे बळी देऊन त्याचा नेवैद्य सामूहिकरीत्या खाण्याची प्रथा आहे.

**तक्ता क्र. ६५: विभागनिहाय पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण**

| विभाग | पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ३८ | २०८ | २४६ |
| | १५.४% | ८४.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११० | १०२४ | ११३४ |
| | ९.७% | ९०.३% | १००.०% |
| एकूण | १४८ | १२३२ | १३८० |
| | १०.७% | ८९.३% | १००.०% |

तक्ता क्र. ६५ नुसार होलार समाजात पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ९०.३ टक्के तर मराठवाड्यात हे प्रमाण ८४.६ टक्के एवढे आहे. या वरून पूर्वीपार चालत आलेल्या हिंदू समाजातील विवाह प्रथा अजूनही पाळल्या जातात.

**तक्ता क्र.६६: विभागनिहाय जादूटोणा मानण्याचे प्रमाण**

| विभाग | जादूटोणा मानण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १७० | ७६ | २४६ |
| | ६९.१% | ३०.९% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०२५ | १०९ | ११३४ |
| | ९०.४% | ९.६% | १००.०% |
| एकूण | ११९५ | १८५ | १३८० |
| | ८६.६% | १३.४% | १००.०% |

तक्ता क्र. ६६ नुसार होलार समाजातील एकूण १३.४ टक्के कुटुंबे जादूटोणा मानत असल्याचे सांगतात. मराठवाड्यात जादूटोणावर विश्वास ठेवण्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. हे प्रमाण ३०.९ टक्के एवढे आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात ९.६ टक्के कुटुंबे अशा विश्वास असल्याचे सांगतात. यावरून मराठवाड्यातील होलार समाजात अंधश्रद्धा बाळगण्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ६७: विभागनिहाय अंगात येण्याचे प्रमाण**

| विभाग | अंगात येणे | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २१३ | ३३ | २४६ |
| | ८६.६% | १३.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०६६ | ६८ | ११३४ |
| | ९४.०% | ६.०% | १००.०% |
| एकूण | १२७९ | १०१ | १३८० |
| | ९२.७% | ७.३% | १००.०% |

तक्ता क्र. ६७ नुसार होलार समाजात अंगात येणे ही प्रथा मराठवाड्यात जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते. हे प्रमाण १३.४ टक्के एवढे आहे. कुटुंबाचे कुलदैवत व्यक्तीच्या अंगात येऊन निर्माण झालेल्या समस्येवर अथवा संकटावर उपाय सांगते. यासाठी ही व्यक्ती ज्या विधी अथवा कार्ये करण्यास सांगते त्या पूर्ण करावयाच्या असतात अन्यथा देवाचा कोप होतो अशी समाजातील लोकांची धारणा आहे.

**तक्ता क्र.६८: विभागनिहाय जादूटोणा केल्याचे प्रमाण**

| विभाग | तुमच्यावर कुणी जादूटोणा केला आहे का ? | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २३६ | १० | २४६ |
| | ९५.९% | ४.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०८५ | ४९ | ११३४ |
| | ९५.७% | ४.३% | १००.०% |
| एकूण | १३२१ | ५९ | १३८० |
| | ९५.७% | ४.३% | १००.०% |

तक्ता क्र. ६८ नुसार एकूण ४.३ टक्के कुटुंबाना आपल्यावर कोणीतरी जादूटोणा केला आहे असे वाटते. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही भागात हे प्रमाण जवळपास सारखे म्हणजेच ४.१ टक्के व ४.३ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. ६९: विभागनिहाय जटा असण्याचे प्रमाण**

| विभाग | जटा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २४१ | ५ | २४६ |
| | ९८.०% | २.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११९० | २४ | ११३४ |
| | ९७.९% | २.१% | १००.०% |
| एकूण | १३५१ | २९ | १३८० |
| | ९७.९% | २.१% | १००.०% |

तक्ता क्र. ६९ नुसार होलार समाजात जटा असण्याचे प्रमाण अत्यंत अल्प म्हणजे २.१ टक्के एवढे आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही भागात हे प्रमाण जवळपास सारखे म्हणजेच २ टक्के व २.१ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. ७०: विभागनिहाय जातीचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबाची जात | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | होलार | होलेर | मांग/मातंग | इतर | |
| मराठवाडा | १६१ | ७४ | ० | ११ | २४६ |
| | ६५.४% | ३०.१% | ०.०% | ४.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ९६९ | १ | १५७ | ७ | ११३४ |
| | ८५.४% | ०.१% | १३.८% | ०.६% | १००.०% |
| एकूण | ११३० | ७५ | १५७ | १८ | १३८० |
| | ८१.९% | ५.४% | ११.४% | १.३% | १००.०% |

होलार समाजात उपजात नाही. परंतु होलार या शब्दाच्या अपभ्रंशामुळे होलेर, व्हलेर, व्हलार अशा जातीं असल्याचे दिसते. तक्ता क्र. ७० नुसार या समाजातील एकूण ८१.९ टक्के कुटुंबांनी आपली जात होलार अशी सांगितली. होलार जात असल्याचे ८५.४ टक्के कुटुंबांचे तर मराठवाड्यातील ६५.४ टक्के कुटुंबे होलार असल्याचे सांगतात. आपण मांग किवा मातंग समाजाचे असल्याचे पश्चिम महाराष्ट्रातील १३.८ कुटुंबांनी सांगितले तर मराठवाड्यात होलार समाज मांग-मातंग नाही. सांगली जिल्ह्यातील क्षेत्रभेटी दरम्यान सांगितले गेले कि, सदर १३.८ टक्के कुटुंबे स्वतःला मांग म्हणवतात व होलार जात अशी ओळख ते मानत नाहीत.

मराठवाड्यात ४.५ टक्के कुटुंबे यापैकी वेगळी जात असल्याचे सांगतात. यामध्ये चांभार, मोची, लिंगायत, व्हालार अशा जातींचा उल्लेख होतो. तर हेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात नगण्य (०.६० टक्के) आहे.

**तक्ता क्र. ७१: विभागनिहाय जात प्रमाणपत्रावरील जातीचे प्रमाण**

| विभाग | जात प्रमाणपत्रावरील जातीचे प्रमाण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होलार | होलेर | व्हलार | होलार मांग | मांग | मराठा | न्हावी लिंगायत | चांभार | जात प्रमाण पत्र नाही | |
| मराठवाडा | ११३ | १९७ | ९ | ० | ० | २ | ० | ० | ९९० | १३११ |
| | ८.६% | १५.०% | ०.७% | ०.०% | ०.०% | ०.२% | ०.०% | ०.०% | ७५.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३६९० | २ | ८ | १३ | ५५४ | ० | ४ | १९ | १३३४ | ५६२४ |
| | ६५.६% | ०.०% | ०.१% | ०.२% | ९.९% | ०.०% | ०.१% | ०.३% | २३.७% | १००.०% |
| एकूण | ३८०३ | १९९ | १७ | १३ | ५५४ | २ | ४ | १९ | २३२४ | ६९३५ |
| | ५४.८% | २.९% | ०.२% | ०.२% | ८.०% | ०.०% | ०.१% | ०.३% | ३३.५% | १००.०% |

तक्ता क्र. ७१ नुसार दिसून येते की, मराठवाड्यात ८.६ टक्के व पश्चिम महाराष्ट्रात ६५.६ टक्के लोकांच्या जात प्रमाणपत्रावर होलार अशी जात नोंदविली आहे. तसेच जात प्रमाणपत्रावर होलेर ही जात असल्याचे मराठवाड्यात १५ टक्के प्रमाण असून पश्चिम महाराष्ट्रात या जातीची नोंद असलेली जात प्रमाण पत्र नसल्याचे दिसते. यावरून फक्त मराठवाड्यात होलेर असे संबोधले जाते. तसेच व्हलेर या जातीचे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र अनुक्रमे ०.७ टक्के व ०.१ टक्के एवढे प्रमाण दिसते. तसेच मराठवाड्यातील ७५.५ टक्के व पश्चिम महाराष्ट्रातील २३.७ टक्के लोकांकडे जात प्रमाणपत्रच नसल्याचे आढळून आले. मराठवाडा याही बाबतीत मागासलेला दिसून येतो.

**तक्ता क्र. ७२: विभागनिहाय जात पडताळणी प्रमाणपत्रावरील जातीचे प्रमाण**

| विभाग | जात पडताळणी प्रमाणपत्र | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होलार | होलेर | व्हलेर | मांग | चांभार | जात पडताळणी प्रमाण पत्र नाही | लागू नाही | |
| मराठवाडा | १२ | ९ | १ | ० | ० | १२८४ | ५ | १३११ |
| | ०.९% | ०.७% | ०.१% | ०.०% | ०.०% | ९७.९% | ०.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १००२ | ० | ० | २५ | १ | ३९७७ | ६१९ | ५६२४ |
| | १७.८% | ०.०% | ०.०% | ०.४% | ०.०% | ७०.७% | ११.०% | १००.०% |
| एकूण | १०१४ | ९ | १ | २५ | १ | ५२६१ | ६२४ | ६९३५ |
| | १४.६% | ०.१% | ०.०% | ०.४% | ०.०% | ७५.९% | ९.०% | १००.०% |

तक्ता क्र. ७२ नुसार मराठवाड्यातील होलार समाजातील ९७.९ टक्के लोकांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र नाही, तर हेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात ७०.७० टक्के आहे. पश्चिम महाराष्ट्रातील १७.८ टक्के होलार समाजातील लोकांकडे तर मराठवाड्यातील ०.९ टक्के लोकांकडील जात पडताळणी प्रमाणपत्रावरील जात ही होलार आहे. मराठवाड्यात जात पडताळणी प्रमाणपत्रावर होलेर ०.७ टक्के व तेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात अजीबात नाही, असे दिसते. पश्चिम महाराष्ट्रात ०.४ टक्के लोकाकडे मांग जातीचे प्रमाणपत्र दिसत असून तेच प्रमाण मराठवाड्यात नसल्याचे दिसते.

**तक्ता क्र.७३: विभागनिहाय मुळ जातीचे प्रमाण**

| विभाग | मूळ जातीचे प्रमाण | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होलार | होलेर | व्हलेर | मांग | महार | न्हावी लिंगायत | मराठा | |
| मराठवाडा | ७९१ | ४६७ | ५१ | ० | ० | ० | २ | १३११ |
| | ६०.३% | ३५.६% | ३.९% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५४५४ | ५ | २५ | १३५ | १ | ४ | ० | ५६२४ |
| | ९७.०% | ०.१% | ०.४% | २.४% | ०.०% | ०.१% | ०.०% | १००.०% |
| एकूण | ६२४५ | ४७२ | ७६ | १३५ | १ | ४ | २ | ६९३५ |
| | ९०.१% | ६.८% | १.१% | १.९% | ०.०% | ०.१% | ०.०% | १००.०% |

तक्ता क्र. ७३ नुसार पश्चिम महाराष्ट्रात ९७ टक्के तर मराठवाड्यात ६०.३ टक्के होलार समाजातील लोक त्यांची मूळ जात होलार असल्याचे सांगतात. मराठवाड्यात ३५.६० टक्के लोकांच्या मते ते होलेर या मूळ जातीचे आहेत. जर होलार आणि होलेर हे एकाच मानले तर मराठवाड्यात हे प्रमाण ९५.९० टक्के प्रमाण असेल. तसेच मराठवाड्यात व्हलेर ही मूळ जात असल्याचे ३.९ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ०.४ टक्के दिसते. मांग या जातीचे प्रमाण फक्त पश्चिम महाराष्ट्रात २.४ टक्के एवढे दिसून येते.

**तक्ता क्र.७४: विभागनिहाय प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण**

| विभाग | प्राथमिक शाळा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १३ | २३३ | २४६ |
| | ५.३% | ९४.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८५ | १०४९ | ११३४ |
| | ७.५% | ९२.५% | १००.०% |
| एकूण | ९८ | १२८२ | १३८० |
| | ७.१% | ९२.९% | १००.०% |

तक्ता क्र. ७४ नुसार मराठवाड्यातील ९४.७ टक्के कुटुंबांनी तर पश्चिम महाराष्ट्रातील ९२.५ टक्के कुटुंबांनी आपल्या गावात प्राथमिक शाळेची सुविधा असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने, गावपातळीवर शैक्षणिक सुविधा पुरविण्याचे शासकीय धोरण असल्याने दोन्ही विभागात प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण अधिक आहे.

**तक्ता क्र. ७५: विभागनिहाय शिक्षणाचे प्रमाण**

| विभाग | अभ्यास क्षेत्रातील एकूण लोकसंख्येत शिक्षणाचे प्रमाण | | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | साक्षर | पूर्व प्राथमिक | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | उच्च शिक्षित | इतर | लागू नाही | |
| मराठवाडा | ४५३ | ४ | १२ | ३९१ | २२० | ८० | ३१ | ७ | २ | ० | १११ | १३११ |
| | ३४.६% | ०.३% | ०.९% | २९.८% | १६.८% | ६.१% | २.४% | ०.५% | ०.२% | ०.०% | ८.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १३४३ | ० | ११५ | १५२४ | १४०१ | ५४९ | २४५ | ४८ | १८ | १० | ३७१ | ५६२४ |
| | २३.९% | ०.०% | २.०% | २७.१% | २४.९% | ९.८% | ४.४% | ०.९% | ०.३% | ०.२% | ६.६% | १००.०% |
| एकूण | १७९६ | ४ | १२७ | १९१५ | १६२१ | ६२९ | २७६ | ५५ | २० | १० | ४८२ | ६९३५ |
| | २५.९% | ०.१% | १.८% | २७.६% | २३.४% | ९.१% | ४.०% | ०.८% | ०.३% | ०.१% | ७.०% | १००.०% |

तक्ता क्र. ७५ नुसार असे दिसून येते की, होलार समाजातील अशिक्षित गटातील लोकसंख्येचा प्रमाण जास्त आहे. यातही तुलनेने मराठवाडा विभागातील होलार समाजात अशिक्षित लोकसंख्येचे प्रमाण अधिक दिसून येते. मराठवाडामध्ये हे प्रमाण ३४. ६ टक्के एवढे आहे, तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण २३.९ टक्के एवढे आहे. या खालोखाल प्राथमिक शिक्षण घेतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण दिसते. मराठवाडामध्ये हे प्रमाण २९.८ टक्के व पश्चिम महाराष्ट्रात २७.१ टक्के असे दिसून येते. तसेच, पदवी, पदव्युत्तर व उच्च शिक्षण घेतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात कमी दिसून येते. १० वी नंतरच्या शिक्षणासाठी मराठवाड्यातील मुले पुणे, नांदेड, औरंगाबाद, लातूर या ठिकाणी शिक्षणासाठी जातात, असे वंदन गावातील होलार लोकांनी गट चर्चे दरम्यान सांगितले.

**तक्ता क्र. ७६: विभागनिहाय गळतीच्या कारणांचे प्रमाण**

| विभाग | गळतीच्या कारणांचे प्रमाण | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अपंगत्व | कौटुंबिक समस्या | शिक्षणाच्या सुविधांचा अभाव | शिक्षणाची आवड नसणे | विवाह | बिकट आर्थिक परिस्थिती | लागू नाही | |
| मराठवाडा | ३ | ६३ | १ | २७ | १२ | २६० | ९४५ | १३११ |
| | ०.२% | ४.८% | ०.१% | २.१% | ०.९% | १९.८% | ७२.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५ | १२९ | १० | १३० | ३६२ | १८५१ | ३१३७ | ५६२४ |
| | ०.१% | २.३% | ०.२% | २.३% | ६.४% | ३२.९% | ५५.८% | १००.०% |
| एकूण | ८ | १९२ | ११ | १५७ | ३७४ | २१११ | ४०८२ | ६९३५ |
| | ०.१% | २.८% | ०.२% | २.३% | ५.४% | ३०.४% | ५८.९% | १००.०% |

तक्ता क्र. ७६ नुसार शिक्षणातून गळतीच्या कारणाचे प्रमाण दिसते. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे बिकट आर्थिक परिस्थिती असल्याचे दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ३२.९ टक्के तर मराठवाड्यात हे प्रमाण १९.८ टक्के एवढे दिसते. वंदन गावातील होलार लोकांनी सांगितले की, सातवी नंतरचे शिक्षण घ्यायला दुसऱ्या गावात जायला लागते. त्यासाठीचा प्रवास खर्च परवडत नसल्याने आमची मुले शाळा सोडून देतात. विवाह ठरल्यामुळे शिक्षण अर्धवट सोडून दिल्याचे अधिक प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात असून ते ६.४ टक्के एवढे आहे.

यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे गट चर्चेत सांगितले. शिक्षणाची आवड नसल्यामुळे गळती झाल्याचे प्रमाण जवळपास दोन्ही विभागात-- मराठवाडा (२.३%) व पश्चिम महाराष्ट्र (२.१%) सारखेच आहे. तसेच मराठवाड्यात कौटुंबिक समस्यांमुळे शिक्षण सोडण्याचे प्रमाण (४.८%) पश्चिम महाराष्ट्रापेक्षा (२.३%) अधिक एवढे आहे. दोन्ही विभागातील एकूण ५८.९ टक्के लोकसंख्या सध्या शिक्षण घेत असल्याने ती लागू नाही या गटात दिसून येते. "मराठवाड्यातील बहुतांशी मुले ऊसतोडणी साठी स्थलांतरीत होतात. त्यामुळे ते आपले शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. तसेच मुले ७ वी पर्यत शिकतात. पण मुली शिकत नाहीत. १८ वर्षाच्या आत मुलींचे विवाह झाल्याने त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो." असे मत वंदन आणि विडा गावातील गट चर्चेत होलार लोकांनी मांडले. या गावांत १० वी पास झालेली काही मुले आहेत. तर नेकनूर गावातील लोकांनी गरिबीमुळे ४ थी -५ वी नंतर मुले शकत नसल्याचे सांगितले.

**तक्त क्र. ७७: विभागनिहाय शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण**

| विभाग | शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ७ | २३९ | २४६ |
| | २.८% | ९७.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २३२ | ९०२ | ११३४ |
| | २०.५% | ७९.५% | १००.०% |
| एकूण | २३९ | ११४१ | १३८० |
| | १७.३% | ८२.७% | १००.०% |

होलार समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे मराठवाड्यातील गटचर्चे दरम्यान लोकांनी सांगितले. तक्ता क्र. ७७ नुसार अजूनही १७.३ टक्के कुटुंबांकडे शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे आवश्यक नाहीत. यामध्ये जन्माचा दाखला, जातीचा दाखला, रहिवाशी दाखला अशा कागदपत्रांचा समावेश होतो. मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे प्रमाण अधिक म्हणजे २०.५ टक्के एवढे दिसत आहे. यामुळे शिक्षण घेण्यात अडचणी येत असल्याचे मत होलार समाजातील लोकांनी मांडले.

**तक्ता क्र. ७८: विभागनिहाय पूर्वजांच्या व्यवसाय करण्याचे कुटुंबांचे प्रमाण**

| विभाग | | वाद्य वाजविणे | जुन्या चप्पला शिवणे | दोरखंड तयार करणे | मेलेल्या जनावरांची कातडी काढणे | घोंगडी बनविणे | सुतार काम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठवाडा | | ११० | ८ | ४ | २७ | ३ | ३० |
| | | ४४.७% | ३.३% | १.६% | ११.०% | १.२% | १२.२% |
| पश्चिम महाराष्ट्र | | ७३४ | ६४९ | २६९ | २४१ | १९५ | २ |
| | | ६४.७% | ५७.२% | २३.७% | २१.३% | १७.२% | ०.२% |
| एकूण | | ८४४ | ६५७ | २७३ | २६८ | १९८ | ३२ |
| | | ६१.२% | ४७.६% | १९.८% | १९.४% | १४.३% | २.३% |

मराठवाड्यातील एकूण २४६ व पश्चिम महाराष्ट्रातील एकूण ११३४ कुटुंबाकडून घेतलेल्या माहितीनुसार विभाग निहाय पारंपारीक व्यवसायाचे प्रमाण तक्ता क्र. ७८ मध्ये दिसून येते. यानुसार एकूण ६१.२ टक्के होलार कुटुंबांचे पूर्वज वाद्य वाजविणे हा पारंपारीक व्यवसाय करत असल्याचे दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्यात ४४.७ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ६४.७ टक्के एवढे आहे. यावरून पश्चिम महाराष्ट्रातील अधिक कुटुंबे या पारंपारीक व्यवसायात होती असे दिसते. तसेच, जुन्या चपला शिवण्याच्या व्यवसायात सर्वाधिक पश्चिम महाराष्ट्रातील होलार कुटुंबाच्या पूर्वजांचे प्रमाण दिसून येते. हे प्रमाण ५७.१ टक्के एवढे आहे. मराठवाड्यात मात्र हे प्रमाण कमी ३.३ टक्के एवढेच दिसते. होलार कुटुंबांच्या पूर्वजांचा व्यवसाय दोरखंड तयार करण्याचा असल्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात (२३.७ टक्के ) मराठवाड्याच्या (१.६ टक्के) तुलनेत अधिक दिसून येते. एकूण १९.४ टक्के होलार कुटुंबांच्या पूर्वजांचा व्यवसाय हा मेलेल्या जनावरांची कातडी काढण्याचा असल्याचे दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात अधिक असून ते अनुक्रमे ११ टक्के व २१.३ टक्के असल्याचे दिसून येते. तसेच, घोंगडी बनविणे हा पूर्वजांचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण हे केवळ १४.३ टक्के एवढे दिसते. तसेच मराठवाड्यात हे प्रमाण कमी १.२ टक्के असून ते पश्चिम महाराष्ट्रात तुलनेने अधिक १७. २ टक्के एवढे आहे. होलार कुटुंबांचे पूर्वज हे सुतार काम करत असल्याचे कुटुंब सर्वेक्षणात आढळून आले आहे. त्याचे प्रमाण मराठवाड्यात १२.२ टक्के हे पश्चिम महाराष्ट्रापेक्षा (०.२०%) अधिक असल्याचे दिसते. मराठवाड्यातील नेकनूर गावातील क्षेत्र भेटी दरम्यान

होलार समाजातील काही लोक सुतार काम करत असल्याचे दिसून आले. सुतारी कामात घरगुती वापराच्या वस्तू बनविणे हे काम प्रामुख्याने केले जाते.

**तक्ता क्र. ७९: विभागनिहाय सावकाराने जमीन गिळंकृत केल्याचे प्रमाण**

| विभाग | सावकाराने जमीन गिळंकृत केली असल्याचे प्रमाण |
|---|---|
| मराठवाडा | ३ |
| | १.२% |
| पश्चिम महाराष्ट्र | १३ |
| | १.१% |
| एकूण | १६ |
| | १.२% |

तक्ता क्र. ७९ नुसार असे दिसते की, होलार समाजातील एकूण १.२ टक्के कुटुंबामधील जमिनी या खाजगी सावकाराने गिळंकृत केल्या आहे. हे प्रमाण मराठवाड्यात व पश्चिम महाराष्ट्रात जवळपास सारखेच दिसून येते.

**तक्ता क्र. ८०: विभागनिहाय जनावरांचा प्रकार**

| विभाग | जनावरांचा प्रकार | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | भाकड | शेळया-मेंढ्या | दुभती | लागू नाही | |
| मराठवाडा | १७ | २६ | ३३ | १७० | २४६ |
| | ६.९% | १०.६% | १३.४% | ६९.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८९ | २१६ | १०५ | ७२४ | ११३४ |
| | ७.८% | १९.०% | ९.३% | ६३.८% | १००.०% |
| एकूण | १०६ | २४२ | १३८ | ८९४ | १३८० |
| | ७.७% | १७.५% | १०.०% | ६४.८% | १००.०% |

तक्ता क्र. ८० नुसार मराठवाड्यात ६.९ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ७.८ टक्के होलार कुटुंबांकडे भाकड जनावरे आहेत. तसेच शेळया मेंढ्या असण्याचे प्रमाण मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात अधिक असून ते १९ टक्के एवढे आहे. दुभती जनावरे मात्र पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात अधिक


होलार कुटुंबाकडे असणारे पशुधन

दिसून येतात. हे प्रमाण मराठवाड्यात १३.४ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९.३ टक्के आहे.

**तक्ता क्र.८१: विभागनिहाय बाळ जन्मानंतर पाचवी, बारावी करण्याचे प्रमाण**

| विभाग | बाळ जन्मानंतर पाचवी, बारावी करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ० | २४६ | २४६ |
| | ०.०% | १००.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३९ | १०९५ | ११३४ |
| | ३.४% | ९६.६% | १००.०% |
| एकूण | ३९ | १३४१ | १३८० |
| | २.८% | ९७.२% | १००.०% |

तक्ता क्र. ८१ नुसार वरील तक्त्यानुसार होलार समाजात बाळ जन्मानंतर पाचवी बारावी करण्याचे प्रमाण दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्यात १०० टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९६.६ टक्के एवढे आहे. पूर्वापार चालत आलेली प्रथा असल्याचे वंदन गावातील गट चर्चेत होलार लोकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ८२: विभागनिहाय बाळ जन्मानंतर सटवाईची पूजा करण्याचे प्रमाण**

| विभाग | बाळ जन्मानंतर सटवाईची पूजा करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २ | २४४ | २४६ |
| | ०.८% | ९९.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १९ | १११५ | ११३४ |
| | १.७% | ९८.३% | १००.०% |
| एकूण | २१ | १३५९ | १३८० |
| | १.५% | ९८.५% | १००.०% |

तक्ता क्र. ८२ नुसार होलार समाजात बाळ जन्मल्यानंतर सटवाईची पूजा करण्याचे मोठे प्रमाण दिसून येते. हे प्रमाण दोन्ही विभागात जवळपास सारखेच असून ते मराठवाड्यात ९९.२ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९८.३ टक्के आहे.

**तक्ता क्र.८३: विभागनिहाय बाळ जन्माआधी करावयाच्या विधींचे प्रमाण**

| विभाग | बाळ जन्माआधी करावयाच्या विधींचे प्रमाण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | ओटी भरण | चोळीचा कार्यक्रम | डोहाळे जेवन | कोणतेच नाही | |
| मराठवाडा | ० | १ | २२ | २२३ | २४६ |
| | ०.०% | ०.४% | ८.९% | ९०.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २०३ | १२ | ३२२ | ५९७ | ११३४ |
| | १७.९% | १.१% | २८.४% | ५२.६% | १००.०% |
| एकूण | २०३ | १३ | ३४४ | ८२० | १३८० |
| | १४.७% | ०.९% | २४.९% | ५९.४% | १००.०% |

तक्ता क्र. ८३ नुसार सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी बाळ जन्माच्या आधी ओटी भरण, चोळीचा कार्यक्रम व डोहाळे जेवण अशा विधी करण्याचे प्रमाण होलार समाजात दिसून येते. हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात अधिक दिसते. मराठवाड्याच्या (८.९ टक्के) तुलनेत पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक २८.४ टक्के कुटुंबे डोहाळे जेवण करत असल्याचे व १७.९ टक्के कुटुंबे ओटी भरणाचा कार्यक्रम करत असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ८४: विभागनिहाय वापरत असलेल्या वाद्यांचे प्रमाण**

| विभाग | कोणत्या वाद्याचा वापर करता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सनई | डफ | सूर | इतर | लागू नाही | एकूण |
| मराठवाडा | २४ | २१ | १ | १४ | १८६ | २४६ |
| | ९.८% | ८.५% | ०.४% | ५.७% | ७५.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १५७ | ९७ | ४८ | ५९ | ७७३ | ११३४ |
| | १३.८% | ८.६% | ४.२% | ५.२% | ६८.२% | १००.०% |
| एकूण | १८१ | ११८ | ४९ | ७३ | ९५९ | १३८० |
| | १३.१% | ८.६% | ३.६% | ५.३% | ६९.५% | १००.०% |

तक्ता क्र. ८४ नुसार सनई या पारंपारिक वाद्याचा, वाद्य वाजविताना वापर करीत असल्याचे सर्वाधिक प्रमाण दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्याच्या (९.८० %) तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात अधिक १३.८ टक्के एवढे दिसते. तसेच डफ हे वाद्य वाजविण्याचे प्रमाण दोन्ही विभाग जवळपास सारखेच दिसून येते. हे प्रमाण मराठवाड्यात ८.५ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ८.६ टक्के एवढे दिसते.

**तक्ता क्र.८५: विभागनिहाय अंत्य संस्काराचा प्रकार**

| विभाग | अंत्य संस्काराचा प्रकार | | एकूण |
|---|---|---|---|
| | दफन करणे | दहन करणे | |
| मराठवाडा | २ | २४४ | २४६ |
| | ०.८% | ९९.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १८ | १११६ | ११३४ |
| | १.६% | ९८.४% | १००.०% |
| एकूण | २० | १३६० | १३८० |
| | १.४% | ९८.६% | १००.०% |

तक्ता क्र. ८५ नुसार दोन्ही विभागातील होलार समाजातील अंत्य संस्काराच्या विधीमध्ये दहन करणे या प्रकाराचे सर्वाधिक प्रमाण दिसून येते. यामध्ये मराठवाड्यात ९९.२ टक्के कुटुंबे तर पश्चिम महाराष्ट्रातील ९८.४ टक्के कुटुंबे प्रेताला दहन करून अंत्य विधी पार पाडतात.

**तक्ता क्र. ८६: विभागनिहाय दशक्रिया विधीचे प्रमाण**

| विभाग | दशक्रिया विधी करण्याचा दिवस | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | तिसऱ्या | दहाव्या | तेराव्या | |
| मराठवाडा | ७ | १३३ | १०६ | २४६ |
| | २.८% | ५४.१% | ४३.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ११११ | १५ | ८ | ११३४ |
| | ९८.०% | १.३% | ०.७% | १००.०% |
| एकूण | १११८ | १४८ | ११४ | १३८० |
| | ८१.०% | १०.७% | ८.३% | १००.०% |

तक्ता क्र. ८६ नुसार, मराठवाड्यातील होलार समाजामध्ये दशक्रिया विधी दहाव्या व तेराव्या दिवशी करत असल्याचे दिसून येते. हे प्रमाण अनुक्रमे ५४.१ टक्के व ४३.१ टक्के एवढे आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्रात मात्र दशक्रिया विधी तिसऱ्या दिवशी करत असून हे प्रमाण ९८ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. ८७: विभागनिहाय कुटुंबातील व्यसनाधीनतेचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबातील व्यसनाधीनतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १९८ | ४८ | २४६ |
| | ८०.५% | १९.५% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०३१ | १०३ | ११३४ |
| | ९०.९% | ९.१% | १००.०% |
| एकूण | १२२९ | १५१ | १३८० |
| | ८९.१% | १०.९% | १००.०% |

तक्ता क्र. ८७ नुसार मराठवाड्यातील होलार समाजात १९.५ टक्के कुटुंबांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण दिसून येते. तर पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण ९.१ टक्के एवढे आहे. अशा प्रकारे एकूण १०.९ टक्के होलार कुटुंबात व्यसनाधीनता दिसून येते.

**तक्ता क्र.८८: विभागनिहाय स्थलांतर करण्याचे प्रमाण**

| विभाग | स्थलांतर करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २२३ | २३ | २४६ |
| | ९०.७% | ९.३% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १००० | १३४ | ११३४ |
| | ८८.२% | ११.८% | १००.०% |
| एकूण | १२२३ | १५७ | १३८० |
| | ८८.६% | ११.४% | १००.०% |

तक्ता क्र. ८८ नुसार एकूण ११.४ टक्के होलार कुटुंबे आपल्या मुळच्या निवासस्थानापासून स्थलांतरित झालेले दिसून येतात. हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात अधिक ११. ८ टक्के एवढे आहे. तर तुलेनेने मराठवाड्यात कमी म्हणजेच ९.३ टक्के एवढे दिसून येते.

**तक्ता क्र. ८९: विभागनिहाय स्थलांतराच्या कारणाचे प्रमाण**

| विभाग | स्थलांतराचे कारण | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दुष्काळ | कौटुंबिक समस्या | चांगले जीवनमान जगण्यासाठी | पक्के घर बांधण्यासाठी | रोजगार | लागू नाही | |
| मराठवाडा | ० | २ | ३ | २ | १६ | २२५ | २४६ |
| | ०.००% | ०.८०% | १.२०% | ०.८०% | ६.५०% | ९१.५०% | १००.००% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७ | ५ | १८ | १ | ९८ | १००६ | ११३४ |
| | ०.६०% | ०.४०% | १.६०% | ०.१०% | ८.६०% | ८८.७०% | १००.००% |
| एकूण | ७ | ७ | २१ | ३ | ११४ | १२३१ | १३८० |
| | ०.५०% | ०.५०% | १.५०% | ०.२०% | ८.३०% | ८९.२०% | १००.००% |

तक्ता क्र. ८९ नुसार सर्वाधिक रोजगाराच्या कारणावरून आपल्या पूर्वीच्या निवास स्थानापासून स्थलांतरीत झालेल्या कुटुंबांची संख्या दिसून येते. यामध्ये मराठवाड्यातील ६.५० टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील ८.६० टक्के कुटुंबे दिसून येतात. तसेच चांगले जीवनमान जगण्यासाठी स्थलांतरीत झालेल्या कुटुंबाचे प्रमाण मराठवाड्यात १.२० टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात १.६० टक्के दिसून येते. पूर्वीच्या ठिकाणी दुष्काळ असल्याने पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेली फक्त ०.६० टक्के कुटुंबे दिसून येतात.

**तक्ता क्र. ९०: विभागनिहाय मुलींच्या लग्नाच्या वयाचे प्रमाण**

| विभाग | मुलींच्या लग्नाच्या वयाचे प्रमाण | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | १० ते १८ वर्षे | १८ वर्षापेक्षा जास्त | १० वर्षाखालील | |
| मराठवाडा | ३१ | २१५ | ० | २४६ |
| | १२.६% | ८७.४% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५९ | १०७२ | ३ | ११३४ |
| | ५.२% | ९४.५% | ०.३% | १००.०% |
| एकूण | ९० | १२८७ | ३ | १३८० |
| | ६.५% | ९३.३% | ०.२% | १००.०% |

तक्ता क्र. ९० नुसार १० ते १८ वयोगटातील मुलींचे विवाह होत असल्याचे प्रमाण मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने अधिक असून ते १२.६ टक्के एवढे आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण ५.२ टक्के

एवढे आहे.  तासगाव मध्ये झालेल्या गट चर्चेत आपल्या समाजात बालविवाह होत असल्याचे होलार लोकांनी सांगितले. तर मराठवाड्यामधील गावांतील पालक ऊस तोडीसाठी स्थलांतर करीत असल्यामुळे मुलींवर लक्ष कोण ठेवणार या चिंतेमुळे १८ वर्षाच्या आतच आपल्या मुलींचे लग्न लावतात, असे मत त्यांनी  मांडले. त्यामुळे मराठवाड्यात बाल वयातच विवाह केले जातात.

**तक्ता क्र. ९१: विभागनिहाय महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानण्याचे प्रमाण**

| विभाग | महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानण्याचे  प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | ३ | २४३ | २४६ |
| | १.२% | ९८.८% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७२ | १०६२ | ११३४ |
| | ६.३% | ९३.७% | १००.०% |
| एकूण | ७५ | १३०५ | १३८० |
| | ५.४% | ९४.६% | १००.०% |

तक्ता क्र. ९१ नुसार होलार समाजात महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानण्याचे मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन्हीमध्ये मोठे प्रमाण दिसून येते. यामध्ये मराठवाड्यात ९८.८ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात ९३.७ टक्के कुटुंबे असा विटाळ मानतात. बाळंत झाल्यावर मुलगी झाली तर सात दिवस व मुलगा झाला तर १२ दिवस विटाळ मनाला जातो, असे नेकनूर गावात झालेल्या गट चर्चेत होलार समाजाने सांगितले.

**तक्ता क्र. ९२: विभागनिहाय प्रकल्प ग्रस्त कुटुंबांचे प्रमाण**

| विभाग | प्रकल्प ग्रस्त कुटुंबांचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २४६ | ० | २४६ |
| | १००.०% | ०.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १११४ | २० | ११३४ |
| | ९८.२% | १.८% | १००.०% |
| एकूण | १३६० | २० | १३८० |
| | ९८.६% | १.४% | १००.०% |

तक्ता क्र. ९२ नुसार होलार समाजातील प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येत असून ते केवळ पश्चिम महाराष्ट्रात असल्याचे दिसते. या विभागात हे प्रमाण १.८ टक्के एवढे दिसते.

**तक्ता क्र. ९३: विभागनिहाय इतर समाजाची दहशत असण्याचे प्रमाण**

| विभाग | इतर समाजाची दहशत असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १९२ | ५४ | २४६ |
| | ७८.०% | २२.०% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १०९५ | ३९ | ११३४ |
| | ९६.६% | ३.४% | १००.०% |
| एकूण | १२८७ | ९३ | १३८० |
| | ९३.३% | ६.७% | १००.०% |

तक्ता क्र. ९३ नुसार मराठवाड्यातील २२ टक्के कुटुंबांनी इतर समाजाची दहशत असल्याचे सांगितले. हे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात ३.४ टक्के एवढे दिसून येते.

**तक्ता क्र. ९४: विभागनिहाय अत्याचार प्रतिबंध कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण**

| विभाग | अत्याचार प्रतिबंध कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल होण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १७९ | ६७ | २४६ |
| | ७२.८% | २७.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८८० | २५४ | ११३४ |
| | ७७.६% | २२.४% | १००.०% |
| एकूण | १०५९ | ३२१ | १३८० |
| | ७६.७% | २३.३% | १००.०% |

तक्ता क्र. ९४ नुसार, मराठवाड्यातील २७.२ टक्के होलार कुटुंबांच्या मते होलार समाजातवर अन्याय अत्याचार झाल्यावर अत्याचार प्रतिबंध (अनुसूचित जाती-जमाती) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल होतो. तर हेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात तुलनेने कमी म्हणजेच २२.४ टक्के आहे. अनुसूचित जाती व जमातीविरोधात होणारे अत्याचार, गुन्हे, बदनामी, अपमान यापासून संरक्षण मिळवण्यासाठी १९८९ साली हा कायदा मंजूर

करण्यात आला. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात अजूनही होलार समाजातील लोकांना हा कायदाअंतर्गत संरक्षण मिळत नसल्याचे वाटते.

**तक्ता क्र. ९५: विभागनिहाय समाजाची यात्रा भरण्याचे प्रमाण**

| विभाग | समाजाची यात्रा भरण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | २३१ | १५ | २४६ |
| | ९३.९% | ६.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३११ | ८२३ | ११३४ |
| | २७.४% | ७२.६% | १००.०% |
| एकूण | ५४२ | ८३८ | १३८० |
| | ३९.३% | ६०.७% | १००.०% |

तक्ता क्र. ९५ नुसार, पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात यात्रा, उत्सव साजरा करण्याचे प्रमाण दिसून येते. अशा यात्रांमध्ये होलार समाजाची लोक एकत्र येतात. पश्चिम महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण ७२.६ टक्के एवढे आहे. तर मराठवाड्यात हे प्रमाण केवळ ६.१ टक्के आहे.




होलार समाजातील महिला व पुरुष





# प्रकरण ५
# होलार समाजाची आर्थिक स्थिती

भारतीय समाजात जाती व्यवस्था आपली मुळे खोलवर रुतवून बसलेली आहे. या जाती व्यवस्थेने प्रत्येक जातीस व्यवसाय नेमून दिला आहे. त्यानुसार प्रत्येक जातीचा उच्च व कनिष्ठ असा परंपरागत दर्जा ठरविला जातो. होलार समाजाचा वाद्य वाजविणे हा पारंपारीक व्यवसाय आहे. हे लोक अलगुज, सनई, डफ समुहाने वाजविण्यात प्रवीण असतात. त्यासाठी त्यांना लग्न समारंभात बोलावणी येतात. कधी कधी वाजवून ते भिक्षा मागण्याचाही व्यवसाय करतात (भारतीय संस्कृतीकोश). होलार म्हणजे वाजंत्री. डफडे वाजवून गाणारा (महाराष्ट्र शब्दकोश). परंतु सद्य स्थितीमध्ये उदरनिर्वाहासाठी या व्यवसायावर अवलंबून न राहता इतर व्यवसाय या समाजाने स्वीकारलेले दिसून येतात.  पारंपारीक व्यवसायात असणाऱ्या होलार कुटुंबांचे अत्यल्प प्रमाण दिसून येते. तसेच शेत जमीन व शेतीची साधणे उपलबद्ध नसल्याने शेत मजुरी व इतर मजुरी करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे.  यातून मिळणारा आर्थिक मोबदला हा तुटपुंजा म्हणजेच कमी उत्पन्न गटातील दिसून येतो. कमी उत्पन्न असल्यामुळे सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक मागासलेपणा दिसून येतो. तसेच आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील होलार समाज अधिक मागास असलेला दिसून येतो. अशाप्रकारे होलार सामाजाची आर्थिक स्थिती, त्यांकडे असणारे उत्पन्नाची साधने, जनावरे, जमीन याबाबतचे सविस्तर विवेचन प्रस्तुत प्रकरणामध्ये दिले आहे.



सांगली जिल्ह्यातील होलार समाजाच्या व्यक्तीचा चपला दुरुस्तीचा व्यवसाय

**तक्ता क्र. ९६: विभागनिहाय कुटुंबाच्या मुख्य व्यवसायाचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबाचा मुख्य व्यवसाय | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेतमजूरी | शेती | व्यवसायिक | सरकारी नोकरी | वाजंत्री | इतर मजूरी | खाजगी नौकरी | |
| मराठवाडा | ७६ | ३१ | ० | ४ | १४ | ११७ | ४ | २४६ |
| | ३०.९% | १२.६% | ०.०% | १.६% | ५.७% | ४७.६% | १.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३६५ | १२९ | ६१ | ४७ | ३१ | ४३६ | ६५ | ११३४ |
| | ३२.२% | ११.४% | ५.४% | ४.१% | २.७% | ३८.४% | ५.७% | १००.०% |
| एकूण | ४४१ | १६० | ६१ | ५१ | ४५ | ५५३ | ६९ | १३८० |
| | ३२.०% | ११.६% | ४.४% | ३.७% | ३.३% | ४०.१% | ५.०% | १००.०% |

तक्ता क्र. ९६ नुसार होलार समाजातील मजुरी करणे हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या एकूण कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४०.१ टक्के एवढे दिसत आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या (३८.४०%) तुलनेने मराठवाड्यात हे प्रमाण अधिक म्हणजे ४७.६ टक्के एवढे आहे. या खालोखाल शेतमजुरी करण्याऱ्या एकूण कुटुंबाचे प्रमाण ३२ टक्के एवढे दिसत आहे. यामध्ये गडी म्हणून इतरांच्या शेतात चाकरी करणारी होलार कुटुंबे मराठवाड्यात ३०.९०% तर पश्चिम महाराष्ट्रात ३२.२०% कुटुंबे दिसून येतात. शेत जमिनीची अनुत्पादकता, पाण्याचा कमतरता आणि भूमीहीनता यामुळे बीड व परभणी मधील बहुतांशी कुटुंबे उस तोडीसाठी आपल्या कुटुंबासोबत स्थलांतर करून उदरनिर्वाह करतात. वाजंत्री हा जरी पिढीजात व्यवसाय असला तरीही सद्य परिस्थितीत हा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वात कमी दिसून येत आहे. हे प्रमाण ३.३ टक्के एवढेच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तासगावातील ६०० वर्षापूर्वीच्या गणेश मंदिरात नगारा वाजविण्याचा पारंपारिक व्यवसाय अजूनही करणारे होलार कुटुंबे वंजारवाडी या वस्तीमध्ये क्षेत्र भेटी दरम्यान दिसून आले.

**तक्ता क्र. ९७: विभागनिहाय कुटुंबाचे मासिक उत्पन्न**

| विभाग | कुटुंबाचे मासिक उत्पन्न | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | जास्त उत्पन्न | मध्यम उत्पन्न | कमी उत्पन्न | प्रतिक्रिया नाही | |
| मराठवाडा | ४ | १९ | २२० | ३ | २४६ |
| | १.६% | ७.७% | ८९.४% | १.२% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ४८ | ६१ | १००३ | २२ | ११३४ |
| | ४.२% | ५.४% | ८८.४% | १.९% | १००.०% |
| एकूण | ५२ | ८० | १२२३ | २५ | १३८० |
| | ३.८% | ५.८% | ८८.६% | १.८% | १००.०% |

तक्ता क्र. ९७ नुसार सर्वात जास्त कुटुंबांचे प्रमाण (८८.६० टक्के) हे कमी उत्पन्न गटात येत आहे. यामध्ये मराठवाडा विभागातील ८९.४ टक्के कुटुंबे तर पश्चिम महाराष्ट्रातील ८८.४ टक्के कुटुंबे कमी उत्पन्न गटात येतात. रुपये ५००० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांचे वर्गीकरण कमी उत्पन्न गट असे केले आहे. तसेच जास्त उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांचे प्रमाण अत्यंल्प स्वरुपात दिसून येते. मराठवाड्यातील केवळ १.६० टक्के लोक हे जास्त उत्पन्न गटात तर ४.२० टक्के लोक मध्यम उत्पन्न गटात येत असल्याचे दिसते. यानुसार पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील होलार समाजातील कुटुंबांचे मासिक उत्पन्न कमी असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.९८: विभागनिहाय जमिनीच्या मालकीचे प्रमाण**

| विभाग | जमिनीच्या मालकीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १८६ | ६० | २४६ |
| | ७५.६% | २४.४% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७५८ | ३७६ | ११३४ |
| | ६६.८% | ३३.२% | १००.०% |
| एकूण | ९४४ | ४३६ | १३८० |
| | ६८.४% | ३१.६% | १००.०% |

तक्ता क्र. ९८ नुसार पश्चिम महाराष्ट्रात ३३.२ टक्के होलार कुटुंबांकडे मालकीच्या जमिनी आहेत. मराठवाड्यात हे प्रमाण तुलनेने कमी असून ते केवळ २४.४ टक्के एवढे आहे. अशाप्रकारे होलार समाजात एकूण जमिनीच्या मालकीचे प्रमाण केवळ ३१.६ टक्के एवढे दिसून येते. नेकनूर, वंदन, विडा या गावांमध्ये झालेल्या गट चर्चेत आमच्या पूर्वजांकडे शेतजमिनी नसल्याचे होलार कुटुंबांनी सांगितले. ग्रामीण भागात जमीन हे मुख्य उत्पादनाचे साधन असल्याने व मालकीची जमीन नसल्याने बहुतांशी होलार कुटुंबे गायरान यावर कब्जा करून ते कसण्याचा प्रयत्न करतात. पण ही गायराने पारधी, मुस्लीम, महार, मांग अशा समाजाच्या लोकांनी धरल्यामुळे त्यांना कसायला जमीनच नसल्याचे विडा गावातील होलार लोकांनी सांगितले. अनुसूचित जातीच्या शेत मजूरासाठी असलेल्या "कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना" या अंतर्गत होलार समाजास जमीनी उपलब्ध झाल्यास सदर प्रश्न सुटू शकतो.

**तक्ता क्र.९९: विभागनिहाय जमिनीच्या प्रकाराचे प्रमाण**

| विभाग | जमीनीचा प्रकार | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | जिरायत | बागायत | दोन्ही | लागू नाही | |
| मराठवाडा | १ | ५९ | ० | १८६ | २४६ |
| | ०.४% | २४.०% | ०.०% | ७५.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ५१ | २९६ | २९ | ७५८ | ११३४ |
| | ४.५% | २६.१% | २.६% | ६६.८% | १००.०% |
| एकूण | ५२ | ३५५ | २९ | ९४४ | १३८० |
| | ३.८% | २५.७% | २.१% | ६८.४% | १००.०% |

तक्ता क्र. ९९ नुसार मराठवाड्यातील ०.४ टक्के कुटुंबांकडे जिरायत जमिनी आहेत तर हेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात ४.५ टक्के एवढे दिसत आहे. मराठवाड्यातील २४ टक्के होलार कुटुंबांकडे बागायत जमिनी आहेत तर पश्चिम महाराष्ट्रात हेच प्रमाण २६.१ टक्के आहे. जिरायती व बागायती अशा दोन्ही प्रकारच्या जमिनी असण्याचे प्रमाण (२.६० टक्के) फक्त पश्चिम महाराष्ट्रातच दिसून येते. एकूण ६८.४ टक्के कुटुंब भूमिहीन आहेत.

**तक्ता क्र. १००: विभागनिहाय जमिनीच्या क्षेत्रफळाचे प्रमाण**

| भौगोलिक क्षेत्र | क्षेत्रफळ (एकर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ एकर पेक्षा कमी | १ ते २ | २ ते ३ | ३ ते ४ | ४ ते ५ | ५ पेक्षा जास्त | जमीन नाही | एकूण |
| मराठवाडा | ६ | २७ | १५ | ३ | ६ | ३ | १८७ | २४७ |
| | २.४% | १०.९% | ६.१% | १.२% | २.४% | १.२% | ७५.७% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७७ | १७४ | १७ | ३४ | ५२ | २२ | ७५७ | ११३३ |
| | ६.८% | १५.४% | १.५% | ३.०% | ४.६% | १.९% | ६६.८% | १००.०% |
| एकूण | ८३ | २०१ | ३२ | ३७ | ५८ | २५ | ९४४ | १३८० |
| | ६.०% | १४.६% | २.३% | २.७% | ४.२% | १.८% | ६८.४% | १००.०% |

तक्ता क्र. १०० नुसार ज्या कुटुंबांकडे जमिनी आहेत अशा कुटुंबांपैकी १ त २ एकर जमीन असण्याऱ्याकुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १४.६ टक्के एवढे आहे. या खालोखाल १ एकर पेक्षा कमी जमीन असण्याचे प्रमाण दिसून येते. हे प्रमाण ६ टक्के एवढे आहे. तसेच ४ ते ५ एकर जमीन असलेली कुटुंबे ४.२ टक्के एवढी आहेत.५ एकर पेक्षा जास्त जमीन असलेली एकूण होलार कुटुंबे केवळ १.८ टक्के एवढी दिसून येतात. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात जमिनी कमी असल्याचे प्रमाण दिसून येतअसून दोन्ही विभागात १ ते२ एकर जमिन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण इतर वर्गवारीच्या तुलनेत जास्त दिसते.

**तक्ता क्र. १०१: विभागनिहाय कुटुंबातील कमावत्या व्यक्तींची संख्या**

| विभाग | कुटुंबातील कमावत्या व्यक्तींची संख्या | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | एक | दोन | तीन | तीन पेक्षा जास्त | प्रतिक्रिया नाही | |
| मराठवाडा | १३९ | ७४ | २१ | १० | २ | २४६ |
| | ५६.५% | ३०.१% | ८.५% | ४.१% | ०.८% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७५५ | २६० | ७१ | ४५ | ३ | ११३४ |
| | ६६.६% | २२.९% | ६.३% | ४.०% | ०.३% | १००.०% |
| एकूण | ८९४ | ३३४ | ९२ | ५५ | ५ | १३८० |
| | ६४.८% | २४.२% | ६.७% | ४.०% | ०.४% | १००.०% |

तक्ता क्र. १०१ नुसार असे दिसून येते की, केवळ एकच कमावती व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात ६६.६ टक्के एवढे आहे तर हेच प्रमाण मराठवाड्यात ५६.५० टक्के इतके आहे. मराठवाड्यात दोन कमावत्या व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ३०.१० टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण २२.९ टक्के आहे. अशा प्रकारे एक कमावती व्यक्ती असल्याचे प्रमाण हे तुलनेने पश्चिम महाराष्ट्रात जास्त तर दोन कमावत्या व्यक्ती असल्याचे प्रमाण मराठवाड्यात जास्त दिसून येते.

**तक्ता क्र. १०२: विभागनिहाय जमिनीच्या मालकीचा प्रकार**

| विभाग | जमिनीच्या मालकीचा प्रकार | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | वडिलोपार्जित | खरेदी केलेली | इनामी | इतर | लागू नाही (भूमिहीन) | |
| मराठवाडा | १५ | २७ | १७ | १ | १८६ | २४६ |
| | ६.१% | ११.०% | ६.९% | ०.४% | ७५.६% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | २९९ | १४ | ५२ | ११ | ७५८ | ११३४ |
| | २६.४% | १.२% | ४.६% | १.०% | ६६.८% | १००.०% |
| एकूण | ३१४ | ४१ | ६९ | १२ | ९४४ | १३८० |
| | २२.८% | ३.०% | ५.०% | ०.९% | ६८.४% | १००.०% |

तक्ता क्र. १०२ नुसार पश्चिम महाराष्ट्रातील २६.४ टक्के कुटुंबांकडे तर मराठवाड्यातील केवळ ६.१ टक्के कुटुंबांकडे वडिलोपार्जित जमीन आहे. मराठवाड्यातील कुटुंबांकडे वडिलोपार्जित जमीन असण्याचे व इनामी जमीन असण्याचे प्रमाण अतिशय कमी दिसून येते. तसेच खरेदी केलेल्या जमिनीच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील कुटुंबांचे प्रमाण थोडे अधिक आहे. हे प्रमाण मराठवाड्यात ११ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात केवळ १.२ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. १०३: विभागनिहाय जनावरांच्या मालकीचे प्रमाण**

| विभाग | जनावरांच्या मालकीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १७० | ७६ | २४६ |
| | ६९.१% | ३०.९% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ७२२ | ४१२ | ११३४ |
| | ६३.७% | ३६.३% | १००.०% |
| एकूण | ८९२ | ४८८ | १३८० |
| | ६४.६% | ३५.४% | १००.०% |

तक्ता क्र. १०३ नुसार एकूण ३५.४ टक्के होलार कुटुंबांकडे मालकीची जनावरे आहेत. यामध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात मालकीची जनावरे असण्याचे प्रमाण कमी दिसून येते. हे प्रमाण अनुक्रमे ३६.३ टक्के व ३०.९ टक्के एवढे आहे.

**तक्ता क्र. १०४: विभागनिहाय जनावरांच्या संख्येचे प्रमाण**

| विभाग | जनावरांच्या संख्येचे प्रमाण | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एक | दोन | तीन | चार | चारपेक्षा जास्त | लागू नाही | |
| मराठवाडा | २९ | १८ | १० | ६ | १३ | १७० | २४६ |
| | ११.८% | ७.३% | ४.१% | २.४% | ५.३% | ६९.१% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | १५५ | १४५ | ५१ | १६ | ४५ | ७२२ | ११३४ |
| | १३.७% | १२.८% | ४.५% | १.४% | ४.०% | ६३.७% | १००.०% |
| एकूण | १८४ | १६३ | ६१ | २२ | ५८ | ८९२ | १३८० |
| | १३.३% | ११.८% | ४.४% | १.६% | ४.२% | ६४.६% | १००.०% |

तक्ता क्र. १०४ नुसार केवळ एक जनावर संख्या असलेल्या होलार कुटुंबांचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. यामध्ये मराठवाड्यात केवळ ११.८ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील १३.७ टक्के कुटुंबांकडे एकच जनावर

आहे. तसेच दोन जनावरे असलेल्या कुटुंबांचे मराठवाड्यातील प्रमाण ७.३ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात १२.८ टक्के एवढे आहे. तसेच तीन जनावरे असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ४.१ टक्के व ४.५ टक्के एवढे आहे. यावरून पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यात जनावरे कमी असल्याचे प्रमाण दिसून येत आहे. उन्हाळ्यात दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये आमच्याकडे असणाऱ्या जनावरांचे खूप हाल होतात, अशी माहिती बीड जिल्ह्यातील  नेकरूर व परभणी जिल्ह्यातील वंदन गावात झालेल्या गटचर्चेत होलार कुटुंबांनी दिली.

**तक्ता क्र. १०५: विभागनिहाय पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण**

| विभाग | पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| मराठवाडा | १९६ | ५० | २४६ |
| | ७९.७% | २०.३% | १००.०% |
| पश्चिम महाराष्ट्र | ८६९ | २६५ | ११३४ |
| | ७६.६% | २३.४% | १००.०% |
| एकूण | १०६५ | ३१५ | १३८० |
| | ७७.२% | २२.८% | १००.०% |

तक्ता क्र. १०५ नुसार अजूनही २२.८ टक्के कुटुंबे पारंपारिक व्यवसाय (वाद्य वाजविणे) यामध्ये गुंतलेले आहेत. मराठवाड्यातील २०.३ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील २३.४ टक्के कुटुंबे पारंपारिक व्यवसायात आहेत. अशाप्रकारे पश्चिम महाराष्ट्रात पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण तुलनेने अधिक दिसत आहे. वाद्य वाजविणे, सुतारकाम हा पारंपारिक व्यवसाय असल्याचे सांगली जिल्ह्यातील तासगाव, बीड जिल्ह्यातील नेकनूरमधील गटचर्चेत समोर आले. तर बीड जिल्ह्यात कातडी सोलण्याचा पूर्वजांचा व्यवसाय असल्याचे सांगितले.





होलार समाजाचे पारंपारिक वाद्य सनई, सूर व डफ

होलार समाज संशोधन अहवाल यावर सामाजिक तज्ञ, होलार समाजातील प्रतिनिधी व बार्टीचे पदाधिकारी यांची चर्चा










## प्रकरण ६
# सारांश व शिफारशी

होलार समाजाच्या समस्या व चुकीच्या जात नोंदी यांतील अडचणी दूर होण्याकरीता आणि या समाजाच्या सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक उन्नती आणि विकासासाठी पुढील शिफारशी शासकीय व बार्टी स्तरावर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१. वीज, पाणी, सांडपाणी, शौचालय व आरोग्य इ. सारख्या मुलभूत सोयी-सुविधा या समाजातील कुटुंबांना मिळणे गरजेचे आहे. शौचालय व सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने त्याचे आरोग्यास हानी पोहचण्याची शक्यता आहे, असे निदर्शनास आले. तेव्हा, वीज, रस्ते, पाणी, सांडपाण्याची सुविधा, शौचालय इ. होलार समाजाच्या वस्त्यांना प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचायत राज संस्थांनी (ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) संबधित क्षेत्रात अशा योजना राबविण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करावी.

२. मराठवाड्यातील होलार समाजातील कुटुंबांकडे १९५० चा मानक दिनांकाचा पुरावा जातीचे दाखले आणि जात प्रमाणपत्र पडताळणीचे दाखले मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नाहीत. तेव्हा, असे प्रमाणपत्र पडताळणी दाखले अदा करण्यासाठी काही अटी शिथिल अथवा त्यामध्ये उचित बदल करण्यास करण्यास हरकत नसावी. अलीकडेच दि. ३ ऑक्टोबर २०१७ रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने वडिलांच्या रक्त-नाते संबंधातील कोणत्याही व्यक्तीकडे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र असल्यास त्या कुटुंबातील इतर सदस्यांना जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र देण्याची मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर जात प्रमाणपत्र देण्याचे धोरण शासन स्तरावरून आखण्यासाठी योग्य तो निर्णय घ्यावा.

३. या समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला शैक्षणिक अडीअडचणीं येऊ नयेत, यासाठी त्यांना शासकीय वस्तीगृहात आणि शैक्षणिक संस्थामध्ये प्राधान्याने प्रवेश, विद्यावेतन आणि आवश्यक शैक्षणिक सहाय्य पुरविणेबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करावी.

४. सामाजिक न्याय विभागामार्फत वैयक्तिक लाभाच्या योजनेचा उदा. घरकुल, प्रशिक्षण, रोजगारासाठी अर्थसहाय्य इ. प्राधान्याने होलार समाजाला मिळणेबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करावी. .

५. होलार समाजामध्ये भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना शासकीय योजनाअंतर्गत जमीन खरेदी करता यावी, यासाठी प्राधान्याने शासन स्तरावरून योग्य तो निर्णय घ्यावा.

६. होलार हे राज्याच्या अनुसूचित जातींच्या यादी क्र. २६ वर देण्यात आली असून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये या समाजाच्या विकासासाठी तरतुदी करण्यात येतात. सदर होलार समाजाच्या सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे कि, जून्या चपला शिवणे आणि मेलेल्या जनावरांची कातडी काढणे हे व्यवसाय करताना पश्चिम महाराष्ट्रातील होलार समाज दिसून येतो. परंतु, मराठवाड्यात हे व्यवसाय केले जात नाहीत. तेव्हा संत रोहिदास महामंडळाकडून व्यवसायासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य हे अधिक व्यापक स्वरुपात राबवावेत. व या समाजाच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तरतुदी करून त्यांना लाभ देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी.

७. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर होलार समाजाचा किमान एका प्रतिनिधीची नेमणूक करावी. जेणे करून सदर महामंडळामार्फत देण्यात येणारे लाभ होलार समाजापर्यंत पोहचविणे शक्य होईल यासाठी शासनस्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.

८. होलार समाजाच्या जातीसंदर्भात लागलेल्या चुकीच्या नोंदींचा अभ्यास करण्यासाठी शासनस्तरावर उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात यावी.

९. संबंधित शासकीय विभागातील विविध स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी जे अंमलबजावणी करतात असे अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी योग्य प्रशिक्षण देऊन त्यांचे क्षमता संवर्धन करण्याचा कार्यक्रम आखण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी.

१०. या समाजाच्या कालबद्ध उन्नती आणि विकासासाठी परिपूर्ण आराखडा तयार करून त्याचे संनियंत्रण, अंमलबजावणी आणि मूल्यमापन व्यवस्था निर्माण करून त्यांचा सातत्याने आढावा घेण्यात यावा याबाबत शासनाने कार्यवाही करावी.

११. धार्मिक विधीसाठी पशुबळी देणे, पोतराज प्रथा, जोगवा मागणे, देवदासी  इ. प्रथेला प्रतिबंध करणे आणि त्यापासून या समाजाला परावृत्त करण्यासाठी या समाजाचे रचनात्मक व प्रबोधानात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या दोन्ही भागात या प्रथा-परंपरा यांचे पालन करण्याचे प्रमाण

